
ॐ

# दैवी गुणसंपन्न पुरुषोत्तम
# प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर




श्री सद्गुरु श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठान, पुणे

लेखक - विद्यावाचस्पती अजित म. कुलकर्णी

ॐ

# दैवी गुणसंपन्न पुरुषोत्तम

## प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर




लेखक :

विद्यावाचस्पती अजित म. कुलकर्णी



श्री सद्‌गुरू श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठान, पुणे.

मूल्य : रु. ६०/-

■ **प्रकाशक**

**श्री सद्‌गुरू श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठा**

३४६, शनिवार पेठ, नवीन मराठी शाळेसमोर,

पुणे – ४११ ०३०.

फोन : २४४८७०३०

■ **प्रथमावृत्ती** : २००९

**द्वितीय आवृत्ती** : २०१२

■ **मुद्रक**

संवाद ट्रेडप्रिंटस् प्रा. लि., पुणे

५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.

दूरभाष : ०२० – २४४८५६३२

पब्लिक ट्रस्ट नं. ए-१३९१

ॐ

**श्री स्वामी जगद्‌गुरू शंकराचार्य पीठ करवीर**

**२२९९ डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर. फोन : ५२१५४५**

'विरोधी' - १९३१, श्रावण शु. ७, मंगळवार दि. २८/७/२००९

जावक नंबर २६

*डॉ. अजित कुलकर्णी, पुणे*

*पीठस्थ देवतेंचे उत्तम शुभाशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण.*

*आपण आपल्या अनुभवातून प. पू. कै. दत्तमहाराज कवीश्वर यांचे ज्ञान, भक्ती, वैराग्य, समाजभावना, गृहस्थाश्रम, निस्पृहता, शास्त्रोक्त कर्मप्रधानता, धर्मावरील दृढ श्रद्धा, साधकांचे समाधान इ. पैलू उत्तम दाखविले आहेत. पू. दत्तमहाराज हे विविध रंगाने रंगूनही आत्मरंगी कसे रंगले होते हे समाजाला मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यांचा विनयसुद्धा अनुकरणीय असल्याचे आम्हास वाटते.*

*एकंदरीत आपले कार्य मोठेच झाले आहे. या सर्व गुणांचा अंगिकार आपण केला असला पाहिजे, अशी आमची पक्की खात्री झाली आहे.*

*असो! पुनःश्च एकदा पीठस्थ देवतेंचे उत्तम आशीर्वाद व आमचे ''नारायण-स्मरण'' सर्वांस विदित व्हावे.*

*महानुशासनम् वरीवर्ति*
*श्री. जगद्‌गुरू शंकराचार्य*
*करवीर पीठ, कोल्हापूर*

## ...... आरती ......

करीतो आरती ऽऽ सद्गुरू, दत्तमहाराजांची ।।धृ ।।

मायेच्या योगे प्रभुदत्त, अवतरे या अवनी ।

संकटी रक्षसी भजका, भासे भास्कर जीवनी ।।१ ।।

धर्म, ज्ञान, कर्म, भक्ती, प्रसार तो करूनी ।

साधका शांती सुख, वर देई ही संजीवनी ।।२ ।।

वेदघोषे अहर्निश, यज्ञयागे संतोषले ईश ।

भागवत कथा प्रेमे, अन्नदाने प्रकटले ईश ।।३ ।।

पूर्णज्ञान वात्सल्य, प्रकटे तव नयनी ।

पावन केले स्थाना, जेथे-तेथे जाऊनी ।।४ ।।

शरण आलो तव चरणी हो, गुरूराज माऊली ।

तनु मन अर्पूनी अजित, प्रार्थितो कृपा सावली ।।५ ।।

*– डॉ. अजित कुलकर्णी*

## ..... मनोगत .....

श्री सद्गुरु दत्तमहाराज कवीश्वर यांचे हे जन्मशताब्दीचे वर्ष सर्वार्थाने संपन्न होत आहे. पू. दत्तमहाराजांनी देह ठेवल्यानंतर त्यांच्या विविधांगी व्यक्तीमत्त्वावर जे चिंतन व्यक्त झाले आणि ते निरनिराळ्या प्रसार माध्यमातून प्रसिद्ध झाले होते, त्याचे हे संकलन आहे. तसेच, या दहा वर्षात पू. दत्तमहाराजांवर मला बोलण्याची संधी मिळाली, त्याचा सारांश, अशा रीतीने हे संकलन करून, गुरुभक्तांच्या आग्रहानुसार हे सद्गुरुचरणी अर्पण करताना आनंद होत आहे.

श्री संतश्रेष्ठ शिरोमणि ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात त्यानुसार-

**म्हणौनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे।**

**व्युत्पत्ती आवधी विसरिजे।**

**जै जगा धाकुटे होईजे। त जवळीक माझी।।**

या ओवीत सांगितल्याप्रमाणे पू. दत्तमहाराजांचे आचरण होते. वाचकांना एकच विनंती की, मी जे काही लिहिले एवढ़च, त्यांचे चरित्र समजू नये. हा एक अथांग सागरातील, थेंबं आहे. श्रीमद्भागवत ग्रंथात भगवान गोपाळकृष्णाने साधूत्त्वांचे एकूण तीस गुण सांगितले आहे. हे सर्व गुण पू. महाराजांचे ठिकाणी प्रकर्षाने दिसत असत.

पू. दत्तमहाराज चरित्राबद्दल बोलत की, "स्वतःची योग्यता स्वतःच्याच तोंडाने इतरांना सांगणे ही खरी योग्यता नव्हे, हे अज्ञान आहे." तेव्हा हे मी जे धारिष्ट्य करीत आहे, ते केवळ यापुढे सर्व समाजाला, साधकांना आचार-विचारांचे मार्गदर्शन मिळावे. यांच्या आचाराच्या प्रबोधनातून मनुष्य जीवन सुखमय व आनंदी बनावे, या उद्देशाने आहे.

या वाङ्मयीन पुष्पाला पू. जगदगुरू शंकराचार्य विद्या नृसिंह भारती, करवीर, कोल्हापूर यांनी पीठातर्फे आशीर्वाद दिले आहेत. तसेच, प्रकाशनास ते उपस्थित राहत असल्याने, आम्ही सर्व साधक त्यांचे अत्यंत ऋणी आहोत.

या सर्व वाङ्मय पुष्पाचे प्रकाशन व्हावे असे ज्यांना मनापासून वाटत होते, त्याच्या प्रेरणेने, स्फूर्तीने ही गुरुसेवा घडत आहे, तसेच, ज्यांनी तन, मन, धनानी ही जी गुरुसेवा करण्याचा वस्तूपाठ सर्वांसमोर ठेवला आहे, ते गुरुभक्त डॉ. वसंत जोशी, पुणे यांचा मी ऋणी आहे. या सर्व लेखांचे संकलन आणि पुनर्लिखाणाचे काम एक साधक श्रीमती इरावती परांजपे यांनी केले आहे. तसेच, या पुस्तकांचे मुद्रण शोधनाचे काम श्री अरुण अभ्यंकर यांनी केले आहे, त्याचप्रमाणे मुद्रणाचे काम श्री. उमेश वेचलेकर व श्रीराम गाडगीळ यांनी केले आहे. या सर्वांचा मी आभारी आहे.

या वाङ्मयीन मूर्तीतून सर्वांना समाधान व आनंद प्राप्त व्हावा. श्री सद्गुरु दत्तमहाराज आणि भगवान श्रीधर स्वामी चरणी तसेच, भगवान दत्तप्रभू चरणी प्रार्थना करतो. श्री ज्ञानदेव माऊलीच्या शब्दांतच म्हणतो -

**किंबहुना तुमचे केले।**
**धर्मकीर्तन हे सिद्धि गेले।**
**येथ माझे जी उरले।**
**पाईकपण ।।  ज्ञानेश्वरी।**

**- विद्यावाचस्पती अजित महादेव कुलकर्णी**

## ..... अनुक्रमणिका ......


| | | पान नं. |
|---|---|---|
| १. | योगियां दुर्लभ वैशारद्य प्रज्ञेचे | – १ |
| २. | सर्वश्रेष्ठ कर्मयोगी | – १२ |
| ३. | वेदान्त सौरभ | – २० |
| ४. | पू. दत्तमहाराजांची वेदनिष्ठा | – २५ |
| ५. | संचरिष्णू धर्मज्ञ | – ३१ |
| ६. | धर्मनिष्ठा | – ३७ |
| ७. | गुरुभक्तीविषयी | – ४२ |
| ८. | गृहस्थाश्रमी : पू. दत्तमहाराज कवीश्वर | – ४९ |
| ९. | निरंतर तेवणारी ज्ञान ज्योत | – ५८ |
| १०. | प्रगल्भ ज्ञान हे अबाधित असते | – ६३ |
| ११. | ज्ञानीयांचे ज्ञानराजे | – ६९ |
| १२. | चैतन्याचा दीप उजळला | – ७५ |
| १३. | नीतिमीमांसा | – ८० |
| १४. | भक्तिविषयी | – ८५ |
| १५. | परिपूर्ण वैराग्यसंपन्न जीवन | – ८९ |
| १६. | दैवी गुणसंपन्न पुरुषोत्तम | – ९५ |
| १७. | विश्व हे मोहरे लावावे | – १०२ |
| १८. | उपासना एक चिंतन | – १०७ |
| १९. | येणे कारणे परब्रह्म | – १११ |

## पू. दत्तमहाराज कवीश्वर यांना प्राप्त झालेल्या पदव्या

- २ जुलै, १९६१ दिल्ली : भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते ''विद्यावाचस्पती''पदवी प्रदान. ''देववाणी संस्कृतमध्ये अनन्यसाधारण वैदुष्याबद्दल'' असा गौरव.
- १९ मार्च, १९७७ पुणे : वेदशास्त्रोत्तोजक सभा, पुणे यांची ''न्यायचूडामणि'' पदवी प्रदान.
- २ सप्टेंबर, १९७९ पुणे : श्री द्वारका शारदा पीठाधीश्वर श्रीमद् शंकराचार्यांकडून ''महामहोपाध्याय'' पदवी प्रदान.
- २९ मे, १९८३ : 'ब्रह्मर्षी पदवी प्रदान, श्रीमन् समर्चनाय नालम् प्रयागवासिनः
- ९ जून, १९८३: अखिल भारतीय महाराष्ट्र-तीर्थ पुरोहित संघ, वाराणसी यांच्या तर्फे ''योग वेदान्त सार्वभौम'' पदवी प्रदान
- 'महर्षी' पदवी प्रदान, श्री महासिद्ध योग मंडल संघ

## पू. दत्तमहाराज कवीश्वर यांना सन्मानाने पुरस्कार प्रदान

- १९५७ : श्रीमद् कांची कामकोटी पीठाधीश्वर शंकराचार्यांकडून सुवर्णकंकण आणि सन्मानपत्र.
- १८ डिसेंबर, १९६८ दिल्ली : भारत सरकारचे ''राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार''
- २५ मे, १९६९ महाराष्ट्र-कर्नाटक भगवद्भक्त ५१ संस्था संचालकांकडून सन्मानपत्र ''कोविदचूडामणि व वेदशास्त्रार्थतत्वज्ञ'' असा गौरव.
- २१ एप्रिल, १९७० दिल्ली : भारताचे राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते 'राष्ट्रीय पंडित' ही पदवी प्रदान. ''संस्कृत में पांडित्य तथा शास्त्रनिष्ठा के लिए यह प्रमाणपत्र प्रदान'' असा गौरव.
- ९ फेब्रुवारी, १९८९ : श्री देवदेवेश्वर संस्थान पर्वती, कोथरूड यांच्यातर्फे श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक व आध्यात्मिक पुरस्कार.
- १९९० पुणे : महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानतर्फे पू. श्री. किशोरजी व्यास यांच्या हस्ते ''महर्षी वेदव्यास'' पुरस्कार प्रदान.
- १९ नोव्हेंबर, १९९० पुणे : श्री गुरुचरित्र अखंड पारायण संस्था आनंदाश्रम, पुणे यांच्यातर्फे श्री चिं. ग. काशीकर यांच्या हस्ते गौरव.
- १९९० : दाते पंचागकर्ते यांच्यातर्फे सन्मानदर्शक स्मृतिचिन्ह प्रदान.
- १९९३ पुणे:त्वष्टा कासार समाज संस्था, पुणे यांचेतर्फे सन्मानदर्शक स्मृतिचिन्ह प्रदान.
- ४ ऑगस्ट, १९९४ : श्री क्षेत्र आळंदी ब्रह्मवृंद अनुष्ठान मंडळ यांच्यातर्फे सन्मानपत्र
- १४ मे, १९९५ : श्रीमद् शंकराचार्य करवीर पीठ, कोल्हापूर यांच्यातर्फे सांस्कृतिक पुरस्कार.

# प्रकरण - पहिले

ॐ

## योगिया दुर्लभ वैशारद्य प्रज्ञेचे :

### ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर

भारत देशाचे थोर भाग्य असे आहे की, या देशात आजही ज्ञानयोगी, तपस्वी व पारंपरिक पद्धतीने जीवन जगणारे लोक आहेत. त्या परंपरेला साजेसे, ज्ञानयोगी, कर्मयोगी व भक्तीरसाने पूर्णपणे चिंब झालेले 'पू. दत्तमहाराज कवीश्वर' हे एक होते.

महाराष्ट्र राज्याचे असे सांस्कृतिक वैभव आहे की, कवीश्वर घराण्यातील गेल्या चार पिढ्यांनी अखंडपणे तेवत राहणाऱ्या नंदादीपाप्रमाणे ज्ञानदानाचे कार्य केले आहे.

पू. महाराजांचा दि. २ मार्च, १९१० साली नरसोबाची वाडी येथे जन्म झाला, व दि. ३ मार्च, १९९९ रोजी सूर्यास्त समयी सुवर्णकांतीयुक्त सूर्याच्या दैदिप्यमान किरणांच्या प्रकाशात अस्थिंचे कृष्ण-पंचगंगा संगमात नरसोबाची वाडी येथे विसर्जन करण्यात आले.

## कवीश्वर घराण्याची पावन कूलपरंपरा :

पू. दत्तमहाराजांचे मूळ घराणे नगर जवळील 'मांडवगण' येथील 'यजुंर्वेदीय' शाखेचे गोत्र 'उपमन्यू'. प्रारंभीचे आडनाव 'सप्तर्षी' असे होते. पुढे 'दीक्षित' व त्यानंतर 'कवीश्वर' हे आडनाव झाले होते. 'सप्तर्षी' आडनावाप्रमाणे याच कुळातील थोर, महान सातवे सत्पुरुष म्हणजे 'ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर' होय. पूर्वजांची पुराणसेवा भागवतसेवा, महाभारत, रामायण, वेदान्त तसेच मंत्रविद्या शास्त्र, अवगत असलेल्या थोर घराण्याचा वारसा पू. महाराजांनी हिमालयाइतका विशाल केला

आहे. पू. महाराजांचे पूर्वज 'दाजी दीक्षित' हे संस्कृतातील काव्य रचना करणारे 'कवीराज' होते. त्यांच्या साहित्यावरून त्यांना लोक 'कवीश्वर' म्हणून ओळखू लागले.

महाराष्ट्रात आध्यात्मिक व सांस्कृतीने संपन्न असे दोन उपासना प्रवाह आहेत. एक 'वारकरी संप्रदाय' आणि दुसरा विलोभनीय असा 'दत्त संप्रदाय'. तसे पाहता, शांतीब्रह्मसेवन केलेल्या एकनाथांनी हा दत्तसंप्रदाय भागवत धर्माच्या प्रवाहात समाविष्ट केला, त्याच प्रवाहात पू. महाराजांच्या पावन कुळाने उत्तरोत्तर भर टाकीत हा प्रवाह समृद्ध केला आहे.

कवीश्वरांच्या घराण्यातील भालचंद्रमहाराज, वक्रतुंडमहाराज, धुंडिराजमहाराज व दत्तमहाराज या सर्वांनी प्राचीन विद्या, उपासना, पवित्र आचरण व भक्तीप्रेम या ईश्वरी वरदानाने हा आध्यात्मिक प्रवाह विश्वात्मक केला आहे. पू. वासुदेवानंद सरस्वती, पू. मौनीस्वामी (वाडी), पू. दीक्षितस्वामी, पू. योगिराज गुळवणीमहाराज, पू. भगवान श्रीधरस्वामी, या सर्वांच्या अनुग्रहाने आणि स्वतः महाराजांचे स्वधर्म, स्वकर्तव्य व स्वकर्माच्या नैष्ठिक आचरणाने महाराजांचे जीवन म्हणजे-

**सहस्र दीपे दीप, कैसी प्रकाशली प्रभा ।**

**उजळल्या दशदिशा, गगना आलीसे शोभा ।।**

असे हे कोंदलेले तेज, प्रभा, नित्य नवा आनंद देत, पू. महाराज विश्वात्मक झाले आहेत.

## पू. दत्तमहाराजांचे शिक्षण :

पू. महाराजांचे बालपण नृसिंहवाडीत गेले होते. वाडीतच प्राथमिक शिक्षण झाल्यावर, जेरेस्वामीमहाराजांच्या पाठशाळेत वेदाध्ययनाला प्रारंभ झाला होता. तेथे काव्य व व्याकरण याचा अभ्यास झाल्यावर, सांगली

येते व्यंकटेशशास्त्री अभ्यंकर यांचेकडे व्याकरणशास्त्राचे अध्ययन पूर्ण झाले. पुढे धारवाड येथे उप्पिनबेटगिरी यांचेकडे न्यायशास्त्राचे अध्ययन झाले. त्यानंतर पुणे येथे मीमांसा विद्यालयात श्री. सुब्बाशास्त्री यांचेकडे मीमांसा, वेदान्त, धर्मशास्त्र इ. वेदांगाने अभ्यास झाला.

धारवाडच्या पाठशाळेत सन १९३३ ते १९३७ अध्यापन, १९३८ ते ४४ शंकराचार्य शिरोळकरस्वामी यांच्या वेदपाठशाळेत न्याय व वेदान्तांचे अध्यापक, १०४५-६९ टिळक महाराष्ट्र संस्कृत विद्यापीठात प्र-पाठक म्हणून काम केले. या अध्यापन कार्याबरोबर गुरूकुल पद्धतीने पुण्यात अनेक विद्यार्थ्यांना ज्ञानदान पू. महाराजांनी केले आहे.

## प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि वैराग्य व अनासक्त वृत्तीचा सुंदर समन्वय

पू. महाराजांवर पू. दीक्षितस्वामी व योगिराज गुळवणीमहाराज यांची पूर्ण कृपा होती. त्यामुळे औरवाडला वयाच्या १६ व्या वर्षी १९२६ साली पहिला भागवत सप्ताह संपन्न केला होता. त्यानंतर १९६६ पर्यंत पू. महाराज औरवाडला सप्ताह करण्यास जात असत. पू. गुळवणीमहाराज यांच्या कृपा आशीर्वादाने १९६७ साली वासुदेव निवासात हे ज्ञान सत्र सुरू केले, अशा रीतीने सुमारे ६५ वर्षे अखंडपणे ठिकठिकाणी ज्ञानसत्रे पू. महाराजांनी संपन्न केली. भगवान गोपाळकृष्णाने जशी 'उद्धव गीता' उद्धवाला सांगितली आणि वेदव्यासांनी सारं काही ग्रंथित केले, तसे शुकाचार्य स्वरूपी पू. महाराजांच्या ठिकाणी शुक व उद्धवजी या दोन्ही रूपाने भक्तीप्रेमाने, आपल्या मधुरवाणीतून ज्ञानकिरणे, शितलतेचा वर्षाव करीत असत. त्याचा आस्वाद पुणेकरांनी आणि भारतीय जनतेने घेतला आहे.

बंगालच्या लोकनाथतीर्थस्वामीमहाराज शक्तीपात सांप्रदायाचे

अधिकारी, यांचे शिष्य पू. गुळवणीमहाराज यांनी १९७४ साली देह ठेवल्यावर, पू. महाराजांना उत्तराधिकारी नेमले व त्यांनी आजमितीपर्यंत केवळ गुरू आज्ञा व राजा भरताच्या विश्वस्तपणाचा (हे राज्य रामाचे आहे) आदर्श ठेवून हे पद सांभाळले होते. अशा प्रकारच्या अलौकिक कार्यामुळे विवेकचुडामणित शंकराचार्य म्हणतात.

ज्या महापुरुषांचे वैराग्य व मोक्षेच्छा तीव्र असतात, त्याच्या ठिकाणी शमदमादिक समुच्चय साथरूपाने फलद्रुप होतात, असे वैराग्य व शमादि षट्गुणांचा समुच्चय पू. महाराजांच्या ठिकाणी होता. यामुळे पू. महाराज 'सद्गुरू' पदावर आरूढ झाले होते. तो लाभ पू. महाराजांना झाला. तसेच, विवेक चुडामणित मोक्ष गुरूची लक्षणे सांगितली आहेत–

**स्वात्मतत्त्वानुसंधान भक्तिरित्यपरे जगुः।**

**उक्तसाधनसंपन्नस्तत्त्वजिज्ञासुरात्मनः ।।३३।।**

**उपसीदेसदगुरूं प्राज्ञं यस्माद्बंधविमोक्षणम् ।**

**क्षोत्रियोऽवृजिनोऽकामहतो यो ब्रह्मवित्तमः ।।३४।।**

**ब्रह्मण्युपरतः शान्तो निरिन्धन इवानलः ।**

**अहेतुकदयासिन्धुबंन्धुरानमतां सताम् ।।३५।।**

या मंत्रात मोक्षगुरूची लक्षणे अशी सांगितली की, वेदशास्त्रसंपन्नता, सदाचारसंपन्नता, निरीच्छ, उत्तम ब्रह्मवेता, आत्मस्वरूपी लीन, रागद्वेषादिरहित, तेजस्वी निर्हेतुक दयेचे सागर, सदैव सत्कर्म परायण, सर्वांचे हितचिंतक असल्याने शांती ब्रह्म सेवन केलेले दत्तमहाराज 'मोक्षगुरू' या पदावर आरूढ झालेले होते.

## अनेक पदव्या व सन्मानपत्रांनी सन्मानीत :

पू. दत्तमहाराजांची प्रगल्भबुद्धी, दैदिप्यमान पांडित्यांच्या तेजोभास्कराला, काशी, म्हैसूर येथील विद्वत सभेत 'न्यायरत्न', 'न्यायचुडामणि' या पदवीने सन्मानीत केले होते.

- १९५७ साली कांची कामकोटी शंकराचार्यांकडून सुवर्णकंकण भेट
- १९६१ साली राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे हस्ते, केंद्र शासन शिक्षण संचलनाय 'विद्यावाचस्पती' पदवीने सन्मानीत.
- १९६९ साली पुण्यात 'आदर्श शिक्षक' म्हणून सन्मानीत.
- १९७० साली राष्ट्रपती, व्ही. व्ही. गिरी, यांचेकडून 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' म्हणून सन्मानित.
- १९९३ साली वेदाचार्य घैसास गुरुजी यांच्या अमृत महोत्सव समयी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात रजतपत्र देवून डॉ. शंकरदयाळ शर्मा यांचेकडून सन्मानीत.
- चारही पीठाच्या शंकराचार्यांकडून सन्मानीत.
- महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'वेदव्यास पुरस्कार' हा प्राप्त होणारे पहिले मानकरी.
- यजुर्वेद शाखीय, याज्ञवल्क्य पुरस्काराने सन्मानीत.
- देवदेवेश्वर पर्वती संस्थान तर्फे, श्रीमंत नानासाहेब पेशवे पुरस्कार.

अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मानीत झाले होते.

पू. दत्तमहाराजांची शास्त्रपारंगता, अभिजात अध्यापनकौशल्य, मूलग्राही संशोधकवृत्ती, यांनी पू. महाराजांची कीर्ती दूरवर पसरली व

वैराग्यशील अनासक्त, प्रतिभा उज्ज्वल संपन्नतेने पू. दत्तमहाराज सर्वत्र आदरणीय ठरले व सर्वत्र सन्मानीत झाले. ज्ञानदेवांच्या शब्दात असे म्हणता येईल की, 'पू. महाराजांना सन्मानानी विभूषित केले नाही तर सन्मानच पू. महाराजांमुळे विभूषित झाले.' पू. महाराज प्रगल्भ बुद्धिने व अमानित्व गुणांनी तेजस्वी झाले होते. तसेच, त्यांच्या कार्यांनी व ज्ञानगंगेने सारे जण सुस्नात झाले आहेत.

## 'कोण्याही जीवाचा न घडो मत्सर' ही वृत्ती :

पू. महाराजांचे वागणे, बोलणे, म्हणजे, 'सहज बोलणे हाच हितोपदेश' प्रमाणे होते. त्याचप्रमाणे 'दाता एक रघुनंदन' यावर पूर्ण निष्ठा होती. अनुप्रसंगी, औदार्याच्या भूमिकेतून व विशालदृष्टीने पाहणे, अशी निर्दोष दृष्टी होती. त्यामुळे पू. महाराज कोणत्याही प्रसंगी अत्यंत शांत असत. पू. महाराज अत्यंत अबोल, प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने कधी कधी आपले मनोगत पत्रद्वारे व्यक्त करीत असत. ती वाचली तर, त्याच्यातून कोणताही संदेह निर्माण करून घेवू नये. त्यातील व्यापक विचार व त्याचे महत्त्व जाणून घ्यावे.

**'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती।**

**देह कष्टवीती उपकारे।।**

प्रमाणे कोणालाही दोष न देता सद्गुण धर्माचरण व शास्त्रविचारांची कास पू. महाराजांनी कधीही सोडली नाही. श्रीमद्भागवतात श्रीकृष्णाने उद्धवजींना जो उपदेश केला आहे त्यामध्ये तीस गुणांची मांडणी मानवी जीवनाच्या अंगिकारासाठी दिली आहे. त्यामध्ये एक गुण असा आहे की, ''सदैव चांगल्या गोष्टींचा सत्कार करावा.'' परंतु चांगले काय व कशाला म्हणावे हे तरी समजले पाहिजे ना? हे पू. महाराजांना चांगलेच समजले होते. त्यामुळे ते प्रत्येकातील चांगल्या गुणांचा गौरवच करावयाचे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आर्थिक अडचणी प्रसंगी विनावेतन काम करणारे पू. महाराज हे एकमेव 'शिक्षक' पाहिले म्हणजे सदैव त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे, असे हे व्यक्तिमत्त्व ! विद्यादानाच्या कार्यातील आनंदाचा आस्वाद घेताना स्वीकारलेले व्रत पू. महाराजांनी शेवटपर्यंत संपन्न केले.

मीसुद्धा माझ्या एम्.ए. च्या परीक्षेच्या वेळी श्री जगदीशभट्टाचार्य विरचित तर्कामृत या पुस्तकाचा पाठ, वासुदेव निवासात, पू. महाराजांना जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा, घेतला होता.

छोट्या छोट्या गोष्टीतही असामान्य दृष्टिकोणातून पाहणे व सातत्याने तसेच पाहात राहणे हे केवळ पू. महाराजांनाच शक्य झाले होते.

हे सत्पुरुषांचे घराणे म्हणून घरमालक वै. ग. या. तथा दादासाहेब नातू हे भाडे घेत नसत, तर घरमालक भाडे घेत नाहीत म्हणून जागा सोडणारे पू. महाराज ! असे पाहण्यास मिळणारही नाही !

अशा ऋषितुल्य, औदार्यसंपन्न, विशाल व व्यापक दृष्टिकोणामुळे, पू. महाराजांच्या आचार-विचारांमुळे जगभर सर्व सांप्रदायात अग्रपूजेचा मान पू. महाजांना मिळाला होता. वारकरी असो, दत्तसांप्रदायी असो, नाथसांप्रदायी असो, शाक्त उपासक असो, गाणपत्य असो, सर्व-सर्वांना पू. महाराज आपलेच वाटत असत. याचे कारण असे, पू. महाराजांची झालेली "वासुदेव जगत सर्वम्" ही दृष्टी.

पू. महाराजांनी निरनिराळ्या निमित्ताने यज्ञयागादि कर्मे, अनुष्ठाने करून, जनता जनार्दतील ईश्वरी चैतन्याचे प्रकटीकरण करून परमात्म्य स्वरूपाचे सर्वांना दर्शन घडविले होते.

सद्गुरू योगिराज वामनरावजी गुळवणीमहाराज यांच्या स्मरणार्थ वामन निवासाची वास्तू निर्माण केली, आणि सर्वांचे एक आश्रयस्थान निर्माण केले.

नरसोबाच्या वाडीला, औरवाड येथे पू. दीक्षितस्वामींच्या स्मरणार्थ अमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. सध्या तेथे घाटाचे कामही पूर्ण झाले आहे. पू. गुळवणीमहाराजांनी वाडीला 'श्री' च्या मनोहर पादुकांच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, तर पू. दत्तमहाराजांनी औरवाडाचा जीर्णोद्धार केला. हा काही सुमंगल योग दिसतो. पू. महाराजांनी आपल्या ज्ञानशक्तीने, क्रियाशक्तीने व मनःसंकल्पाने कोट्यावधी रुपयांची कार्ये करून पू. महाराज कार्यरूपाने अजरामर झाले आहेत. असे निष्कलंकीत चरित्र दत्तमहाराजांचे आहे.

## विद्वत्मान्य अशी ग्रंथसंपदा :

अत्यंत अबोल, वेचक व मार्मिक बोलणे, अत्यंत निगर्वी, अमानित्व, पैशून्य अवस्था असणाऱ्या पू. महाराजांनी आपली विचार संपदा समाजाला प्रदान केली आहे.

निंबकाचार्य यांच्या ब्रह्मसूत्रांवरील मराठी भाषांतर 'वेदान्त पारिजात सौरभ' हा ग्रंथ टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकाची प्रस्तावना ११८ पानी असून अत्यंत त्यातील तत्त्वचिंतन उद्‌बोधक आहे. टेंबेस्वामीमहाराजांचे चरित्र, चांदणे कैवल्याचे , नारायणी नमस्तुते, विचारधन भाग - १, २ व ३, द्विसहस्री गुरुचरित्र भाग १ व २, संतसंग, श्रीमद्‌भागवत प्रवचन भाग -१ इ. अशी ग्रंथ संपदा आहे. तसेच, अनेक पुस्तकांना प्रस्तावना आहेत. अनेक मासिके, स्मरणिका अशा ग्रंथातून विद्ववत् प्रचूर लेखन साहित्य प्रसिद्ध आहे. टेंबेस्वामींच्या ग्रंथ संपदेचे विषयवार वर्गीकरणाचे सुमारे पाच हजार पृष्ठांचे काम केले आहे.

## कुटुंबवत्सल महाराज हे एक वैशारद्य प्रज्ञेचे महंत :

अखंड सौभाग्यवती लक्ष्मीबाई कवीश्वर यांना दि. १०/१/९९ रोजी देवाज्ञा झाली. पाठोपाठ पू. दत्तमहाराजांचे दि. १/३/९९ रोजी

महानिर्वाण झाले. तीन मुले, तीन मुली व त्यांचा परिवार म्हणजे, एक गोकुळ होय. आज सगुण साकार 'मा–माई' अथवा 'दादा–आजोबा' हे अनंतात विलीन झाले असले तरी, त्यांच्या स्मृतींचा गंध सर्वांना पावन करीत आहे. याचे कारण सौ. आईसाहेब या 'भक्ती लक्ष्मी' होत्या तर पू. दत्तमहाराज 'वैशारद्य' प्रज्ञेचे होते. त्यामुळे आजही रेणुका निवासात औंदुबराच्या छायेत सारे सारे शांत आहेत. आजही आजी–आजोबांच्या स्नेहात सारे जण निरामय शांत आहेत.

पतंजली योगसूत्रात समाधिपाद–१ सूत्र ४७ मध्ये ''ऋतंभरा तत्र प्रज्ञा'' यात व्यक्त केल्याप्रमाणे पू. महाराजांची 'प्रज्ञा ऋतंभरा' झाली होती, ती केवळ 'वैशारद्य' मुळे । निर्विचार समाधितील 'वैशारद्य' या अवस्थेत योग्याची 'प्रज्ञा ऋतंभरा' म्हणजे कसल्याही विपर्ययाचा संपर्क न लागता केवळ वस्तूमात्राचे ज्ञान पूर्णत्वाने आणि चालती–बोलती 'अखंड समाधी' म्हणतात. याचे कधी उत्थापन होत नाही. अशी ही 'वैशारद्य' एक अवस्था पू. महाराजांची होती. यामुळे पू. महाराज यांना स्वकर्म व स्वकर्तव्याच्या आचरणाने प्राप्त झालेली ही परिपक्वता व अध्यात्माचा प्रसाद प्राप्त झाला होता.

## अनेक संस्थानांचे मार्गदर्शक :

पू. दत्तमहाराज सर्व लोकांना मार्गदर्शन करीत असत. तसेच, अनेक संस्थांनाही मार्गदर्शन करीत असत. श्री वासुदेव निवास येथे प्रधान विश्वस्त होते. श्री. धुंडिराजमहाराज ट्रस्ट, देऊळगावराज जि. बुलढाणा, येथे विश्वस्त होते. तसेच, श्री गुरुचरित्र अखंड पारायण संस्था, आनंदाश्रम, पुणे, येथे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करीत असत. त्याचप्रमाणे तुळजाभवानी आरोग्यधाम ट्रस्ट पुणे येथेही विश्वस्त होते. वास्तवता व अध्यात्म याचा सुयोग्य मिलाप कसा घालावा हे पू. महाराजांच्या आचरणातून दिसत असे. तरी त्यांचा आचार विचार हा अत्यंत साधा, सोपा असे.

## पू. दत्तमहाराजांचे महानिर्वाण :

लौकिक दृष्टीने पू. दत्तमहाराजांचे महानिर्वाण सोम. दि. १/३/१९९९ रोजी सकाळी ८.३० वाजता झाले. तरी पू. महाराजांचे निर्वाण ही एक महान घटना होती. देह ठेवल्यावर दोन महापुरुषांचे मी दर्शन घेतले होते. एक भगवान श्रीधरस्वामी व कांची कामकोटीचे परमाचार्य चंद्रशेखर सरस्वतीस्वामीमहाराज. या द्वयांची देहकांती जी होती, तीच देहकांती पू. दत्तमहाराजांच्या देहाला आली होती. सुवर्णकांती युक्त रसाने परिपूर्ण स्थिती होती.

सत्त्वगुण वाढला की, शरीरातील आधि–व्याधी नाहीशा होतात. शरीर सुदृढ व सतेज होते. यातून एक रसायन निर्माण होते व मनुष्याला दीर्घ आयुष्य, स्मृती, मेधा, आरोग्य, तारुण्य, प्रभा, वर्ण, उत्तम स्वर, स्वभावाची उदारता, इंद्रिय सामर्थ्य, वाक्‌सिद्धी, नम्रता व कांती प्राप्त होते. यालाच ''कायासंपत'' योगाशास्त्रात म्हणतात.

तसेच, समाधिपाद सूत्र २१ मध्ये व्यक्त केले प्रमाणे **तीव्रसंवेगानामासन्नः** प्रमाणे पू. दत्तमहाराज एकदम सगुणातून निर्गुण अशा ''कैवल्यपदावर'' आरूढ झाले होते. संवेग म्हणजे कैवल्यपाप्तीच्या इच्छेची उत्कटता. ही तीव्र असेल तर तीव्र संवेग होतो. असा तीव्र संवेग ज्याच्या ठिकाणी आहे ते तीव्र संवेगयोगी असतात. अशांना हे 'कैवल्यपद' (द्यु लोक) आसन्न म्हणजे जवळ असतो. त्यामुळे पू. दत्तमहाराजांचा देह पडल्यावर आत्मरूप चैतन्य तीव्र संवेगाने 'द्यु' लोकाला गेला. अशी आमची धारणा आहे. अशा थोर विभूतीचे वर्णन माऊलीच्या शब्दात असे करता येईल की,

**योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी।**

**पाहता पाहता मना न पुरे चि झणी।।**

**देखिला देखिला माये देवाचा देवो**

**फिटला संदेहो निमाले दुजेपण।।**

**अनंतरूपे अनंत वेषे देखिले म्यां त्यासी।**

**बापरखुमादेवीवरू खूण बाणली कैसी।।**

असे हे पू. दत्तमहाराज हे एक योगी भक्तवत्सल होते.

याप्रसंगी एकच विचार करावासा वाटतो की, पू. महाराजांनी प्रवचनांद्वारा जे जे चिंतन व्यक्त केले आहे, त्यातील एखाद्या विचाराच्या साहाय्याने यावत्‌जीवन आहे, तोपर्यंत आचरण्याचा प्रयत्न करणे हीच खरी श्रद्धांजली ठरणार आहे.

# प्रकरण - दुसरे

ॐ

# सर्वश्रेष्ठ कर्मयोगी

**ब्राह्मणेषु विद्वांसः विद्वत्सु कृतबुध्दयः**

**कृतबुद्धिषु कर्तारः कर्तृषु ब्रह्मवादिनः ।।**

।। मनुस्मृती ।।

ब्राह्मणांमध्ये विद्वान श्रेष्ठ विद्वानांमध्ये कार्य करण्याची बुद्धी असणारे श्रेष्ठ, कार्य करण्याची बुद्धी असणाऱ्यांमध्ये प्रत्यक्ष कार्य करणारे श्रेष्ठ, कार्य करणाऱ्यांमध्ये ब्रह्मज्ञान असणारे श्रेष्ठ.

मनुस्मृतीमध्ये सांगितल्याप्रमाणे पू. दत्तमहाराज सदैव कार्यमग्न असत. पू. महाराजांनी शास्त्रधर्माचे तंतोतंत पालन केले होते. दूरदर्शी व प्रगल्भ बुद्धिच्या महाराजांचे कर्म हे धर्मकारण समाजकारण व संस्कृतीकारण यामध्ये अत्यंत मोलाचे ठरले होते.

सध्याच्या युगाला आपण 'विज्ञानयुग' म्हणतो. सध्या आपल्या समाजाचा भोगवादी संस्कृतीचा एकीकडे कल वाढत आहे. समाजाला सहज कर्मातून निवृत्ती योगाकडे नेणे, भोगवादाकडून निरामय अशा विचारमार्गाने संस्कृतीची जोपासना करणे. सद्भक्तांचे मानसिक देह निर्माण करून व्यष्टी व समष्टीजीवन समृद्ध करण्याचा आचार व मार्गदर्शन करणे असे अलौकिक कार्य पू. महाराजांनी केले. तसेच, धर्माचरणाच्या अनुसंधनाने धर्मविषयी आदरबुद्धी लोकांत निर्माण करणे हेही असामान्य कार्य केले. आजच्या समाजात 'अंधश्रद्धेच्या' नावाखाली चाललेली प्रखर टीका; यामध्ये 'स्थितप्रज्ञतेने' पू. महाराजांनी मार्गदर्शन केले. पू. महाराज 'श्रध्देला अंध' समजत नसत. श्रद्धा शक्तीरूप असते, असे

सांगून यातून महाराजांचा एक प्रयत्नवाद दिसून येतो.

## कर्म शब्दाचा अर्थ :-

कर्म हा शब्द 'कृ' या संस्कृत धातुपासून निर्माण झाला आहे. याचा अर्थ क्रिया करणे, व्यापार, हालचाल बुद्धिपुरस्सर व अबुद्धिपुरस्सर, कायिक, वाचिक व मानसिक कर्म करण्याच्या सर्व गोष्टींचा समावेश असतो.

असं आहे ! कर्म कोणालाही चुकविता येत नाही व कोणीही ते चुकवू शकत नाही. कर्म बंधनाला जसे कारण आहे, तसेच कर्म मुक्तीलाही कारण आहे. परंतु कर्म कसे करावे तर 'सहज कर्म' करताना दैवी गुणसंपत्तीच्या अंगीकाराने करावे; असा बोध पू. महाराजांच्या आचार-विचारातून प्रकर्षाने जाणवत होता. या दृष्टीने पू. महाराज म्हणजे सात्विक व ज्ञानसंपन्न अशी एक भगवंताची विभूती होती असे दिसून येते.

## पू. महाराजांचे बालपण :-

पू. महाराजांचे बालपण नरसोबाच्या वाडीला गेले. माता-पित्यांच्या बरोबरचा महाराजांना आजीचा लळा खूप होता. 'बहुत सुकृताची जोडी। प्रमाणे बालपणापासून पू. महाराजांना आत्मचिंतनाची गोडी लागली होती. त्यासाठी पिताजींनी व पू. दीक्षितस्वामींच्या संस्कारांनी स्वधर्माचरणाची गोडी वृद्धिंगत झाली. वाडीचे पू. नारायणस्वामी म्हणत- 'ज्ञानमार्गाने अज्ञान नाहिसे होत असले तरी, ते ज्ञान उत्पन्न होण्यासाठी विवेक-शम-दम हे सारे लागते.' त्यामुळे स्वच्छ बुद्धिच्या योगे ज्ञान स्थिर व प्रखर राहते. त्यामुळे ज्ञान, कर्म व भक्ती योग एकमेकांना पूरक होतात.' हा बोध पू. महाराजांच्या जीवनात संस्काररूपाने बिंबला व मुरला होता.

संध्यावंदन करणे, पूजाअर्चा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव इ. कर्म शुद्धरूपात करीत असत. विष्णुसहस्रनाम, गीता, स्वशाखेचे (यजुर्वेद) अध्ययन,

शास्त्राध्ययन, उपनिषद यांचा अभ्यास करीत असत. या कर्माचरणातून पू. महाराजांना खरा बोध झाला तो असा की,

**खरा तो एकचि धर्म आणि कर्म ।**

**मानवानी जगाला प्रेम अर्पावे ।।**

पू. महाराजांचा वाडीतील कृष्णामाईच्या संथ प्रवाहात स्नानाचा नेम असे. पू. महाराज़ांना पोहायला उत्तम येत असे. कृष्णासरितेने महाराजांचे अंतःकरण चिंतनशील बनविले होते. परमेश्वराच्या अथांग शक्तीचे गूढ विचारांची स्फुल्िंगे पू. महाराजांच्या मनात प्रगट् झाली होती. वाडीत गुरूमहाराजांच्या पादुकांशी झालेली एकता, गुरूकृपेचा वर्षाव व ईश्वरदत्त निसर्गाचे गूढ रहस्य हे ज्ञानशक्तीने जाणल्याने कृष्णाकाठाचे नयनरम्य वातावरणाने महाराजांची लहान वयातच कर्मयोगाची बैठक संपन्न झाली होती.

ज्याप्रमाणे निवृत्तीनाथांच्या कृपाआशीर्वादाने १६ व्या वर्षी गीतेवरील भावार्थदीपिका म्हणून ज्ञानेश्वरी ग्रंथाची निर्मिती ज्ञानदेवांकडून झाली, त्याप्रमाणे पू. दीक्षितस्वामींच्या कृपाआशीर्वादाने १६ व्या वर्षी श्रीमद्भागवत् ग्रंथाचे पारायणास सुरुवात झाली. हे भागवत निरुपणाचे कार्य पू. दत्तमहाराजांनी सांभाळले व पू. महाराजांची भावना होती की, हे कार्य माझ्या गुरूंनी मजकडून करवून घेतले आहे.

**दत्तात्रेय सांगे लोका भक्ती भागवत ।**

**निरुपण सांगावयाला दिले बळ गुरूनाथा ।।**

वेदाभ्यास, व्रत उपोषण, ज्ञान जिज्ञासा, शुचित्व यामुळे ज्ञानसंपन्न झालेल्या कार्याने महाराज नैष्कर्म्य सिद्धी या पदावर आरूढ झाले होते. पू. महाराजांचा प्रारंभीचा जीवनाचा काळ पारतंत्र्याचा होता. समाज परिवर्तन झपाट्याने होत होते. तरी मूलगामी तत्त्वात पू. महाराजांनी

कोठेही तडजोड केली नाही. त्याही काळात आपल्या जीवनात व साध्या राहणीने सर्व कर्माचरण केले होते. देशातील कोणत्याही मंदिरात जावो वा दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात जावो, कोठेही आचरणात आणि वेशभूषेत बदल केला नाही.

## शंकराचार्यांच्या पद्धतीने सर्व धर्मीयांच्या विचारांचे खंडन केले :-

बौद्ध धर्मीयांनी वैदिक कर्मकांडावर झोड उठविली होती. त्यामुळे समाजात लोक आत्मचिंतनच श्रेष्ठ समजून समाजापासून दूर जावे लागले होते. पू. महाराज जेव्हा भागवताचे निरूपण सांगत तेव्हा अनासक्तपणे कर्माचरण केल्याने भगवत् भक्ती कशी प्रगट होवू शकते हे सांगितले. त्यासाठी गृहस्थाश्रम सोडणे अथवा समाजापासून दूर जाण्याची गरज कशी नाही हे पटवून दिले आहे. बौद्धांच्या अकर्मतेचा सिद्धांताचा प्रवाह रोखून अनासक्त कर्मसहित भक्ती मार्गाकडे समाजाची प्रवृत्ती वळविली आहे व स्थिरही केली आहे. सांसारिक वासनांचे व विषयांचे परिवर्तन ईश्वरभावात करून लोकांची तनु-मने सुस्नात केली आहेत.

भागवतातील भवटवी व ऋषभदेवांचे चरित्र सांगताना जैन धर्माला पू. महाराजांनी वैष्णव धर्माचे रूप देवून त्याचे व्यापकत्व दाखवून दिले आहे.

अणुकारण वादाबाबत ईश्वरच परमाणुरूपाने सर्वत्र असल्याचे सांगून, त्याच्या अनुषंगाने अनासक्त कर्माचा वस्तुपाठ सांगितला आहे.

चार्वाक विचारावर पू. महाराजांनी मानवी जीवनातील सुखासीनतेचा दोष सांगून भोगवादी संस्कृती वाढीस लागली हे सांगताना कपिल, बुद्ध, पृथुराजांची उदाहरणे सांगून भागवतातील समन्वय स्पष्ट करीत असत.

**ये ब्रह्मरसाचे पारणे । निमित्त केले नारायणे ।।**

हे माऊली ज्ञानेश्वरीत ज्याप्रमाणे म्हणतात त्याप्रमाणे भागवताच्या निमित्ताने पू. महाराज सर्वांना या ब्रह्मरसाच्या मेजवानी बरोबर या भक्तीरसातून तत्त्वज्ञान, अद्भुतरस, व शांतरसाची श्रोत्यांना अनुभूती देत असत. अशा शुद्ध पवित्र कर्माचरणाचा हा परिपाक होता.

## पू. महाराजांचा गृहस्थाश्रम :-

पू. दत्तमहाराजांनी सुमारे ६९ वर्षे गृहस्थाश्रम यथासांग संपन्न केला होता. कुळधर्म कुळाचार यांचे काटेकोर पालन केले. ती. अखंड सौभाग्यवती लक्ष्मीबाई (आईसाहेब) यांचीही साथ उत्तम मिळाली होती. नाथांच्या गिरीजाबाई असो वा तुकोबांची आवडाबाई असो, दोघींचे निर्हेतुक प्रेम जे आपल्या पतिवर होते त्याचाच अंश सौ. आईसाहेबांकडे होता. नाथांच्या वाट्याला घरातून (हरिपंडितांकडून) झालेला विरोध पू. महाराजांच्या वाट्याला नव्हता. उलटपक्षी गृहस्थाश्रमात पू. महाराजांना घरातून सर्वांची अनुकूलता होती. म्हणूनच महाराजांच्या या ज्ञानसंपन्न कर्मयोगाच्या छायेत सर्वजण कसे निरामय शांततेची अनुभूती घेत आहेत.

विपत्ती व ऐश्वर्य काळातही समचित स्थिती पू. महाराजांची होती. गोकुळ सोडताना शरदाच्या चांदण्यात जीव-शिव मिलनाची कृपा कृष्णाने गोपींवर केली व काल्याच्या प्रसादाने जीव-शिव मिलनाची अनुभूती गोपांना दिली. त्याप्रमाणे चि. अजित (पू. महाराजांचा-मुलगा) व कुटुंबियांच्या आग्रहाखातर घरी भागवताचा सप्ताह करून या उत्तुंग भक्ती प्रेमाच्या रसाची शेवटी अनुभूती दिली. वयोपरत्वे पुढे सप्ताह थांबला व नामसंकीर्तन अखंड वाढले.

पू. महाराजांनी स्वतः काही तत्त्वांचा स्वीकार केला होता. विनाकारण कोणाकडून कोणी काही घेवू नये. कर्ज काढून संसार करू नये. आपण अंथरुण पाहून पाय पसरावेत, असा आचार महाराजांनी सांभाळला होता. तसा बोधप्रद संदेश लोकांना दिला होता. आजच्या कर्जाच्या

सुविधा पाहता व त्यातून निर्माण होणाऱ्या लोकांच्या अस्वस्थतेवर पू. महाराजांचे कर्माचरण कसे श्रेष्ठ मार्गदर्शक आहे याचे अवलोकन करता येते. देवाला नवस-सायास करून देवावर भार वा संकट घालू नये. देवाची प्रार्थना करावी. त्याचे आपल्याकडे लक्ष आहे हा बोध सदैव देत असत.

## पाश्चात्त्य चिंतनातून कर्मविषयी तत्त्वचिंतन :-

'कन्सेप्ट ऑफ माईंड' या पुस्तकात गिल्बर्ट राईल याने प्लेटोपासून विविध प्रश्नांची चर्चा केली आहे. या धर्म व कर्म विषयाचा संबंध केवळ ईश्वरा विषयीची अभिवृत्ती नाही असे तो म्हणतो. मनुष्याचा नियतीशी अगत्याने संबंध आहे. परंतु हा संबंध केवळ जीवनाशी पाश्चात्त्यांनी जोडला आहे. परलोकी जीवनाशी हा संबंध जोडलेला नाही. धर्म व कर्म या विचारांऐवजी प्रामुख्याने नीती व नैतिक सद्‌गुण जीवन मूल्ये ग्राह्य मानली आहेत.

भारतीय वैदिक तत्त्वज्ञानात नैतिक मूल्ये व नीतिमत्तेला कर्माचरणाची जोड आहे. कार्य व कारण परंपरेतून वैदिक कर्म विचार साधार सिद्ध होतो. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात हा विचार नाही. प्रत्यक्ष प्रमाणाचा सिद्धान्ताचा पाश्चात्त्यांनी स्वीकार केला आहे तर वैदिक परंपरेने धर्म व कर्म विचारात प्रथम 'शब्द प्रमाणाला' महत्त्व दिले आहे "शब्द प्रमाणांनी प्रयोगशील कर्माची सिद्धता होते" हा पू. महाराजांचा सिद्धांन्त आहे. कर्माचरण म्हणजे चिंतनशील असे व्यक्त व अव्यक्त सृष्टीतील एक प्रयोग आहेत असेच म्हणावे लागेल.

## कर्मातील पू. दत्तमहाराजांची कर्म प्रवणता :-

पू. महाराज सदैव कर्मरत असत. प्रातः, माध्यान्ह व सायं संध्यावंदन करीत असत. पूजाअर्चा, पोथी वाचन करीत असत. 'धूतवस्त्राची' महाराजांना विशेष आवड असे. टिळक विद्यापीठात कामास जात तेव्हा

सर्व आन्हिक आवरून जात असत. तेथूनच कधी कधी 'मानद व्याख्याता' म्हणून अष्टांग महाविद्यालयात जात असत. संध्याकाळी कोठे कार्यक्रम असल्यास जात असत. पू. गुळवणीमहाराजांचे दर्शन, नंतर घरी आल्यावर सायंकाळी संध्यावंदन, धुपारती करीत असत. रात्रीचे भोजन वा उपहार, नंतर काही ग्रंथ वाचन, टपालाला उत्तरे लिहीत असत. विद्यापीठाची सेवानिवृत्ती झाल्यावर रोज वासुदेव निवासात जात. तेथे सर्वांना मार्गदर्शन करावयाचे व रात्री घरी परतल्यावर सर्व पत्रव्यवहार स्वतः करीत. टपालाचा खर्च स्वतः करीत. कोणाला दीक्षा, कोणाच्या अडीअडचणी, अभिप्राय लेखन, रोज नियमाने चालत असे. प्रकृती अस्वस्थ असली तरी नित्य आन्हिक चुकले नव्हते. पू. गुळवणीमहाराजांचे उत्तराधिकारी पद स्वीकारताना भरत (श्रीरामाचा बंधू) याचा आदर्श समोर ठेवून हे कार्य गुरूंचे आहे समजून ते आपल्याकडून करवून घेतात हा दृढ विश्वास होता व सर्व क्रियाही तशा घडत होत्या.

असं आहे की, 'ब्रह्मज्ञानी असलेला मनुष्य कर्म करीत नसतो' हा आचार्य महाराजांचा एक सिद्धान्त आहे. ब्रह्म हे जगाचे उत्पत्तीकारण आहे आणि उपादानकारण आहे, तरीही ते उदासीन आहे. कारण मनात कर्मफळाची इच्छा धरून केलेल्या काम्यकर्मामुळे कर्म कार्यप्रवण होते. जर कर्म केले की त्याची सुख व दुःख फळे भोगावी लागतात. तर हे जग म्हणजे सुख दुःखाचा एक सागर आहे. या सागरातील जन्म व मृत्यूच्या चक्राला संसार म्हणतात.

परंतु आचार्य म्हणतात, ''कर्मफळाच्या इच्छेचा त्याग करून जो कर्म करतो त्याला कर्माच्या सुख-दुःखाच्या फळाचे भोग भोगावे लागत नाहीत. तो ब्रह्मासारखा उदासीन राहून कार्य करतो. ब्रह्म ज्याप्रमाणे जगत् उत्पत्ती कर्मात अलिप्त राहते कारण ते निष्क्रीय आहे. तसा ब्रह्मज्ञानी मनुष्य ब्रह्म जाणल्यावर ब्रह्मज्ञ होतो व आपल्या बांधवांच्या व समाजाच्या कल्याणाकरिता तो कर्म करीत असला तरी त्या कर्माच्या बंधनापासून तो

मुक्त व अलिप्त राहतो. त्यामुळे तो ही निष्क्रिय होतो.

**विदुषां क्रियमाणं कर्म परमार्थ अकर्म एवः ।**

आचार्य यावर म्हणतात, ''समाज जीवन सुरळीत चालावे म्हणून महात्मे कर्म करताना दिसले तरी ते प्रत्यक्ष कर्म करीत नसतात, तर ईश्वराचे रूप होवून ईश्वराचे कार्य -

**'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।।'** प्रमाणे संत कार्य करीत असतात. असे पू. दत्तमहाराज कर्मयोगी होते. तसेच भगवंताला जे कर्म प्रिय असते ते कर्म मनुष्याने करीत रहावे. असा त्यांचा कर्मयोग होता. तेव्हा त्यांना अनंत कोटी प्रणाम !!!

# प्रकरण - तिसरे

# वेदान्त सौरभ

**धार्मिक आणि आध्यात्मिक सत्यावर आधारलेले सदाचार आणि नीतिनियम सत्यांवर आधारलेले सदाचार आणि मानवाच्या संपूर्ण तसेच, अनंत स्वरूपाला लागू पडतात. हे नीतिनियम अर्थातच व्यक्तीसाठी तसेच समाजासाठी लागू पडतात.**

**– स्वामी विवेकानंद**

लंडन येथे झालेल्या भाषणात स्वामी विवेकानंदांनी हे उद्‌गार काढले होते. ज्ञानयोग कसा विविधअंगी आहे, हे विवेकानंदस्वामींच्या पुस्तकात सांगितले आहे.

मनुष्य मोठा कधी वाटतो तर, सामान्य मनुष्याच्या आचार विचारांपेक्षा मनुष्याच्या बुद्धिच्या सीमा ओलांडल्या असतात. अशा वेळी मानवी मनाची ही शक्ती विश्वमनाशी एक झालेली असते. त्यामुळे मनुष्याचे विशालत्व समाजात प्रस्थापित होते.

ज्ञानदेवांची पहिली साहित्याची देणगी म्हणजे भावार्थदीपिका, ज्ञानेश्वरी! यामध्ये "**आता विश्वात्मके देवे। येणे वाङ्‌यज्ञे तोषावे।।**" हे पसायदान म्हणजे विशाल अशा मनाचे, विचारांचे उदात्तीकरण, औदार्याचे परिपूर्ण दर्शन आहे. तसे आजच्या काळातही दत्तमहाराजांचे दर्शन होते. आचार, विचार, बुद्धिचे प्रगल्भत्व, ज्ञानाची परिसीमा यातून हे ज्ञान प्रकाशित होत होते.

श्री भगवान निंबार्क विरचित वेदान्त–पारिजात सौरभ अर्थात् ब्रह्मसूत्र निंबार्क भाष्यम् याचा अनुवाद वेदान्त वाचस्पति पंडित दत्तात्रेयशास्त्री यांनी केला आहे. या संपादित पुस्तकाची प्रस्तावना सुमारे ११८ पानांची आहे.

भारतवर्ष हे एकच असे राष्ट्र आहे की अनादिकालापासून आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहे. "**अध्यात्मविद्या विद्यानां**" अशा श्रेष्ठ आध्यात्मविद्येची आवड भारतीयांच्या रोमारोमांतून भरलेली आहे. आध्यात्मविद्येचे प्रकाशन करणारे वेद हे भारताचे अविनाशी अमूल्य धन आहे. या व्रेदांमध्ये संपूर्ण विश्वांचे ज्ञान भरलेले आहे.

पू. महाराजांनी जे वेदान्तविषयी चिंतन या वेदान्त पारिजात सौरभ पुस्तकात लिहीले आहे, हा एक अनमोल ठेवा आहे. निरनिराळ्या वेदान्तांच्या चर्चा किंवा सभेत 'बृहस्पती' म्हणून शोभावेत असे एक व्यक्तीमत्त्व पू. महाराजांचे होते. ज्ञानाच्या दृष्टीने युक्तीवादही वादातीत असे. या विचारात पू. महाराजांची दृष्टी वेगळी होती, ते असे म्हणत–

**"... सर्वांना इष्ट असणारी आत्यंतिक दुःखाची निवृत्ती व पूर्णानंदाची प्राप्ती या फलांची सिद्धी, वैज्ञानिक सामर्थ्यानेच केवळ होणे अशक्य आहे. ते सर्व विचारशील माणसांना आज पटले आहे. त्यामुळे भौतिक साधनांचा अभाव असतानाही मनुष्याचे जीवन शांतीने जावू शकते, पण आध्यात्मिक सामर्थ्यावाचून मात्र जीवन 'अशांतिमय' होत असलेले आजही अनुभवास येत आहे. म्हणून आत्मोन्नती करून घेणे, यातच जीवनाचे खरे साफल्य आहे. "भौतिक विज्ञान" हे एक जीवनाचे गौण साधन आहे..."**

या विचारांतून जीवनमूल्यांचा संदेश व्यक्त होत आहे. जीवनात प्रत्येकाला शांतता लाभावी असे वाटत असते. सर्वसामान्य लोकांनी भक्तीमार्गाने जावून ज्ञान प्राप्ती करून घ्यावी. विशेष अभ्यास ज्यांना करावयाचा आहे, त्यांनी वेद–वेदान्ताचा विचार करीत, त्यातील "कैवल्याचे चांदणे" हे चकोर बनून टिपत राहावे. तथापि, भक्ती हीसुद्धा समर्थ बनली पाहिजे, हे पू. महाराज अत्यंत तळमळीने व्यक्त करीत असत. मनुष्याने ईश्वराच्या अधिष्ठानाबरोबर कर्तव्याच्या अंगाने कर्म करीत,

ज्ञानाच्या आनंदाने जीवन समृद्ध करावे हा संदेश पू. महाराजांच्या विचारधनातून व्यक्त होत आहे.

कर्तव्याच्या अंगाने जेव्हा मनुष्य विचार करतो, तेव्हा मनुष्याला हक्काचा अधिकार प्राप्त होतो. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत संपांचे ध्येय, धोरणांमुळे समाज राज्य, व राष्ट्राची हानी होते. या विचारांवर पू. महाराजांचे चिंतन निश्चितच सार्थ ठरणारे आहे.

विसाव्या शतकातील या थोर विभूतीने केवळ वेदान्त सांगितला नाही तर, हा वेदान्त आचरला व शिकवला आहे. पू. महाराज म्हणजे चालता बोलता वेदच चैतन्यरूपाने प्रकट झाला असावा असे वाटत होते. वेद व पुराणात व्यक्त होत असलेले ऋषि-मुनींचे व्यक्तीमत्त्व होते. अशा कार्यासाठी व विचारांसाठी मनुष्याच्या बुद्धिची निश्चयात्मकता असावी लागते.

**आम्ही वैकुंठवासी आलो याचि कारणासी**

**बोलिले जे ऋषि साच भावे वर्ताया ।।**

असे तुकाराममहाराज जे 'स्पष्टपणे' सांगतात, त्याप्रमाणे पू. महाराजांचे हे कार्य 'मौनपणे' केवळ आचार-विचारांच्या माध्यमातून व्यक्त होत होते. आचाराचा, पावित्र्याचा, आदर्शाचा एक वस्तुपाठ पू. महाराजांनी समाजापुढे मांडला होता. त्यांच्या विचारातून असेही दिसत असे की,

**जे ज्ञान गंगा नाहले। पूर्तता होवुनि गेले ।।**

असे लोकांचे झाले की, परतत्त्वाच्या स्पर्शाने सारे पुनीत झालेत. त्याबरोबर पू. महाराजांची दृष्टी व विचारसंपदेत परतत्त्वाचा स्पर्श करून देण्याचे सामर्थ्य आहे.

मनुष्याने आचरणात सत्याची कास धरली पाहिजे. संसारातील

दोष मनुष्याला समजणे आवश्यक आहे. उपभोग, दुःख, विलास संपत्ती, सत्ता, दारिद्र, हे क्षणभंगुर जीवन हे सारे अशाश्वत आहे. यासाठी ज्ञानमार्गाने शाश्वताचा शोध घेणे व मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असणे आवश्यक आहे. पू. महाराजांच्या विचारातून ज्ञानाने व आचरणाने मनुष्याचे मन पवित्र झाले पाहिजे, बुद्धी निश्चियात्मक झाली पाहिजे. हा मानवी जीवनासाठी ज्ञानयोगपूर्ण संदेश आहे.

पू. महाराजांचा ज्ञानपूर्वक दृष्टीकोन असा आहे की, मानवामानवात प्रेम निर्माण झाले पाहिजे. कर्तव्याच्या अंगाने जे लोक व जो समाज वागेल, तेव्हाच समाज व समाजाचे स्वास्थ टिकेल. एकमेकांच्या दोषांकडे दुर्लक्ष करणे वा क्षमावृत्तीचा अंगिकार केल्याशिवाय आपण एकत्र राहू शकणार नाही. यासाठी आत्मसंयमनाची गरज आहे. आत्मसंयमन हीसुद्धा एक प्रचंड शक्ती आहे. यासाठी मनुष्याने सदैव जागृत असावे. हा एक विचाराचा दृष्टीकोन आहे.

## वेदान्त सौरभ : पू. दत्तमहाराज कवीश्वर :

निंबर्काचार्यांच्या ब्रह्मसूत्रावरील वेदान्त :

पारिजात सौरभ याचा अनुवाद व संपादनाचे कार्य पू. महाराजांनी केले. या पुस्तकात द्वैताद्वैत मत व्यक्त करताना, महाराजांची प्रगल्भ ज्ञानाची उंची दिसून येते. द्वैताद्वैताचा विचार व्यक्त करताना खंडन-मंडन पद्धतीने विचार व्यक्त केला आहे.

निंबार्काचार्यांच्या एका सूत्रावर पू. महाराज लिहीतात - "…. विश्वातील भेद व अभेद दोन्हीही स्वाभाविक मानले म्हणून ब्रह्माच्या चित् शक्तीचा जीव हा अंश आहे. म्हणून जीव व ब्रह्म यात द्वैत आहे. परंतु सूर्याची प्रभा व सूर्य यात तादम्यता आहे, त्याप्रमाणे जीव ब्रह्म यात अद्वैत आहे.

तसेच, जीव, जगत व ब्रह्म यासंबंधात द्वैत व अद्वैत दोन्हीही सारखेच असतात. हा विचार द्वैताद्वैत सिद्धान्तात मांडून तत्त्वज्ञानाच्या विचारात त्यांनी अजरामर केले.

तसेच, पू. महाराजांनी सर्व आचार्यांचे विचार प्रवाह अद्वैत सिद्धान्ताकडे कसे जातात हे आपल्या कौशल्यपूर्ण विवेचनातून सांगितले आहे. अग्नि–उष्णता, सूर्य–त्याची प्रभा, दीप–त्याची ज्योती यांतील स्थान वेदान्तांचे चिंतनातून व्यक्त केले आहे. अशा वेदान्त सौरभाला शतकोटी प्रणाम !!!

# प्रकरण - चवथे

ॐ

# पू. दत्तमहाराजांची वेदनिष्ठा

पू. दत्तमहाराजांची वेदावर पूर्ण निष्ठा होती. स्वतः महाराज हे यजुर्वेद माध्यांदिन शाखेचे होते. त्यांचे कुळात सात पिढ्या वेदाध्ययन चालले होते. यजुर्वेदाबरोबर त्यांचा न्यायशास्त्र, मीमांसा दर्शनाचाही अभ्यास होता.

वेदातील ज्ञान ते भक्तीच्या मार्गातून सांगत असत. याचाही एक संस्कार श्रोत्यांच्या अंतःकरणावर होत असे. अनेक विद्वत्सभा त्यांनी गाजविल्या होत्या. त्या सभांमधून त्यांना अनेक ठिकाणी गौरविण्यात आले होते. पू. महाराज हे जे काही बोलत असत, ते वेद प्रतिपाद्य, सप्रमाण बोलत असत.

**'वेदोऽखिलम् धर्म मूलम्।'** यानुसार त्याचा वेदांकडे पाहण्याचा दृष्टिकोण होता. धर्माचे मूलस्थान हे वेदच आहेत यावर त्यांची परिपूर्ण निष्ठा होती. श्रीमद्भागवत सप्ताह आणि श्रीमद्देवी-भागवत या निरूपणाचे वेळी जो वेदस्तुती व वेदाविषयी विचार झाले आहेत, त्यातून त्यांची वेदनिष्ठा दिसून येते. पू. महाराजांना वाटत असे की, "ज्या भगवंतानी ही सृष्टी निर्माण केली, त्यांत जीवही निर्माण केलेत. त्यांना विशिष्ट कर्मे करता यावीत, यासाठी भगवंतानी त्यांना बुद्धी, इंद्रिय, मन, प्राण इ. दिले आहे. वेदांच्या (ज्ञान) साहाय्याने त्या त्या इंद्रियाकरवी मनुष्याने कर्मे करून मनुष्याला चतुर्विध पुरुषार्थ साधता येईल. मनुष्याने वेदातील तत्त्वज्ञान श्रद्धेने मनात धारण करावे आणि शाश्वत सुखास प्राप्त करून घ्यावे. वेद मनुष्याला शाश्वत, अविनाशी सुख प्राप्त करून देऊ शकतात. वेद हे निर्गुण निराकार परमेश्वराचे प्रतिपादन करतात. पण फळ मात्र

शाश्वत सुखाची प्राप्ती करून देतात'' असे सांगत असत.

वेदाचे स्वरूप हे ज्ञानमय आहे हे केवळ शब्द ज्ञान असू नये म्हणून पू. महाराज तुकारामाचे उदाहरण सांगत असत. तुकाराममहाराज म्हणतात–

**वेदाचाची अर्थ आम्हांसी ठाव।**

**इतरांनी वाहवा भार माथा।।**

वेद ऐहिक ऐश्वर्य देतील असे नाही. पण शाश्वत आनंद देऊ शकतात म्हणून केवळ शब्द पांडित्याचे ज्ञान असू नये तर त्याची अनुभूतीही हवी आहे. यासाठी वेदज्ञानावर मनुष्याची पूर्ण निष्ठा, प्रेम हवे आहे. वेदातून परमात्मा हा सर्वच एकच आहे असे सांगितले आहे, त्याला ते उदाहरण देत असत, आकाशाला तू 'अमुक' एक आहेस असा निर्देश करता येत नाही. तसा हा परमात्मा वेदातून उधृत होतो. मोठ्या कौशल्याने त्याला जाणून घ्यावे. तसेच वेदज्ञान कधी शिळे किंवा जीर्ण होत नाही. वेदाचे तात्पर्य हे समजणे आवश्यक आहे.

पू. महाराज म्हणत, ज्ञानी लोक वेदावर श्रद्धा ठेवून कर्म करतात, त्यामुळे त्यांना जन्म वा मृत्यूचे भय नसते. यासाठी एक करावे की, उधळलेल्या अश्वाप्रमाणे चंचल असणारे मन या वेद उपासनेने आणि सद्गुरूंच्या सान्निध्यात आवरण्याचा, स्थिर करण्याचा प्रयत्न करावा, असे सांगत असत.

वेद हे सत्य स्वरूपी आहेत. ते ज्याच्याकडून प्रकट होतात, तो वेदज्ञ होतो. तेव्हा या वेदस्वरूप परमेश्वराला मनापासून धारण करावे. अशाची सेवा करावी. सर्वांना हे ज्ञान प्राप्त करता आले नाही तर जे हे कार्य करतात, त्यांना साहाय्य करावे त्यामुळे पू. दत्तमहाराज हे वैदिक वा याज्ञिक मंडळींचा आवर्जुन सत्कार करीत असत. शंकराचार्यादि अधिकारी मंडळींचे पूजन करीत असत. या सर्वांचा ते 'वेदो नारायण' म्हणून उल्लेख करीत असत.

पू. महाराजांची अशी धारणा होती की, **एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा। कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च।। (श्वेताश्वतर ६.११)**

परमेश्वर एक असून सर्वभूतांमध्ये तो गुप्तरूपाने राहतो, तो सर्वांना व्यापून उरला असून प्राणिमात्रांचा अंतर्यामी आहे. तो सर्व कर्मे पाहणारा असून सर्व प्राण्यात वास करतो. तो सर्वसाक्षी ज्ञानस्वरूप, अविकृत व निर्गुण असा आहे. आपण उत्पन्न केलेल्या सृष्टीत हा परमात्मा प्रवेश करतो व त्यातच तो तादकार होतो.

'वेदांत पारिजात सौरभ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पू. दत्तमहाराज म्हणतात, "वेद संपूर्ण दिव्य ज्ञानमय आहेत, पण त्यातही वेदाचा शिरोभाग अशा उपनिषदांमध्ये ज्ञानाचा पूर्ण विकास झालेला आहे. विश्वातील सर्व मानवसमाजाला नवचेतना देऊन आत्यंतिक शांतीच्या मार्गाकडे नेण्याचे सामर्थ्य हे फक्त उपनिषदातील सिद्धांताच आहेत.

वेदाची दोन रूपे आहेत (१) भगवंताचे ज्ञान (२) एक भगवंताची उपासना. भगवंताचे ज्ञान कसे आहे तर तो सर्वव्यापी व सर्वातर्यांमी आहे. तसेच ते शब्दकोशात अर्थ पाहून समजून घ्यावयाचे नाही तर महात्म्यांच्या मुखातूनच वेदांत श्रवण झाला पाहिजे; तर त्याचा काही तरी परिणाम बुद्धिवर होऊ शकतो. वेदाभ्यासासाठी मनुष्याच्या बुद्धीत उत्पन्न झालेले अनुकूल, प्रतिकूल विचार हे बाजूला सारून या वेदांच्या विचारांचे चिंतन झाले पाहिजे. याचा हा संस्कार घडला पाहिजे.

पू. महाराज म्हणत असत, भारत राष्ट्र म्हणजे दैवी संपत्तीने परिपूर्ण भरलेले आहे. ही दैवी संपदा म्हणजे वेद हे आहेत. याबद्दल उदासीनता या सांप्रतकाळात आल्याने अनेक आत्पत्तींना तोंड द्यावे लागत आहे. मन बुद्धितील दुर्विचार नष्ट झाले की सर्वांचीच मने शुद्ध व पवित्र बनू शकतील. यासाठी या वेदरूपी दैवी संपत्तीचे अखंड अर्चन चालले पाहिजे असे ते

म्हणत असत. त्यामुळेच त्यांनी आश्रम व इतर अनेक ठिकाणी अनेक यज्ञयागादि कर्मे, ज्ञानसत्रेही पू. महाराजांच्या केवळ संकल्पानी पूर्ण झाली असा अनुभव सर्वांना येत होता.

**'वासुदेव जगत्सर्वम् । किंवा दाता एक रघुनंदन ।'** या विचारावर दृढ होणे हे वेदाभ्यासातून प्रकट झालेल्या भक्तीचे स्वरूप होते. मनुष्याने या धारणेने उपासना करावी. यात आंतरीक जिव्हाळा, प्रेम असावे. यासाठी मनुष्याने श्रवण, मनन व निदिध्यासाने उपासना करावी असे पू. महाराज म्हणत असत. तसेच एकदा गाणगापूरवारीच्या वेळी पू. महाराजांचे अंगात ताप होता. वे.शा.सं. भीमभट्ट पुजारी यांचेकडे त्यांचा मुक्काम होता. त्या दिवशी त्यांचे घरी महाराजांनी मंत्रजागर ठरविला होता. मंत्रजागर सुरू झाला तेव्हा पू. महाराज तसेच हळूहळू उठले आणि सर्व वैदिक ब्रह्मवृदांना साष्टांग नमस्कार करून मग ते खोलीत जावून बसले. ते सर्व वेद पठण ऐकत होते. अशी ही त्यांची वेदनिष्ठा म्हणता येईल, असे होते वेदाचे उपासक! स्वतः असे वागून त्यांनी आदर्श प्रस्थापित केला. त्याचप्रमाणे संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून जे भाव व्यक्त होतात तेच पू. दत्तमहाराजांचे भाव होते असे म्हणता येईल तो अभंग म्हणजे -

**वेद अनंत बोलिला ।**
**अर्थ इतुकाचि साधला ।।**

**विठोबासी शरण जावे ।**
**निजनिष्ठे नाम गावे ।।**

अशी ही पू. दत्तमहाराजांची वेदनिष्ठ होती.

वेदावर तशीच शास्त्रावरही पू. महाराजांची पूर्ण निष्ठा होती. वै. सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब निवर्तल्या त्या वेळी, मी, वे. शा. सं. कृष्णराव आर्वीकर, भगवान पाध्ये, आदि मंडळी वैकुंठ स्मशानभूमीतील सौ. आईसाहेबांचे और्ध्वदैहिक कार्य आटपून रेणुका निवास स्थळी आलो.

तेथे पू. महाराजांची भेट घेऊन, 'निघतो' असे सांगितले. तेव्हा महाराज म्हणाले, 'या! झालं सर्व! आमचा ६९ वर्षांचा ऋणानुबंध संपला! कालपासून आपण काही घेतले नसेल तेव्हा निघावं.'' तेवढ्यात घरातील कोणी तरी 'चहा घेऊन जा' सांगितले आणि तसेच कोणीतरी सांगितले की, सौ. आईसाहेब या भगवती लक्ष्मीरूप होत्या. त्यांचे सुतक धरू नये. त्या मुक्तच आहेत.'' हे ऐकून तत्काळ पू. महाराज म्हणाले, ''अहो, शास्त्र असे सांगत नाही. देह पंचमहाभौतिक आहे. त्याला शास्त्राप्रमाणे सोयर-सुतक हे आहेच. त्याचे सर्वांनी पालन केले पाहिजे. भावना वेगळी, शास्त्रविचार वेगळा. ही मंडळी स्नानादि कर्म झाल्याशिवाय काही घेणार नाही, हे बरोबर आहे. त्यांना असा आग्रह करू नये.''

केवढी ही शास्त्रनिष्ठा होती. यावेळी मला तत्काळ श्रीमद्भागवतातील द्रौपदीचा पुत्र शोकाच्या घटनेची आठवण झाली व अश्वत्थाम्याने द्रौपदीच्या पाचही पुत्राची हत्या केली होती. त्याला श्रीकृष्णाने व अर्जुनाने धरून आणले आहे. तेव्हा शोकाकुल स्थितीत असूनही ती शास्त्रवचनानुसार बोलू लागली की, 'हा अश्वत्थामा गुरू पुत्र आहे त्याला सोडावे. त्याची माता जिवंत आहे. मी पुत्रशोकात आहे, तसा तिला पुत्रशोक होऊ नये तेव्हा शास्त्र धर्मांनी गुरूपुत्र हा हाही गुरूरूपच आहे. त्याला सोडावे, त्याला काही करू नका.'

**''आठवण तुम्ही द्यावी पांडुरंग।''**

या तुकोबांच्या वचनाप्रमाणे पू. महाराजांना सतत भगवंताची वेदशास्त्राची आठवण असे या दुःखद प्रसंगीही ते शास्त्र धर्मानुसारच वागले व तसेच वागावे हे सांगितले. केवढे हे धैर्य!

तसेच पू. नारायणमहाराज केडगाव, हे बंगलोर येथे यज्ञ करीत होते. तेथे पू. महाराज हे या यज्ञ समारंभात उपस्थित होते. तथापि, पू. नारायणमहाराज हे या समारंभातच कालवश झाले. पुढे त्यांचे कलेवर हे केडगाव येथे आणण्याचे ठरले, परंतु पू. दत्तमहाराजांना विचारले असता,

त्यांनी स्पष्ट सांगितले, ‘‘शास्त्रानुसार हे शव केडगावला नेता येणार नाही. त्यांचे और्ध्वदैहिक कर्म हे तेथेच उरकावे व पुढील दिवस केडगाव येथून आपल्या सर्वांच्या सोयीने ठरावे. परंतु हे शव येथून नेता येणार नाही ही शास्त्राची आज्ञा आहे. तेव्हा सर्वांनी, पू. दत्तमहाराजांचे म्हणजे मान्य करून त्याचप्रमाणे कार्यवाही केली होती. अशी ही वेद, शास्त्र निष्ठा होती. असे अनेक प्रसंगातून दिसून येत होते.

# प्रकरण - पाचवे

## ॐ

# संचरिष्णू धर्मज्ञ

महाभारतात भीष्माचार्यांना कोणी प्रश्न विचारला की, कोऽ धर्मः ? कुतो धर्मः ? अर्थ - धर्म कोठून येतो ? हा धर्म कुठे आहे ? यावर भीष्माचार्य म्हणतात- **'मतिभिरुद्धृतम् धर्मः ।'** अर्थ-समाजात विचारवंतांनी चिंतन करून, अभ्यासाने धर्माची निर्मिती केली आहे, विवेकाने धर्म प्रज्ञारूपाने वसत असतो.

तस पाहता ३०-३५ वर्षांच्या अनुभवातून असे जाणवू लागले की, पू. महाराजांनी वेदधर्माचरण करून गृहस्थाश्रम कसा केला असेल ? सदासर्वकाळ चित्ताचे समतोलत्व कसे राखले असेल ? असे विचार माझ्या मनात घोळू लागले. तेव्हा वर नमूद केलेला महाभारतातील प्रसंग व त्यातील विचाराकडे लक्ष गेले.

आपल्या वैदिक परंपरेत असलेल्या जीवनमूल्यांचे सामान्यतः आचार पालन करता येत नाही का? का ते कालबाह्य वाटू लागते? अशी समाजाची धारणा आहे. परंतु वेदधर्म, वैदिक परंपरा म्हणजेच एक विचाराधारा आहे. ही विचारधारा बुद्धिप्रधान व आचारप्रधान आहे. वैदिक धर्मात प्रत्येकास विचार स्वातंत्र्य आहे. त्यामुळे बुद्धिवंत, प्रबुद्ध, विवेकी मनुष्यांनी आपले विचार निर्भयपणे मांडले आहेत. या सर्वांचा स्वीकार भारतीय वैदिक धर्म स्वीकारतो. त्याचे मनन चिंतन करतो व त्याची पुनर्स्थापना करतो. यातून धर्मतत्त्व प्रवाहशील व चैतन्ययुक्त राहते.

पू. महाराजांचा 'मीमांसा' व 'न्यायशास्त्राचा' विशेष अभ्यास होता. मीमांसेमध्ये दोन भाग आहेत. एक 'पूर्व मीमांसा', दुसरा 'उत्तर

मीमांसा !' पूर्व मीमांसेत कर्म विषयीचा विचार आहे; तर उत्तर मीमांसेत ज्ञान विषयीचा विचार आहे. या दोन्हीचा म्हणजे कर्म व ज्ञानाचा समन्वय पू. महाराजांनी साधला होता.

आपल्याकडे एक एक विचारांनी सामाजिक क्रांती घडविली आहे. पाश्चात्य देशात समाजात जेव्हा एखादा नवीन विचार समोर आला तर त्याची होळी करण्यात आली होती. हे सॉक्रेटिस, प्लेटो यांची जीवनचरित्रे पाहिल्यावर दिसून येते. तथापि, आपल्याकडे प्रत्येक काळी ज्याच्या जीवनातून जे विचार व्यक्त झाले ते म्हणजे वेदरूप आहेत. एकूण तत्त्वज्ञानात चार्वाकाचेही मत विचारार्थ मानले आहे. विवेकशील चैतन्ययुक्त चर्चा सदैव आनंद व उत्साह निर्माण करते. समाजात एकात्मतेचे रक्षण होते तसेच, समाजालाही दुःखाचे विस्मरण होते. यातून पू. महाराजांचे जीवन म्हणजे जुन्या नव्याचा सुंदर समन्वय होता.

**पालनीय स्वकर्तव्यं धृत्युत्साहसमान्वितैः**

**नित्यत्वादात्मनो मृत्योर्भेतव्यं नैव मनुष्यः ।।**

कोणत्याही वेळी, कोणत्याही परिस्थितीत मनुष्याने निर्भयपणे असावे. कर्तव्यविमुखता थोडी सुद्धा नसावी. उलट पक्षी प्रपंच करताना सदैव अनासक्त राहून तो करावा. प्रपंच व परमार्थ अनासक्तरूपाने करून प्रपंच व परमार्थ दोन्हीही सद्गुरू व ईश्वरावर सोपवावा. जास्तीत जास्त काळ ईश्वरचिंतनात जाईल असे पाहावे. प्रपंचातील कर्तव्ये करावीत परंतु लक्ष ईश चिंतनात ठेवावे. हा अभ्यास आहे. याने मनुष्य जीवनात समतोल राहतो.

पू. महाराजांनी लौकिक दृष्टीने आपला प्रपंच यथार्थपणे संपन्न केला. कौटुंबिक समस्येचे प्रसंग अनेक आले व गेले. परंतु सर्वांत मन, बुद्धी, चित्ताचे समतोलत्व कुठेही ढळू दिले नाही. याचे कारण स्वकर्तव्याविषयी जागृतता, धर्मनिष्ठा, सद्गुरू प्रेम यांचा उत्कट भाव

यामुळेच हे शक्य झाले. या सर्वाला धर्म विचारांची किनार होती.

पू. महाराजांकडे कोणीही आले व कोणी काही महाराजांना दिले तरी त्यांना अत्यंत संकोच वाटत असे. भारतीय 'धर्म संकल्पना' ही वर्धिष्णू स्वरूपाची आहे. धर्म विचारानी समाजाची धारणा होते. धर्म ही एक ज्ञानशक्ती आहे. ज्ञानशक्ती ही भारतीय-संस्कृतीच्या क्षितीजावरील विचारांची प्रभा असते. याच्या विचारातून अवगाहन केले तर असे दिसते की, सद्गुरू हे धर्माचरणातून शिष्याला मानसिक शक्ती प्रदान करतात. शिष्यांचा, विचार पालन करणाऱ्यांचा मानसिक देहच निर्माण करीत असतात. धर्म व कर्माबद्दल श्रद्धा व निष्ठा होती, परंतु त्याचा अतिरेक नव्हता. म्हणूनच त्यांचा प्रपंच यशस्वी झाला. पू. महाराजांनी कुळधर्म, कुळाचार करताना कुठेही स्तोम माजू दिले नाही. मुला–मुलींची शिक्षणे, नात–नातवंडांच्या शिक्षणातही त्यांनी तितकेच अलिप्तपणे राहून रस घेतला होता. ते लौकिक व्यवहारातही उचित पूर्ण होईल हे पाहिले होते. सौ. जया, सौ. निला, चि. अमोद, चि. अश्विन, चि. कपिल, चि. मनोज, चि. सूरज, चि. निहार यांच्या शिक्षणविषयातही दक्षतेने निर्णय घेण्यात आले आहेत.

संस्कृतीच्या अंगाने मनुष्य हाच संस्कृतीचा घटक आहे. **Universial components of culture.**

कुटुंब, धर्माचरण, श्रमविभाजन यामुळे संस्कृतीचे दृढीकरण होते असे विचार समाजशास्त्रज्ञ मांडतात. असे व्यक्तीमत्त्व ज्यांचे असते त्याने जैविक व भौतिक परिस्थितीचे योगदान लाभते. यामुळे व्यक्तीविकासा बरोबर सामाजिकविकास घडत असतो.

आज भौतिक विज्ञानाचा विकास प्रचंड प्रमाणात झाला आहे, त्यामध्ये गरज आहे ती संस्कारक्षम मानसिक शांततेची. सुमारे १९७४ नंतरच्या काळात महाराजांचे कार्य या दृष्टिने मोलाचे ठरले. कौटुंबिक

गोष्टीत अलिप्त राहून प्रत्येक कर्म यथासांग केले व सामाजिक दृष्टीने संस्कृतीच्या संस्काराने समाजात स्थिर व समाज सुसंघटित करण्याचे कार्य केले. यावर पाश्चात्त्य तत्त्ववेत्ते (लाईट व केलर) म्हणतात.

**The tendency to see once own way of life including behaviour, belief values and normes as the only right way of living.**

आपली जीवन रीत, वर्तनप्रकार, श्रद्धा मूल्ये, नियमने हीच जीवन जगण्याची खरी योग्य रीत आहे; असे मानणे म्हणजे 'स्व-समूह-श्रेष्ठता' होय.

आपण ज्या समाजात (समूहात) राहतो तेथे श्रेष्ठता कशाने प्राप्त होते तर वर्तन (आचार) श्रद्धा जीवनमूल्ये यावर नियमन याने होते.

पू. महाराजांनी जुने व नवे यांचा समन्वय करताना आचार अत्यंत सहजपणे साधा ठेवला होता. भौतिक गोष्टींना अनुसरून ठेवून जीवनमूल्यांचे जतन केले. त्यामुळे समाजात 'स्व-समूह-श्रेष्ठता' प्राप्त झाली होती. पांढरे स्वच्छ धोतर, स्वच्छ उपरणे, भस्मांकीत तनू, कपाळावर चंदनाच्या गंधाची कोर, तेजस्वी ज्ञानाने प्रकाशमान असणारी कांती ही बहिरंगी तेजस्वीता होती, तर अमानित्व व पैशून्य अवस्थेने अंतरंग स्वच्छ होते. दोन्हीतही पारदर्शकता होती हेच त्यांच्या जीवन आचाराचे वैशिष्ट्य होते.

पू. महाराजांच्या केवळ दर्शनातही, सामान्य मनुष्याजवळ क्रोध, कटुता, हेटाळणी इ. विकृती असल्या तरी त्या आपोआप विरून जात असत. हा महाराजांच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रभाव होता. धर्म व त्यावरील श्रद्धा यांनी पू. महाराजांचे व्यक्तीमत्त्व परिपूर्ण विकसीत झाले होते. परिपूर्ण ज्ञानमयता व निश्चयात्मक बुद्धी हा त्यांचा उदात्तभाव त्याच्या प्रत्येक क्रियेतून व्यक्त होत होता. त्यामुळे लोकांनी महाराजांना स्वीकारले

व पू. महाराजांनी लोकांना आपले म्हटले. या सर्वांत प्रेम भक्ती भावाबरोबर महाराजांच्या धर्मसत्तेचाही प्रभाव होता.

'धर्म' म्हणजे केवळ ईश्वरी पूजा अर्चा वा आचार नव्हे तर मनुष्याच्या अंतःकरणाची उन्नती होणे, सत्याविषयी आणि कर्तव्याबाबत पूज्य बुद्धी निर्माण होणे, आकलन होणे, विवेक स्थिर होणे, यातच परमेश्वराचा साक्षात्कार होवून सत्यमय, मंगल स्वरूपाचे दर्शन होणे हे धर्माचे अंग आहे.

'धर्म संचरिष्णू' केव्हा होतो तर जे महात्म्ये ऋषी, धर्मतत्त्वाचे ग्रहण करतात किंवा स्फूर्ती विशेष रूपाने समाजाला देताना मार्ग दाखवतात तो आचार व विचाराने संचरिष्णू धर्मज्ञ होतो.

यामुळेच पू. महाराज म्हणजे संचरिष्णू धर्मज्ञ म्हणता येइल. अंतःकरण भगवद् प्रेमाने भरलेले होते. त्यांच्या सर्व वृत्ती अंतर्मुख झालेल्या असल्याने चालणे-बोलणे ही एक भाव समाधी होती. त्यामुळेच शेवटी पू. महाराज म्हणजे या पुण्यनगरीचे एक वैभव होते.

समर्थ अशा विभूतींना म्हणतात-

**धर्म संस्थापनेचे नर। ते देणे ईश्वराचे ।।**

'देणे' म्हणजे देणगी. पू. दत्तमहाराज म्हणजे दत्तप्रभूंनी समाजाला देशाला, विश्वाला दिलेली देणगी होती, तर कार्य व विचार संपदेने आज ती शेष आहे. शेष म्हणजे शिल्लक आहे आणि ती अनंतही आहे असे म्हणावेसे वाटते.

म्हणजे प्रथम भीष्माचार्यांना जो प्रश्न महाभारतात विचारला तो प्रश्न म्हणजे धर्म कुठे येतो ? व कोठे आहे? याचे उत्तर म्हणजे 'पू. दत्तमहाराजांचे जीवन होय'. धर्म म्हणजेच शुद्ध आचार-विचारांचे झालेले ज्ञानाचे प्रकटीकरण आहे. 'धर्म एक जीवन जगण्याची शिस्त ही आहे',

याच्या परिनियमाला 'धर्माची संहिता' म्हटले आहे.

आता विचार करावा. निधर्मी राज्याच्या संकल्पनेने आपण जीवन यशस्वी जगू शकू का? याचे सर्वांनी चिंतन करावे, असे वाटते.

# प्रकरण - सहावे

ॐ

## धर्मनिष्ठा

आद्य जगद्गुरू शंकराचार्य म्हणतात,

**जन्तूनां नरजन्म दुर्लभमतः**

**पुंस्त्वं ततो विप्रता।**

**तस्माद् वैदिक धर्म मार्गपरता**

**विद्वत्मस्मात्मरत ।।**

जीव दृष्टीने मनुष्य जन्म दुर्लभ, त्यात ब्राह्मण जन्म श्रेष्ठ, त्यात वैदिक धर्म मार्गात परायणता व त्यात विद्वता प्राप्त होणे, त्यातून आत्मानात्मविवेकाने ज्ञान प्राप्त होणे, हे सारं दुर्लभच म्हणावे लागेल. भगवान शंकराचार्यांनी जन्माला आलेल्या जीवांच्या विकासाचे व त्यांच्यातील उच्च कोटीचे वर्णन येथे केले आहे.

अलीकडच्या काळातील एक आदर्शवत, एकमेव पू. दत्तमहाराज हे होते.

तुकाराममहाराजांच्या शब्दांत म्हणता येथे की, ''**धर्म रक्षावयासाठी। करणे आटी आम्हांसी ।।**'' पू. महाराजांची धर्मावर परिपूर्ण श्रद्धा व निष्ठा ही होती. त्यांच्या मते, ''प्रत्येकाने धर्मपालन केले पाहिजे. धर्मपालन हे मनुष्याने ईश्वराची आज्ञा पालन केल्यासारखे आहे. लष्करात ज्याप्रमाणे वरिष्ठ अधिकाऱ्याची आज्ञा ज्याप्रमाणे सैनिकांनी विनातक्रार ऐकावी लागते, त्याचप्रमाणे प्रत्येकाने हे धर्मपालन करणे आवश्यक आहे.'' असे त्यांचे मत होते.

कुळधर्म व कुळाचाराचे पालनही करावे. हे करण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष होता.

'धर्म' हा नेहमी 'श्रद्धा' व 'विधी' वर असतो! 'श्रद्धा' ही नेहमी अव्यक्त असते, ही शक्तीरूप असते. त्यामुळे धर्मातील विधी-विचार मनुष्याने श्रद्धेने करावा. श्रद्धेच्या बळावर मनुष्य अनेकविध कार्ये करू शकतो. श्रद्धेतून निष्ठा निर्माण होत असते. श्री गुरुचरित्रात

**मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ।**

**यद्दशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ।।**

(गुरुचरित्र : अध्याय ४०.४८)

देव, ब्राह्मण, ज्योतिष, मंत्र, वैद्य (डॉक्टर), औषध, गुरू, तीर्थक्षेत्र, तीर्थ, यावर श्रद्धा, भावना असली तर यश हे त्वरित मिळू शकते. त्यामुळे धर्माचा मूलभूत पाया ही 'श्रद्धा' आहे. त्यामुळे 'श्रद्धा' ही धर्माचा अविभाज्य भाग आहे.

शंकराचार्य विवेक चूडामाणि या ग्रंथात असे म्हणतात,

**शास्त्रास्य गुरुवाक्यस्य सत्यबुद्ध्यवधारणम्।**

**सा श्रद्धा कथिता सद्भिर्यया वस्तूपलभ्यते ।।२६ ।।**

वेदान्त शास्त्र गुरुवाक्य ही सत्य आहेत, असा जो बुद्धिचा निश्चय, ज्याच्यायोगाने आत्मवस्तू प्राप्त होते, त्यास 'श्रद्धा' म्हटले जाते. त्यामुळे धर्म विषयात श्रद्धेला फार मोठे महत्त्व आहे. पू. महाराज श्रद्धेला अंधःश्रद्धा कधी म्हणत नसत. आचरण करणारे जर अंध बनले तर 'श्रद्धा' काय करणार त्याला? तेव्हा मनुष्याने श्रद्धायुक्त अंतःकरणाने कर्म करावे, आचरण करावे, श्रद्धे विषयी संशय असू नये असा त्यांचा आग्रह असे.

धर्माच्या 'विधिच्या' अंगाने पू. महाराज स्नान संध्यादि कर्म, देव पूजा, पोथी वाचन, ग्रंथ वाचन, ध्यान धारणा, बैठक, चिंतन हे सारे मन,

बुद्धिच्या शुचितेसाठी आवश्यक आहे असे सांगत असत. श्राद्ध-पक्षादि कर्मे केली पाहिजे असे त्यांचे मत होते. पवित्र व सात्त्विक अन्न सेवन करावे असे त्यांना वाटत असे.

एकदा एकाने पू. महाराजांना विचारले, ''महाराज, सध्या तब्बेत बरी नाही, डॉक्टरांनी कांदा-लसूण खावा हे सांगितले आहे. काय करावे?'' तेव्हा महाराज म्हणाले, ''शरीर शास्त्र वेगळे आहे. चित्त व मनशुद्धीसाठी धर्मशास्त्र सांगते, हे खावू नये'' तेव्हा आपण ठरवावे. या दृष्टीने धर्मशास्त्रानुसार आहार असावा हे त्यांचे मत होते.

तसेच पू. महाराजांचे मत असे होते की, '**आचारो प्रभवो धर्मः ।**' धर्म हा आचाराच्या माध्यमातून प्रभावी ठरतो. त्यामुळे प्रत्येकाने वेद, शास्त्र याला अनुसरून धर्म विचाराचे पालन करावे. याबद्दल त्यांना विशेष प्रेम होते. मनुष्य प्रपंचातील अडीअडचणीं विषयी व्रत वैकल्ये करावीत. ''माणसाकडे मागण्यापेक्षा देवाकडे मागावे.'' पण पुढे मात्र या मागण्यातून निवृत्त व्हावे. अशी धर्मनिष्ठा होती. धर्माचरणाने जो वागतो, त्याचे शुचितेचे व पावित्र्याचे रक्षण आपोआप घडते.

पू. महाराजांना वाटे की, धर्माचरणाच्या योगाने ईशसान्निध्य प्राप्त होते. तसेच, मनातले दोष, बुद्धितले दोष दूर होतात. मग चांगले गुण अंगी रूजू लागतात. यासाठी धर्माचरण असणे आवश्यक आहे.

एकदा पू. महाराज, श्री. पद्माकर नांदुरकर यांचे केळवडे, सातारा रोडवर असलेल्या गावी दत्तमंदिरात गेले. तेथे मंदिराच्या गर्भगृहात आपणास जाण्यास काही हरकत नाही, असे पू. दत्तमहाराजांना सूचविले. तेव्हा महाराज म्हणाले, ''प्रत्यक्ष मूर्तीचे दर्शन हे स्नान करून, सोवळे नेसून मग मंदिरात जावे. तसे जाऊ नये. आम्हाला आधी माहिती असते तर सोवळे आणले असते आणि स्नान करून आत गेलो असतो. तथापि, मंदिरात दर्शन कसे घ्यावे, याचे नियम धर्मशास्त्राने घालून दिले आहेत. ते सर्वांनी

पाळले पाहिजेत. श्रीदत्तप्रभूंसमोर आम्ही कोण ? आम्हालाही तोच नियम, आम्हीपण आपल्यासारखेच आहोत!'' धर्मशास्त्राचे पालन करावे हे त्यांनी सर्वांनाच दाखवून दिले असे म्हणावे लागेल.

धर्माचरणाने मनुष्याच्या ज्ञानशक्तीचा विकास घडू शकतो. अर्थ व कामासाठी धर्माचरण नसावे, तर धर्माचरणाने मनुष्याला अर्थ व काम प्राप्त व्हावा. आंब्याचे झाड, हे छाया, गंध, फळे, पैसा, औषध सारे देते. पण केवळ छाया व गंधासाठी हे झाड लावीत नसतात. तसे एकदा धर्माचरण केले की, पुरुषार्थाची प्राप्ती होण्यास वेळ लागत नाही.

पू. महाराज म्हणत असत, धर्माचरणाने मनाचा निग्रह वाढत असतो. यातून संयम घडतो, त्यातून वैराग्य प्राप्त होते. यातून मनुष्याचा अहंकार नष्ट झाला पाहिजे. मन हे आकांक्षारहित होणे हेच धर्माचरणाचे फळ आहे.

अभ्यासाने मनुष्याला शब्दज्ञान होते. ते मर्यादित असते. या अभ्यासाला अनुभूतीची जोड आवश्यक आहे. यासाठी या अभ्यासाप्रमाणे धर्माचरणाची जोड आवश्यक आहे, नाहीतर शब्दाच्या बाह्य अर्थाकडे लक्ष देऊन जे शास्त्रार्थ व वादविवाद करतात हे शाब्दिक ज्ञान होते. यासाठी अशा ज्ञानालाही धर्माचरण आवश्यक आहे.

मनुष्याने शब्दज्ञान झाल्यावर तसे जे धर्माचरण करतात, जे खरे ज्ञानी असतात ते मनुष्याचे अज्ञान दूर करतात, लोकांना सन्मार्गाला लावतात, त्यांचे संरक्षण करणे यासाठी ज्ञानी महात्म्यांचे प्रयत्न असतात. सर्वांचे ठिकाणी मनात प्रेम, दया, सौहार्यता असणे हे धर्माचरणाचे फळ असते असे पू. महाराजांना वाटत असे. मनुष्य जेव्हा धर्माचरण ईश्वराची आज्ञा म्हणून पालन करतो तेव्हा त्याला काही ऐहिक फळ मिळावे म्हणून नसावी. ही ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण होते तेव्हा त्यात त्याचे कल्याण असते. याच भावनेत त्याची बुद्धी शुद्ध होते. बरं! धर्माचरण करणारे, ईश्वराची खरी भक्ती करू शकतात. त्याचे अंतःकरणात

कोणाबद्दलही द्वेष नसतो, असे साधक ईश्वराला प्रिय होतात. तसेच पूर्व कर्माचे फळ म्हणून मनुष्य दुःख भोगत असतो तरी धर्माचरण श्रद्धेने सुरू ठेवले पाहिजे. त्यातच मनुष्याची उन्नती होऊ शकते असे पू. महाराजांचे मत होते.

धर्माचरणाने मनुष्याला कदाचित् ऐहिक सुखप्राप्ती झाली तरी, त्याने त्याचा अहंकार होऊ देऊ नये. मनुष्याने सतत लीन व नम्र असावे. धर्माचरणाने भगवंताचे सान्निध्य मिळते, भगवंताची सेवा घडते. त्यात तन्मय व्हावे.

धर्माचरणाचे पालन करताना मनुष्याच्या अंगी तितिक्षा हवी आहे. यामागे त्याचे आध्यात्मिक चिंतन असे हे असते की, संसारातील विषय आणि संसार हा अनित्य आहे हे समजले पाहिजे. हे अनित्याचे ज्ञान होईपर्यंत प्रारब्धानुसार हे सुख व दुःख होते ते सहन करण्याचे सामर्थ्य धर्माचरणातून प्राप्त होते. असे पू. महाराजांना वाटत असे.

अशी ही पू. दत्तमहाराजांची धर्मनिष्ठा होती.

# प्रकरण - सातवे

## ॥ॐ॥

## ॥ गुरुभक्तीविषयी ॥

पू. दत्तमहाराज कवीश्वर स्वतः गुरूपदावर आरूढ झालेले असले, तरी त्यांच्या जवळ एक अलौकिक अशी गुरूभक्ती होती. ज्ञानी, पंडित, प्रगल्भ प्रज्ञाशक्ती यांनी विभूषित असलेल्या महाराजांच्या मनात त्यांच्या गुरूंबद्दल काय विचार असावेत, हे त्यांच्या आचरणातून सतत व्यक्त होत असे. या लेखातून पू. दत्तमहाराजांचे गुरू व त्यांची गुरूनिष्ठा आणि गुरूभक्ती यांचे चिंतन येथे करणार आहोत.

## पू. दत्तमहाराजांच्या गुरूपदांची दैवते :-

पू. दत्तमहाराजांचे प्रथम गुरू म्हणजे पू. धुंडिराजमहाराज कवीश्वर (पिताजी). वैदिक धर्मात गुरूपरंपरेचे महत्त्व अगाध आहे. ज्ञानशक्ती आणि पांडित्य शक्तीच्या प्रकटीकरणाला गती व भरारी हे दोन पंख असतात. याला केवळ गुरूशक्तीच प्रेरणा देऊ शकते. त्यांचा वैदिक परंपरेनुसार उपनयन संस्कार संपन्न झाला. हा संस्कार म्हणजे ब्रह्म उपासनेचा प्रारंभ आहे. यात गायत्रीची प्रथम उपासना असते. वेद परंपरेने उपासना आणि वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त याने होतो. आता नियमीत त्यांचा श्रीगुरुचरित्र वाचनाचा नेम व गायत्रीची उपासना सुरू झाली होती.

पू. महाराजांचे दुसरे गुरू म्हणजे प.पू. नृसिंहानंद सरस्वती दीक्षितस्वामीजी ! वाडीच्या वास्तव्यात प्रारंभीचे वैदिक शिक्षण वेदपाठ शाळेत घेत असतानाच वाडीत–औरवाडला दीक्षितस्वामीजींचा सहवास व मार्गदर्शन लाभले; पू. महाराजांची विद्वत्ता, त्यांचे ज्ञान, भक्ती, प्रखर वैराग्य, गंभीरता, आत्मसंयमन पाहून नुसत्या कृपा अनुग्रहाने पू. महाराजांचा

पहिला भागवत सप्ताह प.पू. दीक्षितस्वामीजींनी त्यांच्याकडून करून घेतला असे महाराजांना सतत वाटत असे. यामध्ये साधर्म्यता अशी आहे की, ज्ञानदेवांकडूनही सोळाव्या वर्षी भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी हा गीतेवरील टीकेचा ग्रंथ निवृत्तीनाथांच्या कृपा अनुग्रहाने संपन्न झाला होता. तसे, पू. दीक्षितस्वामींच्या अनुज्ञेनी प्रथम श्रीमद्‌भागवत ग्रंथाचा सप्ताह १६ व्या वर्षी पू. महाराजांनी केला. पू. दीक्षितस्वामींमुळे पू. दत्तमहाराजांकरवी श्रीमद्‌भागवताचे रसपान आजपर्यंत अनेक साधक, अभ्यासक भक्तांना कृष्ण भक्तीचा आस्वाद करीता आला व स्वानंद प्राप्त झाला आहे. पू. दीक्षितस्वामींनी पू. महाराजांना मंत्रदीक्षाही दिली होती.

पू. महाराजांचे तिसरे गुरू पू. गुळवणीमहाराज! प. पू. टेंबेस्वामींचे शिष्य वामनरावजी गुळवणी होत. गुळवणीमहाराजांचे दुसरे गुरू पू. लोकनाथतीर्थस्वामी, यांच्याकडून शक्तीपात दीक्षेचा अनुग्रह झाला असून महाराष्ट्रात गुळवणीमहाराजांकडून शक्तीपीठाची स्थापना झाली. अशा गुळवणीमहाराजांचा अनुग्रह पू. दत्तमहाराजांना लाभला. परिपूर्ण कृपेचा अनुग्रह म्हणजे पू. गुळवणीमहाराजांनी पू. दत्तमहाराजांची 'वासुदेव निवासाचे' प्रधान विश्वस्त म्हणून नियुक्ती केली आणि उत्तराधिकारी म्हणून ते कार्यरत होते. ही धुरा शेवटपर्यंत पू. महाराजांनी सांभाळली केली होती.

पू. महाराजांचे चौथे गुरू प. पू. श्रीधरस्वामीजी! दत्तावतारी व समर्थ शिष्य पू. श्रीधरस्वामींनी, पू. महाराजांना स्वप्नात दृष्टांत देवून सज्जनगडावर बोलविले होते. त्या वेळी महाराजांच्या अंगात ताप होता. परंतु यतिंचे बोलावणे व संतांविषयीच्या अत्यंतिक प्रेमामुळे व गुळवणीमहाराजांच्या अनुज्ञेने पू. दत्तमहाराज गडावर गेले होते. पू. महाराजांना पू. श्रीधरस्वामींच्या कृपेने, ''वासुदेव जगत् सर्वम्'' ही दृष्टी लाभली. आता महाराज खरोखर आत्मानंदात विराजमान झाले. गोप–

गोपींना प्राप्त झालेल्या कृष्ण भक्तीचा स्वानंद पू. महाराजांना प्राप्त झाला, असे दिसू लागले होते. त्या वेळी श्रीधर कुटीत पहाटेच्या वेळी श्रीधरस्वामींच्या शरीरामध्येच, धुंडिराजमहाराज, दीक्षितस्वामी, गुळवणीमहाराज व टेंबेस्वामीमहाराजांचे दर्शन पू. दत्तमहाराजांना झालं! ''गुरूतत्त्व सार्वभौम व एकच असते'' याची प्रत्यक्ष अपरोक्ष अनुभूती पू. महाराजांना आली होती. त्या वेळी सुमारे तीन-चार तासांची समाधी अवस्था पू. महाराजांना श्रीधरस्वामींच्या सानिध्यात प्राप्त झाली होती.

**'ये हृदयीचे ते हृदयी घातले'**। हे ज्ञानदेवांच्या म्हणण्याप्रमाणे गुरू व शिष्य एकरूप झाले. जगत कल्याणासाठी मनोभूमी परिपूर्ण झाली. कार्यारंभ तेथे सुरू झाला.

## अंतर्बाह्य गुरूभक्ती व निष्ठेने जगत कल्याणाचे कार्य :

पू. दीक्षितस्वामींच्या कृपेने दरवर्षी प्रौष्ठपदी भागवत सप्ताह सुमारे ४० वर्षे वाडी येथे (औरवाडला) झाला. सहस्रचंद्रदर्शनानंतर गुरूंचे स्मारक, व वाडीचे निरपेक्ष प्रेम यांनी अमरेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पू. महाराजांनी हाती घेतले व पाहता पाहता पूर्णही झाले. सध्या तेथे कृष्णामाईच्या नदीतीरावर घाट बांधण्याचे काम सुरू आहे. पू. महाराजांच्या प्रेरणेने व संकल्पशक्तीने हे काम पूर्ण होईलच, यात कोणतीही शंका नाही.

पू. गुळवणीमहाराजांकडे पू. दत्तमहाराज पितृतुल्य भावनेने पाहात असत. पू. टेंबेस्वामी ग्रंथ प्रकाशन समितीचे पू. दत्तमहाराज हे कार्यवाह होते. पू. गुळवणीमहाराजांच्या कृपा आशीर्वादाने पू. महाराजांनी, पू. टेंबेस्वामींच्या साहित्याचे (बारा खंडांचे) सुमारे पाच हजार पृष्ठांची कामे पूर्ण केली आहेत. या साहित्यामुळे साधकांवर आणि समाजावर फार मोठे उपकार झाले आहेत. पू. गुळवणीमहाराजांचे सद्गुरू

टेंबेस्वामीजी होते. पुण्यात १९६१ साली पानशेत धरण फुटल्यानंतर गुळवणीमहाराजांची राहण्याची जागा (गोवईकर चाळ) पाण्याखाली होती. पू. महाराजांच्या साहित्य प्रकाशनामुळे मिळालेले उत्पन्न व इतर साधक मंडळींच्या कडून कर्वे रोडवर निवास उभे केले, पू. महाराजांची महत्त्वाची भूमिका होती.

उद्धवजी स्वरूपातील महाराजांना आता 'वासुदेव जगत् सर्वम्' ही दृष्टी लाभल्याने परात्पर गुरू वासुदेवानंद सरस्वतीस्वामींचे पुण्य स्मरण म्हणून 'वासुदेव निवास' हे नाव नवीन वास्तुस ठेवण्यात आले. तसेच त्या वेळी वासुदेवांचे अर्थावर त्यांनी भाष्य केले ते असे की,

**घौ सचन्द्रार्कनक्षत्रा खां दिशो भूर्महोदधिः ।**

**वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः ।।**

अर्थ :- या संपूर्ण आकाश मंडळात चंद्र, अर्क, नक्षत्र हे सर्व खगोल घौ आहे. खां म्हणजे आकाश मंडळ , सर्व दिशा, सर्व महोदधि ही एका नियामक शक्तीने नियमीत केली आहे. त्यामुळे हे सारी आपली जागा सोडू शकत नाही. त्यामुळे सर्व ग्रह व नक्षत्र मंडळ फिरत राहते पण पडत नाही. हे सर्व करणारा कोण ? ही कोणती शक्ती आहे ? तर, -

**'वासुदेवस्य वीर्येण विधृताति महात्मनः'** । तो जो भगवान वासुदेव सर्वेश्वर, विश्वरूपी झालेल्या त्याच्या वीर्यानी (शक्ती) हे सगळे धारण करतो तो वासुदेव हाच ईश्वररूप आहे. गुरूमहाराजांचे कार्य ईश्वराचे व्यापक कार्य आहे. असा व्यापक अर्थ या 'वासुदेव' शब्दामागे आहे. या शब्दाच्या या दृष्टीने कर्वे रोडवरील वास्तुचे नाव **'वासुदेव निवास'** हे यथार्थ ठेवले आहे.

सन् १९७४ साली उत्तराधिकारी झाल्यावर पू. गुळवणीमहाराजांच्या जन्मशताब्दिची योजना आखली. तीही योजना गुरूंचे स्मृतीमंदिर म्हणून पौड फाट्याजवळ केले आहे. तुळजाभवानी

आरोग्यधाम योजना आखून समाजातील स्त्रीयांसाठी, गोर-गरीब व गरजूंना आरोग्यसंपदेची योजना केली आहे.

पू. धुंडिराजमहाराजांनी कवीश्वर घराण्याच्या परंपरेनी चालत असलेल्या गुरूपदाचा अनुग्रह व अधिकार १९७२ साली पू. दत्तमहाराजांना दिला होता. घराण्यात परंपरेने आलेल्या गुरूपदावर पू. दत्तमहाराज आरूढ झाले होते. देऊळगावराजा येथे वडिलांचे, लोणी येथे मातोश्री सौ. सरस्वतीबाईंचे स्मारक उभारून मराठवाड्यात एक विसाव्याचे तसेच भक्ती प्रेमाचे क्षेत्र स्थान निर्माण केले. येथे स्थापन केलेल्या ट्रस्ट करवी कार्य सुरू आहे.

पू. महाराजांकडे पू. श्रीधरस्वामी संस्कृत साहित्य पाठवीत असत. त्याचे भाषांतर पू. महाराज करीत असत. त्या भाषांतरावर कुठेही नाममुद्रा न दर्शविता त्यांच्या रचनांचे मराठीत रूपांतर, 'श्री दत्त करुणार्णवः' या श्रीधरस्वामींच्या संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले आहे. एकदा मी या ग्रंथावर प्रवचनसेवा करीत होतो. त्या वेळी पू. दत्तमहाराजांना यातील शंका विचारून समाधान करून घेतले. मला त्या चर्चेत समजले की ग्रंथाचे मराठीत भाषांतर पू. महाराजांनी केले. म्हणून मी म्हणालो, 'आपण हे भाषांतर अत्यंत सुलभ केले आहे.' त्यावर लगेच महाराज म्हणाले, "पू. स्वामीजींचे हे सारे आहे. आम्ही कोण करणार हे सारं ! गुरूस्वामीच आमचेकडून करून घेतात. त्यांचे हे थोरपण आहे. आम्हाला केवळ निमित्तमात्र केले आहे" आणि लगेच बोलण्यातील विषय बदलला. केवढे हे 'अमानित्व!'

आमचे घरी श्री प.पू. स्वामींची आराधना होत असते. (पुण्यतिथी) त्यास आवर्जून महाराज येत असत. पुढे प्रकृती अस्वास्थ्यामुळे येता येईना, तेव्हा घरच्या कुटुंबियांना पाठवून प्रसाद पाठवावा हे सांगत असत. अशी ही गुरूभक्ती महाराजांची होती.

## त्यागमय समर्पित जीवन :-

अनेक संस्थांना आर्थिक साहाय्य, वामन निवास वास्तू, निर्मिती, औरवाडचे (वाडी येथे) बांधकाम, धुंडिराजमहाराज ट्रस्ट तर्फे होणारे बांधकाम, विदर्भातील ट्रस्टमधील बांधकामे, निरनिराळ्या योजना हे सर्व पू. महाराजांनी केले. सर्व ठिकाणचे भागवत सप्ताहातील उत्पन्न, गुरूदक्षिणा, गुरूपौणिमेची दक्षिणा, जे काही येत असेल ते सारे ट्रस्टमध्ये जमा करीत असत. यातून लोकोपयोगी व समाजोपयोगी कामे महाराजांनी निरपेक्ष भावनेने करून केवळ गुरूंचे कार्य विश्वस्त म्हणून केले होते. आश्रमात अनेक प्रकारच्या उपलब्धी करून अन्नदान, यज्ञयागादि कर्मे केली. कपडालत्ता आला तरी त्याचाही दानधर्म करीत असत. आपल्या गुरूंचे कार्य–दीक्षेचे कार्यही अविरत केले होते.

टिळक विद्यापीठातून सेवानिवृत्त झाल्यावर ठाण्याला तत्त्वज्ञान विद्यापीठात बोलावणे आले असता त्याचा अत्यंत नम्रपणे त्याग केला. गुरूमहाराजांचे कार्य करावयाचा संकल्प मनोमन होता.

**सेविता हा रस वाटितो आणिका।**

**घ्या रे होवुनिया रानभरी।।**

या संत वचनाप्रमाणे भक्ती प्रेमाचा रस महाराजांनी अनेक साधक भक्तांना वाटला. सर्वांचे जीवन कृतार्थ व सुस्नात झाले होते.

निरातिशय अशा भक्ती प्रेमाने गुरूमहाराज तन्मय व हळवे झाले होते. मातोश्री सौ. सरस्वतीबाईंची व गुळवणीमहाराजांबद्दलची आठवण सांगताना महाराजांना गहिवरून येत असे. त्या दोघांत बहिणभावाचे नाते निर्माण झाले होते. गुरूद्वादशीला महाराज व गुळवणीमहाराज वाडीला जात असत. गुळवणीमहाराजांना नरकचतुर्दशीला पहाटे पू. दत्तमहाराजांच्या मातोश्री तेल उटणे लावत असत. परंतु गुळवणीमहाराज कृष्ण नदीवर

स्नानाला जात असत. मातोश्री सांगत आज तरी गरम पाण्यानी स्नान करावे. निदान एखादा तांब्या तरी गरम पाण्याचा न्यावा. तेव्हा पू. गुळवर्णीमहाराज मातोश्रींचा शब्द मोडत नसत. ते गरम पाणी घेऊन गंगेवर स्नानासाठी जात. थोडे अंगावर घेऊन बाकी गंगेत मिसळून कृष्णा नदीत स्नान करीत असत. असे एक प्रेमाचे कौटुंबिक नाते गुळवणीमहाराजांशी जुळलेले होते.

प्रपंचात तसेच परमार्थात शुद्ध भावनेला अत्यंत महत्त्व आहे. मानसशास्त्राप्रमाणे देहाचा व मनाचा अति निकटचा संबंध आहे. यामुळे देह शुद्ध करून कर्म करू लागले की, पवित्र भावना व आचार आपोआप निर्माण होतो. त्यामुळे पू. महाराजांची गुरूभक्ती आत्मप्रचीतीत रूपांतरीत झाली होती. यालाच मानसशास्त्रात मनःशक्ती म्हणतात. या मनःशक्तीने आत्मप्रचीती येते, म्हणजेच 'सर्वभूती भगवंत' या भावनेतून व्यक्त होत असते. अशा प्रकारे गुरू हे साधकांचा एक मानसिक देह निर्माण करतात आणि त्याद्वारे अतिंद्रीय शक्तीची अनुभूती स्वानंदरूपाने आपण स्वतः घेतात व इतरांनाही देतात हेच महाराजांच्या गुरूभक्तीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. म्हणून पू. महाराजांनी प्रपंच व परमार्थ दोन्हीही ईश व गुरू चरणी सोडला होता, तो असा -

**तुका म्हणे घालू तयावरी भार।**

**वाहू हा संसार देवापायी॥**

याप्रमाणे आत्मानंदात रमलेले पू. महाराज, प्रल्हादजी, राजा भरत, कृष्णाची रासक्रिडा उद्धवजी, एकनाथमहाराज यांचे वाचन, मनन, स्मरण जरी झाले तरी गुरूभावना ही भक्तीप्रेमाने प्रज्वलित होत असे व डोळ्यांतून अश्रू वाहू लागत असत. अशा प्रकारे पू. दत्तमहाराज गुरूभक्तीने चिंब झालेले भागवतातील उद्धवजी होते, हाच भास आम्हा सर्वांना होत असे. !

# प्रकरण - आठवे

# गृहस्थाश्रमी : पू. दत्तमहाराज कवीश्वर

**गृहास्थाश्रम न सोडिता।**

**कर्मरेखा नोलांडिता।**

**निजव्यापारी वर्तता।**

**आत्मबोधु सर्वथा न मैळे।।**

ए.भा.अ.९ओ. ४३५

असे एकनाथमहाराज आत्मस्वरूपात लीन झालेल्या लोकांच्या गृहस्थाश्रमाबाबत म्हणतात.

पू. दत्तमहाराजांची काही आवडती चरित्रे व व्यक्तीमत्वे होती. त्यातील एकनाथमहाराज हे एक होते. एकनाथमहाराजांचा जसा गृहस्थाश्रम, प्रपंच अलैकिक होता, तसा पू. महाराजांचा प्रपंच अलौकिक होता, असामान्य होता!

सामान्यतः लग्न किंवा गृहस्थाश्रमाबाबत लोक 'लग्नाची बेडी' समजतात, परंतु पू. महाराज हे यातूनही वेगळे होते. त्यांनी विवाह बंधनास बेडी कधीही म्हटले नाही. त्यांनी प्रपंच हा 'धर्माधिष्ठीत' व 'आद्य कर्तव्य' या भूमिकेवर संपन्न केला होता. पू. महाराज म्हणत, "संसार मनात नसला म्हणजे झाले. शरीराने संसारात असले काय आणि नसले काय याला महत्त्व नाही. "अनासक्तपणे प्रपंच करीत राहणे हाच परमार्थ" असा प्रपंच व परमार्थाचा आदर्श पू. महाराजांच्या गृहस्थाश्रमात पाहावयाला मिळाला होता.

## गृहस्थाश्रमात पदार्पण :

पाश्चात्त्य संस्कृतीप्रमाणे लग्न हा करार नव्हे. हे वैदिक धर्माचे वैशिष्ट्य आहे. पू. दत्तमहाराजांचा विवाह दि. २९/३/१९२९ रोजी झाला. बार्शीच्या भगवंतराव पाठकांची सुकन्या कु. सुंदर हिचेबरोबर झाला. पू. महाराजांना आजीचा (आईची आई) लळा खूप होता. त्यांचा सहवास लाभला होता. पू. महाराजांनी प्रपंचाचा अतिरेक केला नाही. प्रपंच्याबद्दल कधीही उदासीन राहिले नाहीत. विवाहबंधन अति पवित्र वाटत होते.

पवित्रपणाचा संस्कार मनुष्याच्या मनावर व जीवनावर होत असतो. त्यामुळे अशा गृहस्थाश्रमाचा प्रभाव आई-वडील, पती-पत्नी, पुत्र-पौत्र, सर्व नाते संबंधात पवित्र प्रेमाची अनुभूती येते.

प्रत्येकाला निश्चित असे वाटत असते की, आपला गृहास्थाश्रम अत्यंत सुखासमाधानाचा व्हावा, परंतु प्रपंच्याचा प्रारंभ झाल्याबरोबर अनंत सुख-दुःखाच्या लाटांचे हिंदोळे येत असतात. तरी महाराजांच्यासारखी विभूती एका तत्त्ववेत्याच्या भूमिकेवरून जीवनातील सर्व व्यवहार उत्तम रीतीने संपन्न करीत असतात. पू. महाराजांचे स्वानंदाच्या साक्षात्कारावर प्रापंचिक जीवन सफल संपन्न झाले होते.

सध्याच्या परिस्थितीत, पू. महाराजांचा विवाह लहान वयातील! लहान वयात विवाह होऊन कै. सौ. लक्ष्मीबाई यांनी महाराजांच्या जीवनात पदार्पण केले होते.

**'कुलस्त्रीचे अंतःकरण। दुश्चित असता कामा नये।।**

ह्या गुरुचरित्रातील वचनाचे पू. महाराजांनी पालन केले होते. पू. दत्तमहाराज व सौ. लक्ष्मीबाई लहान असताना, वाडीला वडिलांच्या सूचनेप्रमाणे तंबूतील सिनेमा पाहण्यासाठी गेले. परंतु सौ. आईसाहेब तंबूत व पू. महाराज बाहेर! परंतु आईसाहेबांची इच्छा पूर्ण केली.

"साक्षीभूत परमात्मा विश्वसृष्टीत तटस्थ आहेत. मायेचा सर्व खेळ चाललेला आहे." असा परिपक्व विचार पू. महाराजांच्या मन, बुद्धी व चित्तात स्थिरावलेला दिसून येतो. कारण पू. महाराजांची धारणा अशी होती की, "प्रपंच म्हणजे शिव व शक्ती यांच्या पवित्र एक रूपतेचे दृश्य प्रतीक आहे. प्रपंच हा सुख समाधान व संतोष याने केला तरच तो प्रेम भक्तीत रूपांतरीत होवू शकतो."

## गृहस्थाश्रमातील धर्मपालन :-

**सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी**

**सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ।**

**आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे**

**साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ।।**

गृहस्थाश्रमाबाबत ऋषी असे म्हणतात, "घरात सर्व सुखी आहेत, पुत्र बुद्धिमान आहे, पत्नी मधुरभाषिणी आहे, चांगले मित्र आहेत, आपल्या पत्नीचा संग आहे, प्रतिदिवस अतिथी सत्कार व भगवान शंकराचे पूजन होते, शुद्ध पवित्र भोजन आहे आणि संतांचा संग आहे असा जो गृहस्थाश्रम आहे, तो धन्य आहे."

शास्त्रधर्मानुसार व गृहसूत्रानुसार पू. महाराजांनी धर्माचे पालन केले आहे. कुलधर्म, कुलाचाराचे पालन, श्राद्ध पक्षादि कर्मे यांचे तंतोतंत पालन केले. नीतिधर्माच्या विचारांचे पालन केले. हे सर्व करताना व्यवहारातील वास्तवाचे भान ठेवले होते. मुला-मुलींची शिक्षणे, नातवंडांची शिक्षणे, शाळा-महाविद्यालयीन शिक्षण यांच्या आड काहीही येवू दिले नाही. या सर्वांत ते रस घेत असत. नव्या-जुन्याचा समन्वय त्यांनी साधला होता.

पू. गुळवणीमहाराजांचा वरदहस्त पू. दत्तमहाराजांच्या कुटुंबावर

होता. प्रपंच्यातील सर्व गोष्टीत पू. गुळवणीमहाराजांचे मार्गदर्शन असे, सौ. आईसाहेबांना पू. गुळवणीमहाराजांचा फार मोठा आधार वाटत असे. कामानिमित्त पू. महाराज परगावी असले तर पू. गुळवणीमहाराज सौ. आईसाहेबांचे प्रपंचातील 'हवे-नको' ची चौकशी करीत असत. हे सर्व वडिलकीच्या रेशमी भावबंधनात असे.

नीतिमान जीवनाचे रहस्य असे असते की, ''निर्हेतुकपणे सत्कर्म घडत जाणे. 'सहजकर्म' या गृहस्थाश्रमाच्या पाठशाळेत घडले पाहिजे. खरे म्हणजे 'हे मनुष्य शरीर आणि त्यामध्ये हा 'गृहस्थाश्रम' ही स्वतः उद्धार करून घेण्याची पाठशाळा आहे. भोग भोगण्यासाठी व आरामात पडून राहण्यासाठी हे शरीर नाही'' हे लक्षात घेतले पाहिजे. या गृहस्थाश्रमात आपल्या शक्तीनुसार तन, मन, बुद्धी योग्यता व अधिकार इ. च्या योगाने दुसऱ्याला सुख देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसऱ्याच्या सुखाकरिता आपल्या सुखाचा त्याग करणे हिच माणुसकी आहे'' हे गृहस्थाश्रमाचे वैशिष्ट्य पू. महाराजांनी तंतोतंत पाळले होते.

पू. महाराजांच्या जीवनात सौ. आईसाहेबांना कधी 'कडक' धोरण स्वीकारावे लागत असे. तरी पू. महाराज मात्र प्रपंचात गृहस्थाश्रमात कृपाळू, सहनशीलतेची पराकाष्ठा, समता, परोपकार, अपरिग्रह, अक्षोभता, मित्रता, सहृदयता, कारुण्यता, स्तुती-निंदेबद्दल समता, धनवित्ताविषयी उदासीन असे समृद्ध जीवन व गृहस्थाश्रम महाराजांचा होता. हेच सर्व गुण समाज जीवनालाही उपयुक्त असतात.

**'देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी।'** प्रमाणे प्रपंच व परमार्थात शांत निरागस मार्मिक विचार संपदेच्या वैभवाने पू. महाराजांचे जीवन शांतीच्या उत्तुंग शिखरावर तेजोमय झाले होते.

## गृहस्थाश्रमाविषयी पू. महाराजांचा दृष्टीकोन :-

पू. दत्तमहाराज गृहस्थाश्रम हा ऋणानुबंधाचा आश्रम समजत असत, म्हणून मनुष्याने निदान गृहस्थाश्रमात मर्यादापूर्वक, संयम आणि ब्रह्मचर्यपूर्वक (पती-पत्नीनी एकनिष्ठ राहणे) व धर्माचे पालन करून भगवंताचे भजन स्मरण करावे. पू. महाराज सर्वांनाच 'आहो-जाहो' अशा आदराने बोलत. यामागे असे वाटते 'वासुदेव जगत् सर्वम्' ही वृत्ती पूर्णपणे अंगी बाणल्याचे हे लक्षण दिसते. गृहस्थाश्रमात कर्तव्याचे पालन तत्परतेने केले तरच त्याचा अधिकार आपोआप उच्च प्रतिचा होवून जातो, हे ध्यानात घेतले पाहिजे. गृहस्थाश्रमातील कर्तव्याची बाब कुटुंब सदस्यात उपकाराची वाटते तेव्हा कुटुंब संस्थेचा ऱ्हास निश्चित आहे. गृहस्थाश्रमातच वैराग्याचा अभ्यास दृढ होण्यास मदत होते. निरासक्तीचा अभ्यास घडू शकतो अशी महाराजांची धारणा होती. या अभ्यासासाठी प्रपंचाची जागा, पैसा, प्रगल्भ ज्ञान याची आवश्यक्ता नसते तर केवळ श्रद्धा व अभ्यास, धर्म नीतिपालनाचे आचरण केले की, ज्ञान विकसित होते, मनबुद्धिचा विकास घडतो. हा संस्काराचा भाग आहे असे महाराजांना वाटत असे. नित्य उपासना, संध्यावंदन, देवपूजा, कुळधर्म कुलाचार, श्राद्ध पक्षादि नित्य नैमित्तीक कर्मे हे सारे संस्कार गृहस्थाश्रमातील बीज आहेत. म्हणून महाराज म्हणत-

**यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम।**

सुखाचे दोन वर्ग आहेत. (एक) 'कामसुख' म्हणजे इच्छेची पूर्ती झाल्यामुळे मिळालेले सुख. (दुसरे) 'ब्रह्मसुख' किंवा मुक्तीसुख, संसारिक आसक्ती कामरूप धारण करते पण हाच काम ईश्वरासंबंधी केला तर तो काम धर्मरूप होतो. संसारात राहून शास्त्रनियमानुसार त्यांना संसारसुख घेता येते अशी धारणा पू. महाराजांची होती. स्वैर विषयसुख भोगाकरिता धर्म निर्माण झालेला नाही तर, स्वैर विषयवासनेला आळा बसून जीवाला मोक्ष प्राप्ती व्हावी यासाठी धर्म निर्माण झाला, म्हणून जीवनात गृहस्थाश्रमाचे

महत्त्व पू. महाराजांना वाटत होते. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरुषार्थ शास्त्रकार सांगतात. काम हाही पुरुषार्थात मांडला आहे. केवळ सांसारिक सुखातच आसक्त राहिले तर जीवनात दुःखेच भोगावी लागतात. मोक्ष म्हणजे दुःखाची निवृत्ती आणि गृहस्थाश्रमात राहूनही मोक्ष मिळवता येतो. या दृष्टीने पुरुषार्थ प्राप्तीसाठी गृहस्थाश्रमात श्रेष्ठ वाटतो. म्हणून सांसारिक जीवनात कामावर विजय मिळवणे हाच पुरुषार्थ पू. महाराजांना वाटत आहे.

## पू. महाराजांचा गृहस्थाश्रम :-

महाराजांच्या परिवारात तीन मुलगे, तीन मुली, जावई, नातवंडे असे एक वलय होते. त्याशिवाय भक्तांचा परिवार, असा गोकुळातील कृष्णाप्रमाणे महाराजांचा परिवार होता. नातूंच्या वाड्यातील जागा, आगाशे वाड्यातील जागा, त्याबरोबर वर्तक वाड्यातील ऐन उमेदीचा काळ व्यतीत झाला. पण पू. महाराजांना कधी साधनेसाठी जागा कमी नाही, पाण्याची अडचण भासली नाही. याच जागेत लग्न कार्ये झाली, बाळंतपणे झाली, मंगळागौरी झाल्यात. विशेष म्हणजे मुलांची शिक्षणे, नातवंडाची शिक्षणे झाली. अशोक कवीश्वर हे डॉक्टर झाले.

आज काल शिक्षणासाठी ज्या भौतिक सुविधा आवश्यक वाटतात त्या वेळी कोणत्याही नसताना, त्यांना व कुटुंबियांना अडचण वाटली नाही. सौ. अनीता वहिनी तर लग्नानंतर एम्.ए. झाल्या. तरी घरात आनंद होता. म्हणून तुमच्या आमच्या प्रपंचासाठी ज्या आवश्यक वाटतात त्याचा अभाव पू. महाराजांच्या प्रारंभी गृहस्थाश्रमात असतानाही परमार्थ घडला. आम्ही परमार्थ साधनात किती तक्रारी करतो हे लक्षात येईल. रेणुका निवासात सर्व सुविधांची उपलब्धी झाली तरी पू. महाराजांचे शारीरिक, मानसिक, तपाचरणात कोणताही फरक पडला नाही. साधना घडली. धर्माचरण घडले, यशश्रीच्या शिखर पोहचले तरी मन, बुद्धी, चित्त, श्रीकृष्णाच्या मधुर रसाने रंगून गेले तर गृहस्थाश्रम श्रीकृष्ण भक्तीने

सप्त रंगानी बहरून गेले, असे हे वेगळेपण पू. महाराजांच्या गृहस्थाश्रमाचे होते.

## पू. महाराजांचा गृहस्थाश्रम हा सर्वांचा विसावा ठरला :-

दया, क्षमा, शांती, तितिक्षा, एकाग्रता या गुणांनी व ज्ञानाची विकसीत अवस्था याने पू. महाराजांचा गृहस्थाश्रम हा व्यापक झाला होता. सौ. लक्ष्मीबाई तीन मुले, तीन मुली, नातवंडे, पतवंडे यांच्यापुरते पू. महाराज न राहता सर्वांचेच माता-पिता, आजी-आजोबा, सद्गुरू झाल्याने पू. महाराजांचा प्रपंच वैश्विक बनला.

प्रारंभीच्या काळात पू. महाराजांकडे विद्यार्थी शिक्षणासाठी असत. त्यांनाही माता-पित्याचे प्रेम दिले. सदाचार संपन्नता, सत्प्रवृत्तीचे आचरण याने पू. महाराजांचे घर 'हे एक विसावा' वाटू लागले. प्रत्येकजण त्यांच्याशी मोकळेपणे वागू लागला. पू. महाराज तसे अबोलच! परंतु कधी त्यांना बोलते केले, तर अत्यंत मार्मिक व थोड्या शब्दात मार्गदर्शन करीत असत, तर सौ. आईसाहेब मायेच्या, भक्तीच्या ओलाव्याच्या शब्दांनी काहीही राखून न ठेवता समोरच्याला ममतेने चिंब करीत असत. प्रत्येकजण पू. महाराजांकडे मा-माई (आईसाहेब) यांचेकडे येवून सुख व दुःख ठेवून समाधानाची शिदोरी घेवून घरी परतत असे. असा हा आगळा गृहस्थाश्रम असे. सर्वांना देण्या-घेण्यातही हात सढळ असे, वेचक व व्यवहार्य मार्गदर्शन करीत असत.

सन् १९८८ साली माझ्या पत्नीला अपघात झाला होता. माझा मुलगा सर्वेश याला घेवून मी पू. महाराजांकडे गेलो, पू. महाराजांचे दर्शन घेताना समोर तुलसीपत्रच ठेवले व दर्शन घेतले. लगेच पू. महाराज म्हणाले, "लक्षात घ्या! आपण गृहस्थ आहात, अजून प्रपंच व्हावयाचा आहे. सूनबाईची तब्येत बरी नाही. एवढे ठेवण्याची गरज नाही. आम्हालाही ठेवू नका व देवापुढेही ठेवू नका. केवळ मनापासून देवाची प्रार्थना करावी.

सारं काही नीट होईल." हे ऐकून माझे डोळे पाणावले. मी मुकवत् झालो. पू. महाराजांनी केलेल्या शब्दांच्या संस्कारांनी आजही काही वेगळ्या सामर्थ्याची प्रचिती येते! असा 'गृहस्थाश्रमी योगी मी नाही पाहिला!'

यज्ञयागादि कर्मे घडली, दानधर्म घडला, या सर्वांत आपण स्वतः कृष्णवत् अलिप्त राहिले. या जगदीश्वराच्या सामर्थ्याचे दर्शन सर्व जनता–जनार्दनाला व्हावे असा हा थोर गृहस्थाश्रम होता.

## गृहस्थाश्रमात पू. गुळवणीमहाराजांचे मार्गदर्शन :-

पू. गुळवणीमहाराज व पू. धुंडिराजमहाराज (महाराजांचे पिताश्री) यांचे मार्गदर्शन पू. दत्तमहाराजांना सदैव असे. महात्म्यांचे सर्व विचार शिरोधार्य मानत असत.

सन १९५९ साली गाणगापूर क्षेत्री पू. श्रीधरस्वामींच्या अधिपत्य खाली पू. नृसिंह सरस्वतींची ५०० वी जयंती संपन्न झाली. त्या वेळी धुंडिराजमहाराजांच्या सांगण्यानुसार चि. अनिल (महाराजांचा मुलगा) याची मुंज सिद्धराज माणिक प्रभू, श्रीधरस्वामी यांच्या साक्षीने संपन्न झाली.

डॉ. अशोक कवीश्वर यांचा विवाह पू. गुळवणीमहाराजांच्या मार्गदर्शन व कृपाशीर्वादात संपन्न झाला. पू. महाराज सर्वांत असून कमलपत्रवत् शेवटपर्यंत राहिले. सर्वांत सौजन्य, निर्मळ अंतःकरणाचा प्रभाव प्रत्येक कृतीत उमटत होता, त्यामुळे हा गृहस्थाश्रम विरळा ठरला.

## गृहस्थाश्रमातील ज्ञानयोग :-

ज्ञानाचा संबंध जीवनाशी येणे आवश्यक आहे. जीवनाला सार्थकता व सफलता प्राप्त करून देणे हे ज्ञानाचे उदिष्ट असते, असे सदाचार संपन्नतेनी परिपूर्ण असणारे गृहस्थाश्रमी महाराज होते. पू. महाराजांनी प्रपंचात राहून पुढीलप्रमाणे मार्गदर्शन केले–

१) सर्वांनी विद्यार्जन करावे. सामान्य साधकांनी कर्म, उपासना भक्तीमार्गाने जावे. वेदवेदान्त उपनिषदांचा सखोल अभ्यास वानप्रस्थात करावा.

२) नव-नवीन गोष्टींचा स्वीकार अलिप्त राहून करावा व ईश्वरस्वरूप समजून घ्यावा.

३) सर्वांत असावे, तसे सर्वांत नसावे असे कमलपत्रवत् असावे.

४) असा आचार ठेवावा की, सर्वांच्या मनातील आध्यात्मिक शक्ती जागृत झाली पाहिजे. याबरोबर नोकरी व्यवसाय करून जास्तीत जास्त काळ ईश चिंतनात ठेवावा.

५) अशा प्रकारे प्रपंचात राहून समाजसेवा यथाशक्ती करून भक्तीपंथाची संघटना करावी. याने समाजजीवन समृद्ध व शांतीपूर्ण कसे राहील ते पाहावे.

६) जीवन केवळ परोपकारासाठी समर्पित करावे हीच ईशसेवा आहे.

असा ज्ञानयोगपूर्ण गृहस्थाश्रम महाराजांचा होता.

## समारोप :-

जीवन क्षणभंगुर असते. जीवनात शास्त्राचरण करून विद्येची उपासना घडावी. यासाठी गृहस्थाश्रम या अभ्यासाचा मूलाधार आहे. जीवनात ज्ञानाची प्रतारणा न घडता विद्येची आराधना घडावी. ज्ञानविद्येच्या प्रकाशात जीवनाचा गाभा उजळून निघतो. सद्गुण नीतिने गृहस्थाश्रम दरवळून टाकावा. अवघे जीवन गृहस्थाश्रमाने ज्ञानपूर्ण व शांती समाधानाच्या शिखरावर स्थिर होते. कोणीही संत गृहस्थाश्रमाला त्याज्य समजत नाही तर, त्याज्यता आहे त्यातील प्रवृत्तीला! या दृष्टीने पू. दत्तमहाराजांचा प्रपंच सर्वापेक्षा विरळा ठरला आहे.

# प्रकरण - नववे

# निरंतर तेवणारी ज्ञान ज्योत

**एतद्–देश प्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः**

**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ।।**

(मनुस्मृती)

मनुराजा असे म्हणतो, 'या देशात अशा श्रेष्ठ व्यक्ती आहेत की, त्यांच्या पायाशी बसून, पृथ्वीवरील सर्व मानवांनी जीवनाचे धडे गिरवावेत.' अशी पुत्ररत्ने या भारत देशात आहेत, असे मनुराजा अत्यंत अभिमानाने सांगतो. मनु राजाच्या या वचनाला भूषण आणणारे 'विद्यावाचस्पती दत्तात्रेय कवीश्वर' हे एक होते.

## श्रीगुरुचरित्र अखंड पारायणाचे मार्गदर्शक :

पंडित दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरमहाराज हे पुण्यात आल्यावर मुंजाबाचे बोळातील शंकराचार्य मठात जात असत. तेथे श्रीगुरुचरित्र अखंड पारायणाचे कल्पक वै. भालचंद्र खिस्ती (माझा मित्र गजानन खिस्तीचे वडील) हेही आचार्यांकडे जात असत. १९५५ साली ५५५ नारायण पेठ पुणे येथे श्रीगुरुचरित्र अखंड पारायणाचा उपक्रम पुण्याच्या शंकराचार्य मठाने मठाधिपती व पू. दत्तमहाराजांच्या उपस्थिती प्रारंभ झाला. वै. दादासाहेब तथा ग.या. नातू कुटुंबियांचा व पू. महाराजांचा विशेष लोभ होता. या सर्व थोरांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम अत्यंत भव्य स्वरूपात आनंदाश्रमात १९५६ साली सुरू झाला. वै. भालचंद्र खिस्ती यांना १९७४ साली देवाज्ञा झाल्यावर पू. महाराजांच्या मार्गदर्शनाने श्रीगुरुचरित्र अखंड पारायण संस्था, हा 'न्यास' स्थापन झाला आणि प्रारंभापासून महाराज मार्गदर्शक असल्याने त्यांच्या विद्वत्तेने व अत्यंत निरलस वागण्याने सर्वांच्या विनंतीला

मान देऊन पू. महाराजांनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले व मजकडे कार्यवाह पदाची धुरा देऊन पू. महाराजांनी मला सांभाळून घेतले. लहान वयात माझी कोणतीही योग्यता नसतानाही आमचेकडून पू. दत्तमहाराज, भगवान श्रीधरस्वामी व भगवान दत्तप्रभूने हे काम करवून घेत आहेत असे वाटते.

दरवर्षी या उपक्रमाचा प्रारंभ श्री नृसिंहसरस्वतीस्वामींच्या पादुका व फोटोच्या पालखी मिरवणुकीने होतो व त्या वेळी दरवर्षी आनंदाश्रमात पालखी आल्यावर पू. दत्तमहाराजांचे प्रवचन होत असे. हे प्रवचन मार्गदर्शनपर असे.

श्रीगुरुचरित्र अखंड पारायण सप्ताहात येणाऱ्या गुरुवारी पू. महाराज व पू. गुळवणीमहाराज दर्शनाला आनंदाश्रमात येत असत. त्यामुळे सर्वांना खूप आनंद वाटत असे. तसेच, उत्साहपण वाढत असे.

पू. महाराजांनी केलेल्या मार्गदर्शनाने व संकल्प शक्तीने कोणाकडून काही मागावयाचे नाही. ते म्हणत असत की, ''देवाची संकल्पशक्ती, आपल्यापेक्षा किती तरी मोठी आहे. त्याला आवडेल असे काम, सेवा करीत राहायचे, हे आपलं काम आहे...' याचा अनुभव आजही आम्ही घेत आहोत. पू. महाराजांमुळे या उपक्रमाचे उत्सवात अनेक संत महात्म्यांचे येणे झाले, यज्ञ यागादि कार्ये पूर्ण झाली. याची पूर्ण जाणीव आम्हा सर्वांना आहे. भगवान दत्तात्रेयांनीच पू. महाराजांच्या रूपानेच ही कार्ये संपन्न केली आहेत अशी आमची धारणा आहे. ''कोणाकडे काही मागावयाचे नाही, खर्चाचे अंदाज पत्रक करावयाचे, देवाला प्रार्थना करावयाची, देव ते सर्व पूर्ण करेल'' हाच मोलाचा आशीर्वाद त्यांनी दिला आहे. त्यानुसार आजमिती पर्यंत चालले आहे.

अलीकडे पू. महाराज प्रकृती अस्वस्थतेमुळे येऊ शकले नाहीत तरी, सप्ताहात किंवा दत्तजयंतीला स्वतः नुसते येऊन जात किंवा डॉ.

अशोकराव कवीश्वर, श्री. अनिल कवीश्वर व सुनांना पाठवीत असत. त्यांच्या रूपाने हे कुटुंबिय येथे येतात असे वाटत होते व पू. महाराजांचे कृपाशीर्वाद मिळत असत. प्रत्येक वर्षीच्या प्रवचनात व मार्गदर्शनात पू. महाराजांच्या विचारधारेत एक संकल्पशक्ती होती. जीवनमूल्यांचे दर्शन होत असे, असा अनुभव आहे.

## मांडव्यऋषींच्या तपोभूमीतील बीज अंकुर :-

मूलतः कवीश्वर कुटुंब (घराणे) नगर जिल्ह्यातील मांडवगडचे. मांडवगड ही मांडव्य ऋषींची तपोभूमी. तेथील सप्तर्षी आडनावचे हे कुटुंब. त्यापासून सातवा बीजांकुर ब्रह्मर्षी दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर म्हणजे ती. धुंडिराजमहाराज व ती. सौ. सरस्वतीबाईंचे पुत्ररत्न ! आचार-विचार, धर्माचरण संपन्न, शास्त्र-वेदनिष्ठा यांनी परिपोषाने संपन्न असलेले, हे पू. महाराजांचे जीवन होते. म्हणून प्रारंभी मनुराजांनी व्यक्त केलेल्या विचाराप्रमाणे पू. महाराजांना सबंध विश्वाने वंदन करावे, असे थोर व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या 'वासुदेवः जगत् सर्वम्' या वृत्तीने भारतातील सर्व संप्रदायात अग्रपूजेचा मान पू. महाराजांना प्राप्त झाला होता.

## आत्मज्ञान देणारा दत्तसंप्रदाय !

दत्तसंप्रदायाचे वैशिष्ट्य असे की, हा संप्रदाय 'आत्मज्ञान देणारा' व 'भक्तवत्सलकल्पद्रुम" बिरूदावली सार्थ करणाऱ्या विचारांची थोर परंपरा आहे. या परंपरेत वाडीच्या वास्तव्यात करुणात्रिपदीत रमून गेलेल्या पू. महाराजांनी अत्यंत निर्हेतुकपणे कार्य करून सर्वांची जीवन उज्ज्वल केली आहेत. दत्तसंप्रदायाचे हे एक वैशिष्ट्य आहे की, "भक्त सकाम जरी आला तरी तो शेवटी निष्काम होतो." पू. महाराज नेहमी सांगत, 'सुदामजीसारखे मन निर्वासनामय झाले पाहिजे. भक्ती प्रल्हादजीसारखी झाली पाहिजे' अशा हा थोर संप्रदायातील पू. महाराज म्हणजे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते.

वाडी व गाणगापूरप्रमाणे यतीची सोय आश्रमात व्हावी व सर्व लोकांना मानसिक विश्रामधाम निर्माण व्हावे या दृष्टाने 'वासुदेव निवास' व 'वामन निवास' यातील पू. महाराजांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. दत्तसंप्रदायातील अमूल्य विचारधन, भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोध या अनुषंगाने वेदप्रतिपाद्य विचारधारा त्यांनी जनमानसात रूजविली आहे. त्यामुळे या धावत्या गतिमान असलेल्या काळात त्यांच्या विचार संपदेने लोकांची तनुमने सुस्नात झाली आहेत.

श्रीमद्भागवतात सांगितल्याप्रमाणे-

**मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी।**

**स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्याभिधीयते ।।**

हे एक सहजावस्थेचे लक्षण भागवतात सांगितले आहे; भक्ती व वैराग्य संपन्नतेतून आत्मस्वरूपात पू. महाराज रममाण होते. असे पू. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात व्यक्त झाले होते. अशा थोर पू. महाराजांच्या जीवनात नित्य व्यवहारात तन्मयता व परिपूर्ण अलिप्तता याचा एक सुंदर सन्मवय होता, असे दिसून येत असे. त्यामुळे पू. महाराजांचे सामाजिक जीवनातील, आध्यात्म्याच्या प्रांगणातील एकात्मतेचे कार्य, ज्ञानरूपी कीर्तीचा सुगंध अखंड दरवळत होता. यादृष्टीने पू. महाराजांचे कार्य व विचारधन, समयीच्या ज्योतीप्रमाणे निरंतर तेवणारा एक ज्ञानदीप आहे.

आचार्यांच्या शब्दात म्हणू या,

**"तमाराध्य गुरूं भक्त्या प्रह्वप्रश्नसेवनैः।**

**प्रसन्नं तमनुप्राप्य पृच्छेज्ज्ञातव्यमात्मनः ।।"**

अशा मोक्षगुरू सद्गुरूला नम्रतापूर्वक नमस्कार करून अखंड लीन राहावे. असे जे मोक्षगुरू असतात, त्यांची अत्यंतिक भक्तीने

(प्रेमाने) सेवा करावी. अर्थात यात समर्पणभाव, विनम्रता आणि सेवाभाव यातून ज्ञान प्राप्त करून घ्यावे. पू. महाराजांच्या सत्संगतीत ज्ञान, भक्ती, प्रेम, आध्यात्मिक विद्येचा अनुग्रह होत असे. पू. महाराजांच्या तपोधनातील संपदेतून सर्वांनी जीवन व्यतीत करणे हीच एक श्रद्धांजली ठरो !

# प्रकरण - दहावे

# प्रगल्भ ज्ञान हे अबाधित असते

**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित कर्तुमर्हति ।। गीता २.१७ ।।**

"... अशा अविनाशी आत्म्याचा विनाश कुणीही करू शकत नाही."

छोटे असे नरसोबाची वाडी हे एक गाव ! 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा !' या दत्तनामाचा गुंजारव या आसमंतात सदैव होत असतो. सौ. सरस्वतीबाई कवीश्वर नवजन्मजात बालकाला घेऊन घरात बसल्या होत्या. कट्ट्यावरून लोक परतत होते. कृष्णामाईच्या तीर्थस्थानात सारे कसे सुस्नात झाले होते. प्रातःकालचा समय होता. तेवढ्यात भगवी वस्त्रे परिधान केलेले, दंड व कमंडलू धारण केलेले पू. टेंबेस्वामींची विभूती कवीश्वरांच्या घरासमोर येऊन थांबली ! सौ. सरस्वतीबाईंनी हलक्या हातांनी बाळाला दुपट्यावर ठेवले आणि लगबगीने उठून त्यांनी पू. स्वामींना बसण्यास आसन दिले. अनेक दिवसांनी कवीश्वरांच्या घरात आता पाळणा हलला होता. वातावरण कसे प्रसन्न होते. मुलाबाळांनी भरलेल्या घरातील वातावरण आनंदी व अनुपम असते. पू. वासुदेवानंद सरस्वतीस्वामींची व या नवजात बालकाची दृष्टादृष्ट झाली आणि पू. स्वामीजी म्हणाले, "काय वक्रतुंडबुवा, आलात का आपण ? बर झालं ! आता आपण पांढऱ्या वेषात राहायचं हं! आम्ही आता भगव्या वेषात आहोत, हाच काय तो फरक !" या बोलण्याला या नवजात बालकाने हसून साद दिली बरे ! तेव्हा पू. धुंडिराजमहाराजांनी ओळखले, की हे पहिलेवहिले अपत्य म्हणजे प्रत्यक्ष आपले वडीलच आले आहेत. म्हणजेच, 'वक्रतुंडमहाराज' आले आहेत. म्हणून पू. दत्तमहाराजांचे मूळ नाव 'वक्रतुंड' होते व व्यावहारिक नाव 'दत्तात्रेय' होते. त्यामुळे पू. दत्तमहाराजांच्या मातापित्यांनी पू. महाराजांना कधीही 'एकेरी' नावाने

संबोधले नाही. हे नवजात बालक म्हणजेच, आपल्या सर्वांचे सद्गुरू-मोक्षगुरू 'पू. दत्तमहाराज कवीश्वर' होत.

**वासुदेव यती वदती।**

**वक्रतुंडबुवा फिरूनी जन्मा येती।।**

पू. दत्तमहाराज यांच्या लग्नपत्रिकेवरही 'वक्रतुंड' ऊर्फ 'दत्तात्रेय' असे छापले होते. पू. महाराजांच्या जीवनातील हा प्रसंग कधी तोंडी तर कधी चरित्रग्रंथाच्या वाचनात आला होता. हा प्रसंग बरेच काही सांगून जातो. यामध्ये असेही ऐकून आहे की, पू. महाराज यांच्या कपाळावरील एक रेषा व वक्रतुंडमहाराजांच्या कपाळावरील एक रेषा सारखीच होती. हा भाग स्थूल रूपाचा असला तरी पू. वक्रतुंडबुवा आणि पू. दत्तमहाराज एकच होते हे 'प्रगल्भ ज्ञान सत्तेवरून दिसून येते.'

## प्रगल्भ ज्ञान अबाधित असते

वासुदेव निवासात सुमारे बारा वर्षे पू. दत्तमहाराजांनी सांगितलेल्या श्रीमद्भागवताचे श्रवण केले होते. ही एक अवर्णनीय सद्गुरूकृपा व ईशकृपा म्हणावी लागेल. श्रीभागवत सप्ताहाच्या वेळी पू. महाराज भरत राजाचे चरित्र सांगत असत. त्या वेळी ज्ञानसत्ता कशी अबाधित असते हे ते सांगत असत. तेव्हा पू. महाराजांनी स्वतःचेच चरित्र जणू काही सांगितले होते, असे वाटू लागले आहे.

देह पडला तरी मनुष्याचे ज्ञान, तप उपासनेने प्रगल्भ, तेजस्वी राहू शकते. याकरिता मनुष्याने हा अभ्यास श्रद्धेने, दृढतेने केला पाहिजे.

भरत राजाने सर्वसंगपरित्याग केला. वनात जाऊन योगाभ्यास केला. अंतकाळी राजा भरत मृग पाडसाच्या चिंतेत अडकला व पुढील जन्मात मृगयोनी प्राप्त झाली. परंतु ज्ञान अबाधित होते. हे ज्ञान तपसाधनेने प्रगल्भित राहते. मृगयोनीत भरत राजाचा जीव जरी गेला होता, तरी

आता राजा मृगयोनीतही योगाभ्यास करीत होता. तोही देह यथावकाश सुटल्यावर 'जडभरत' म्हणून तिसऱ्या जन्मात आला आहे. आता ज्ञानाची तेजस्विता असूनही मूढ-जड रूपात राहिलेला हा जडभरत नवीन क्रियमाण कमी कर्मफल निर्माण होत नाही ना, हे पाहत होता. प्रारब्धभोग म्हणून केवळ भोग भोगत होता. येथे प्रसिद्धिपराङ्मुखता होती. गरजेशिवाय बोलणे नव्हते. ज्ञानाच्या अभ्यासाने विचारांची परिपक्वता होती, की आता कशातही अडकावयाचे नाही. पू. महाराज ही गोष्ट सिद्धान्तासह अत्यंत तन्मयतेने सांगत असत.

या घटनेच्या व सिद्धान्ताच्या आधाराने मला असे वाटते की, प्रगल्भ हे ज्ञान अबाधित असते. हा सिद्धान्त यथार्थपणे पू. महाराजांच्या जीवनात साकारलेला होता. पू. वक्रतुंडमहाराज भरत राजासारखे मृगयोनीत गेले नाहीत, परंतु ज्ञानसत्तेच्या प्रगल्भतेचा सिद्धान्त महाराजांच्या जीवनात साकारलेला दिसून येतो.

पूर्वजन्मी पू. दत्तमहाराज वक्रतुंडबुवा होते. त्यांचा अभ्यास, वेदाध्ययन, पुराणसेवाही होती. मंत्रविद्येचा अभ्यास अवगत होता. पूर्वाश्रमीच्या वासुदेवानंद सरस्वतींचा व वक्रतुंडबुवांचाही ऋणानुबंध अजोड होता. त्यामुळे या जन्मातील प्रथम दर्शनात पू. टेंबेस्वामींचे वरील उद्‌गार निघाले होते. तसेच मूक संकल्पही झाला की, यापुढे पुढील कार्य करावयाचे ते लोकोद्धार व जगदोद्धाराचे ! हा संस्कार पू. दत्तमहाराजांच्या मनावर दृढ झाला व मूकपणे हे कार्य एका एखाद्या विशाल वृटवृक्षाप्रमाणे निवारा, मानसिक, निरामय शांतता व कृपेचा शीतल वर्षाव करीत राहिला. पांढरी वस्त्रे स्वीकारावयाची म्हणजे गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा, हाच जणू पू. टेंबेस्वामींचा आदेश होता. यातून विश्व-जगतकल्याणाचे कार्य करावयाचे आहे, हे ठरले होते.

याबरोबर आणखी एक घटना पू. महाराजांच्या जीवनात अशी घडली होती की, ती ज्ञानसत्तेचे अबाधित्व सिद्ध करणारी आहे. मानवी

जीवनात ज्ञानाचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा असतो. ते ज्ञान अबाधित राहते. बाकीचे ज्ञान जीवदशेतून प्रकट झाले तर ते अबाधित राहत नाही. म्हणून मला वाटते, ज्ञान झाले तेथेच मी, माझा खरे म्हणजे संपून जातो. कारण प्रकाशित होणाऱ्या प्रकाशाला कुठे माहिती आहे मी प्रकाश आहे. तसे हे ज्ञान जाणीव व नेणिवेच्या पलीकडे - शाश्वत असते.

वाडीला पू. दीक्षितस्वामींनी पू. महाराजांना प्रथम सोळाव्या वर्षी श्रीमद्भागवत सप्ताह करण्यास सांगितले. पू. दीक्षितस्वामींनी महाराजांवर कृपा केली. पू. धुंडिराजमहाराजांकडून उपनयनाचा मंत्रोपदेश मिळाल्यावर पू. दीक्षितस्वामींनी पू. महाराजांना प्रत्यक्ष अनुग्रह दिला व मंत्रोपदेशही दिला. आधीच असलेल्या प्रगल्भ ज्ञानाला चैतन्यरसाने प्रवाहित केले व सोळाव्या वर्षी पहिला भागवत सप्ताह संपन्न झाला. असा सप्ताह कोणी कुठे केल्याचे ऐकिवात नाही. केवळ शुकाचार्यमहाराजांनी बाराव्या वर्षी भागवताची संथा घेतल्याचे दिसते. तशी संथा पू. महाराजांनी या अवतारी जीवनात घेतल्याचा संदर्भ तोंडी वा लेखी कोठेही नाही. पू. महाराजांचा सातवीपर्यंतचा संस्कृत अभ्यास जेरेस्वामींच्या पाठशाळेत काव्य व व्याकरणाच्या अभ्यासाने झाल्याचे समजते. मग हा पुराणसेवेचा सोळाव्या वर्षीचा अभ्यास कोठे झाला, तर हा अभ्यास गतजन्मीचा (वक्रतुंडबुवाचा) होता. पू. दीक्षितस्वामींच्या कृपाअनुग्रहाने ते ज्ञान प्रकट झाले होते असे वाटते. पू. महाराजांच्या प्रवचनातूनही लक्षात येईल की, इतका अभ्यास आपल्यासारखा अडीअडचणीचा प्रपंच करताना कसा केला असेल ! तर हा अभ्यास, ज्ञान वक्रतुंडबुवांपासून प्रवाहित झालेला होता. अशी ही ज्ञानसत्ता अबाधित आहे.

सर्वसामान्य प्रपंचाचे व सांसारिक सुख-दुःखाचे हिंदोळे सहन करताना पू. महाराजांची ऋतंभरा प्रज्ञा प्रगल्भित व तेजस्वी अशीच होती.

मनुष्याचे मन आत्म्यांशी तादात्म्य होते, तेव्हा ज्ञान सत्त्वशील,

प्रगल्भ राहते व जेव्हा ते ज्ञान बाह्य विषयांशी संबंधित राहते तेव्हा ते विषयातच नष्ट होते. म्हणून तुम्हा-आम्हाला हे ज्ञान झाल्यासारखे वाटते, पण ते टिकत नाही. म्हणून पू. महाराज अशी विभूती होते की कोट्यवधी लोकांत विरळा ठरली होती.

ज्ञानसत्ता अशी अबाधित राहू शकते. नैयायिक ज्ञानाचे वर्गीकरण करताना, प्रत्यक्ष अनुमान, उपमान व शब्दज्ञानाने आत्म्याशी संयोग रूपाने राहते. तेव्हाच ते ज्ञान अबाधित्व सिद्ध करीत असते. ज्ञानाची सत्ता पाश्चात्त्य तत्त्ववेत्ते त्यांनी स्वीकारली असली तरी तो बुद्धिवाद किंवा बुद्धीप्राणीतच समजली जाते म्हणून प्लेटो म्हणतो ज्ञान व मत हे स्वतंत्र आहे. त्याने ज्ञान हे गणिताप्रमाणे मानले आहे.

वैदिक तत्त्वज्ञानात पुनर्जन्माची संकल्पना ज्ञान-सत्तेच्या अधिष्ठानाने अबाधित्व सिद्ध करणारी आहे. याची प्रत्यक्ष अनुभूती म्हणजे पू. दत्तमहाराजांचे जीवनचरित्र म्हणून अवलोकन करता येईल. यावरून अशा जीवात्म्याबद्दल गीतेत श्रीकृष्ण म्हणतात-

**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।। गीता ६.४१**

अशा श्रीभगवतांच्या वचनानुसार महाराजांनी पवित्र व ऐश्वर्यवत् (वैराग्य व औदार्याचे) जीवन व्यतीत केले. त्यामुळेच धर्म, निष्ठा, हरिभक्ती, सौजन्य अमानित्व व सत्कार्य प्रवृत्त इ. दैवी गुण संपत्तीच्या विलासांनी परिपूर्ण असे महाराजांचे जीवन होते. याप्रमाणे पू. वक्रतुंडबुवा ज्ञानसत्तेने पुन्हा कार्य करण्याकरिता पू. दत्तमहाराज म्हणून प्रकट झाले होते.

**तैसीच गुरुकृपाउखा उजळली ।**

**ज्ञानाची वोतपली पडली ।।**

**तेथ साम्याची ऋद्धि उघडली ।**

**तयाचिये दिठी ।। ज्ञाने. ७.१३१**

अर्थ – त्याप्रमाणे गुरूकृपेचा उषःकाल झाला व ज्ञानरूपी कोवळे ऊन पडले. तेव्हा त्याप्रसंगी दृष्टीला ब्रह्मैक्याचे ऐश्वर्य दिसू लागले. असेच पू. महाराजांचे बाबतीत घडले होते.

पू. महाराज म्हणजे अशा प्रकारे अंतर्बाह्य अखंड जीवनभर अत्यंत शुचितेचा महासागर म्हणजे, एक विशाल ज्ञानसागर वाहणारा एक जान्हवीचा प्रवाह होता!

अशा या थोरऽ थोरऽ विभूतीस शतकोटी प्रणाम !

# प्रकरण - अकरावे

ॐ

# ज्ञानीयांचे ज्ञानराजे

पू. दत्तमहाराज हे प्रकांड पंडित होते. भारताच्या तीन राष्ट्रपतिंनी त्यांचा राष्ट्रीय पंडित म्हणून गौरव केला होता. सूर्याप्रमाणे ते तेजस्वी ज्ञानी होते. कोणताही पारमार्थिक विषय ते सहजपणे उलगडून सांगत असत, यातून त्यांच्या बुद्धिमत्तेचे अलौकिकत्त्व सिद्ध होते.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून 'प्रमाणशास्त्र' म्हणून न्यायदर्शनात विस्तार झाला आहे. या न्यायदर्शनात ज्ञानमीमांसा, कार्यकारणसंबंध, ईश्वरवाद, मोक्षविचार आणि वैशेषिक दर्शन व न्यायदर्शन असे विभाग येतात. पू. महाराजांचे न्यायदर्शन आणि मीमांसादर्शन याचा विशेष अभ्यास होता. या दृष्टिकोनातून ज्ञानमार्ग सिद्ध झाला होता. ज्ञान हा आत्म्याचा गुण होय. बुद्धी उपलब्धी, प्रत्यय हे ज्ञान या शब्दाचे पर्याय होत. अद्वैत वेदांताच्या मते आत्मा हा ज्ञानस्वरूपच आहे. पण दर्शनशास्त्रानुसार ज्ञान हा केवळ आत्म्याचा धर्म म्हणून मानला आहे. अर्थात, ज्या ज्ञानाची या दर्शनात चिकित्सा होते ते ज्ञान आपल्या नित्याच्या व्यवहारातील अस्थिर ज्ञानच होय. या ज्ञानाचे स्वरूप आता आहे आणि मग नाही अशा प्रकारचे म्हणजे अनित्य असते. वेदांती या ज्ञानाला केवळ 'वृत्तिज्ञान' म्हणतात. अशा वृत्तिज्ञानास आधारभूत असलेले साक्षिज्ञान, नित्यज्ञान अथवा शुद्ध चैतन्य याचीच चिकित्सा विशेषतः करतात. ज्ञान हे आत्मस्वरूप आहे. गुण नव्हे. तेव्हा ज्ञान म्हणजे विषयनिरपेक्ष वृत्तिरहित शुद्ध चैतन्य असते. तेव्हा मनुष्याला या शुद्ध चैतन्याचे ज्ञान झाले पाहिजे असे मत पू. महाराजांचे असते.

तसेच ज्ञानाचे दोन भाग असतात. एक भाग हा 'अनुभव' दुसरा

भाग 'स्मृति' असते. स्मृतीला पूर्वानुभवातून निर्माण झालेल्या संस्काराची आवश्यकता असते. ज्याचा कधीच अनुभव आला नाही त्यांचे स्मरणही होणार नाही. जेव्हा स्मरण होते त्याचे कारण आपल्या मनावर पूर्वीच्या अनुभवाचा जो संस्कार असतो, तो जागृत होतो. तेव्हा जीवनात संस्काराला, सत्संगतीला अतिशय महत्त्व आहे असा विषय पू. महाराज सांगत असत.

या तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर पू. महाराजांचा ज्ञानयोग सिद्ध झाला आहे. निंबार्काचार्यांच्या ब्रह्मसूत्रावरील भाष्याचा 'वेदान्त पारिजात सौरभ' या ग्रंथावर टीका लिहिली असून, त्या ग्रंथांची प्रस्तावनाच मुळी ११८ पानांची आहे. या ग्रंथातही तत्त्वज्ञानाच्या अंगाने अनेक बाबींचा समावेश आहे. यातील 'भूमिका' याविषयीचे विचार अत्यंत मोलाचे आहेत. ते म्हणतात –

''या विश्वात्मक देवाचे दर्शन ज्या साधनांनी होऊ शकते ती साधने 'दर्शन' या नावाने प्रसिद्ध आहेत. यालाच 'शास्त्र' अशी दुसरी संज्ञा आहे. **'हित शास्ती ति शास्त्राम्'।** या व्युत्पत्तीप्रमाणे, दर्शनशास्त्र कोणतेही घेतले तरी ते हितोपदेशकच आहे. या दृष्टीने सर्व शास्त्रांचा मूलतः अत्यंत विरोध नसून त्याचा समन्वय आहे हे सिद्ध होते. फक्त तशी दृष्टी बाळगून विचार झाला पाहिजे.

तेव्हा 'दर्शनिक' आणि 'वैज्ञानिक' या दोघांचे उद्देश दुःखनिवृत्ती व सुखप्राप्ती हेच असले तरी दोघांचे मार्ग भिन्न आहेत.

''भौतिक साधनांचा अभाव असतानाही मनुष्याचे जीवन शांतीने चालू शकते, पण आध्यात्मिक सामर्थ्यावाचून मात्र जीवन अशांतिमय होत असलेले आजही अनुभवास येत आहे. कोणताही समाज किंवा राष्ट्र आध्यात्मिक शक्तीशिवाय स्थिर राहू शकत नाही म्हणून दार्शनिकांच्या मार्गाने आत्मोन्नती करून घेणे यातच जीवनाचे खरे साफल्य आहे. विज्ञान

हे जीवनाचे गौण साधन आहे.''

''भारतवर्ष हे एकच राष्ट्र हे असे आहे की, अनादिकालापासून आध्यात्मिक प्रवृत्तीचे दिसून येते. 'अध्यात्म विद्या विद्यानाम्' अशा श्रेष्ठ अध्यात्म विद्येची आवड भारताच्या रोमारोमातून भरलेली आहे. अध्यात्म विद्येचे प्रकाशन करणारे वेद हे भारताचे अविनाशी अमूल्य धन आहे. वेदांमध्ये संपूर्ण विश्वाचे ज्ञान भरलेले आहे. भारतीय श्रौतदर्शनकार वेदाची उत्पत्ती व नाश कधीच मानत नाही, तर ह्याचा काळपरत्वे अविर्भाव व तिरोभाव मानतात.''

याच ग्रंथात त्यांनी विज्ञानाची व्याख्याही मांडली आहे. ''विश्वात दिसून येणाऱ्या चेतन व अचेतन अशा विभागापैकी चेतन प्रधान दृष्टीने विचार शास्त्र प्रवृत्त होते त्याला 'दर्शन' म्हणतात आणि अचेतन प्रधान दृष्टिने प्रवृत्त होणाऱ्या विचार शास्त्राला 'विज्ञान' असे म्हणतात.

या विचाराच्या माध्यमातून त्याच्या ज्ञानमार्गाचा विस्तार लक्षात येईल. इतकेच नाही तर, पू. गुळवणीमहाराजांच्या संकल्पशक्तीने प.पू. टेंबेस्वामीमहाराजांचे समग्र साहित्य एकत्र करण्याचे कार्य झाले तेव्हा एक समिती होती. त्या समितीचे पू. दत्तमहाराज हे कार्यवाह होते. परंतु सर्व १२ खंडांचे विषयवार विभागणी व त्या ग्रंथाचे मुद्रितशोधनाचे कार्य एकट्या पू. दत्तमहाराजांनी केले. सुमारे पाच हजार पृष्ठाचे हे कार्य असून त्यांच्या या कार्यातील बुद्धिमतेत्तेचे अद्भुत रूप प्रकट झाले होते.

तसेच 'सर्वसंग्रह' या ग्रंथाचे मराठीत भाषान्तरही केले आहे. अनेक पुस्तकांना आशीर्वादपर प्रस्तावना लिहून दिलेल्या आहेत. त्यांचा युक्तीवादही श्रेष्ठ होता. त्याची झलक ते प्रवचनातून कोट्या करीत असत, पण त्याला पारमार्थिक झालर असे. उदाहरण म्हणजे असे की, एक वर्षी निवडणुकीचे वेळी सप्ताह होता. तेव्हा ते बोलून गेले– निधर्मी राज्यपद्धती स्वीकारली म्हणतात, आणि धर्माविषयी कायदे करतात. ही काय राज्यपद्धती म्हणावयाची का? कारण सध्या डोकी मोजून राज्यसत्ता

मिळतात पण डोक्याला (बुद्धिला) किंमत नसते.'' अशी ही त्यांची एक अलौकिक ''साध्याही विषयी असे आशयही मोठा।'' असेही घडत असे.

पू. महाराजांच्या ज्ञानायोगाला भक्ती प्रेमाची जोड होती. प्रारंभीच्या काळ‍ात अनेक विद्वत सभा त्यांनी गाजविल्या होता. या ज्ञानाला विनम्रतेची एक सुस्पष्ट किनार होती. अनेक सभांना ते अध्यक्ष म्हणून जात असत. संयोजक व उत्सव नियोजनाचे भरभरून कौतुक करीत असत. 'हा सर्व ईश्वरी सत्तेचा खेळ' म्हणून त्याकडे पाहात असते.

पू. श्रीधरस्वामींचा मला अनुग्रह आहे. त्यांच्या ग्रंथाचे विवरण एका प्रवचन सत्रात मी करीत होतो. तो ग्रंथ म्हणजे पू. श्रीधरस्वामींचाच श्री दत्त करुर्णाव होय. या ग्रंथातील काही भाग मला उलगडत नव्हता. तेव्हा पू. दत्तमहाराजांकडे जात असे व त्याचा उलगडा ते सहजपणे करीत असत. ''महात्म्यांचे ग्रंथ लोकांपुढे असेच सांगत जा.' परंतु ते पुढे ते म्हणाले – 'सध्या ग्रंथ हे गुरू असे लोक मानतात, पण ही एक मर्यादा आहे. ज्या वेळी ग्रंथातील विषयाचे श्रवण करून मग त्याचा अभ्यास केला तर त्याचे आकलन होऊ शकते. त्या वेळी वक्त्यांचे सामर्थ्याने तेज त्याच्या वाणीतून प्रकट होते असते, त्या श्रवणाला महत्त्व असते. न्यायशास्त्र व ज्ञानाच्या दृष्टिकोनातून ते जीवनाकडे पाहत असत.

१९५७ सालचा प्रसंग आहे. पू. दत्तमहाराज वाडीला भागवत सप्ताहाकरिता गेले होते. पुण्यात काही साथीचा रोग फैलवला होता. त्यामध्ये पू. महाराजांची शोभा नावाच्या कन्येचा अंत झाला. दत्तमहाराजांची अनुपस्थितीत प्रत्यक्ष श्री गुळवणीमहाराजांनी अंतिम क्रियाविधी सर्व पार पाडले. परत आल्यावर दत्तमहाराज उद्गारले. तिच्या आईच्या दुःखापुढे आमचे दुःख काहीच नाही. साधी गोष्ट; शोभानी सांगितलेली खेळणी आम्ही आणू शकलो नाही. यामध्ये ईश्वरी न्यायच दिसून येतो. ती खेळणी आम्ही आणली असती तर त्या खेळण्याकडे

पाहून आम्हाला जास्ती दुःख झाले असते. यानंतर दोनच महिन्यांनी कांची कामकोटीपीठाच्या श्री शंकराचार्यांकडून सुवर्णकंकण व आशीर्वादपत्र हे पुण्याला आले. तेथील विद्वतसभेत दत्तमहाराजांनी आपल्या कुशाग्र बुद्धिने न्याय वेदान्त चर्चेत त्यांच्या ज्ञानाचे अलौकिकत्व सिद्ध झाले होते. त्याने मोठमोठ्या विद्वानांना मंत्रमुग्ध केले होते. एवढे असूनही त्यांच्या अत्यंत विनयशील वागण्याने तेथील सर्वांच्याच हृदयात पू. दत्तमहाराजांबद्दल स्नेह, आदरभाव, प्रेम, उत्पन्न झाले होते. त्यामुळे जगतगुरूंनी प्रसन्न होऊन सुवर्ण कंकणाची भेट पाठविली होती. त्याबद्दल महाराज म्हणाले, ''ईश्वर जसा न्यायी आहे, तसाच तो दयाळूही आहे. पहिल्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी देवाने हा प्रसाद पाठविला आहे. त्याच्या सत्तेने सर्व काही होत असते.'' त्या वेळी विलक्षण समभाव व संयमीवृत्तीचे दर्शन झाले. त्या वेळी पू. गुळवणीमहाराजांनी जे आशीर्वाद पत्र दिले त्याला उत्तर म्हणून दत्तमहाराजांनी लिहीले–

**आपले आशीर्वादाचे पत्र मिळाले. आपणासारख्या तपोधन महापुरुषांच्या कृपाकूर्म दृष्टीचे हे सर्व फळ आहे. पुण्यातील आत्तापर्यंतची जीवनयात्रा ज्या आपल्या निरूपाधीकारुण्य छत्राखाली मला घालवता आली, तेच छत्र जीवनास पुरे। एवढीच गुरूचरणी प्रार्थना !**

पू. शंकराचार्य कांची कामकोटी यांनी तर असे कळविले की,

''अद्वैत वेदान्त शास्त्रविद्येच्या ज्ञात्यांच्या केवळ समूहामध्ये श्रेष्ठ मोक्षविद्यारूपी अमृताचा रसानुभव घेणारे, असा गौरव करून सुवर्णाच्या तेजस्वी' कांतीने दैदिप्यमान असणाऱ्या ज्ञानशक्तीरूपी जगन्माता हेमवतीच्या चरणकमलांचा आश्रय करून, तिच्या सुवर्ण प्रसादभूषणाचा स्वीकार करून आपले करकमळ सुवर्णभूषित होवोत.'' असा आशीर्वाद त्यांनी दिला.

यावर पू. दत्तमहाराज म्हणतात 'प्रसाद चिन्हानि पुरः फलानि।' या न्यायाने हा प्रसाद म्हणजे अहंकाराचा नाश करणारे वज्रच आहे. 'अविनय अपनय विष्णो।' या षटपदीत सांगितल्याप्रमाणे दोषानिवृत्ती करून गुणाधान संस्कार मनावर निरंतर होत राहोत. अज्ञान आवरणाने झाकलेल्या चक्षूंचे उन्मीलन होऊन श्रेष्ठतम बुद्धी प्राप्त होवो आणि पुढील कोणत्याही जन्मात चिदानंदरूपी शिवपदाचा साक्षात्कार होण्याची योग्यता प्राप्त होवो,! अशी पदर पसरून आचार्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

असे हे त्यांची ज्ञानदर्शी आत्मनिवेदन निश्चित वंदनीय व चिंतनीय आहे. असे होते पू. दत्तमहाराज "ज्ञानीयांचे ज्ञानराजे।" म्हणजे मूर्तीमंत ज्ञानाचाच अवतार! ऽऽऽऽ म्हणता येईल.

# प्रकरण - बारावे

ॐ

# चैतन्याचा दीप उजळला

भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात 'वैदिक धर्म हाच मानव धर्म' हा संदेश सार्‍या जगाला दिला आहे. मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे प्रगती करणे व मानवी जीवन सार्थकाचा व शांतीकल्याणाचे मार्ग दाखविण्याची वा मार्गदर्शन करणारी ही आर्यप्रणाली विश्वाला प्राप्त झाली आहे.

**थोर उज्ज्वल परंपरा**

**जया ते नीतिपंथे चालिजे।**

**सत्यधूत बोधिजे।**

**देखावे ते देखिजे।**

**शास्त्रदृष्ट्या ।। ज्ञाने. ६.४४५।।**

... जे कुळ वा जे लोक नीतिधर्माच्या मार्गाने चालते, सत्याने जे पवित्र झालेले आहे, तेच बोलले जाते आणि जे पाहणे असेल ते शास्त्रदृष्टीने पाहते...

सत्य व शास्त्रदृष्टीने शुद्ध पावित्र्य संपन्न असे थोर आणि पवित्र, कवीश्वरांचे घराणे ! या अधिष्ठानामुळे या घराण्यात अनेक थोर विभूती अवतीर्ण झाल्या होत्या. त्या माध्यमातून 'चैतन्याची प्रभा' व 'ज्ञानाची सरिता' वाहत असून विश्वही चैतन्यरूप होते आहे.

'नीतिसंपन्न आचरण व सत्यत्त्व आणि पावित्र्याचा संस्कार मानवी जीवनात घडत असतो. त्याने मानवाचा विकास घडू शकतो.' हा सिद्धांत

आहे.

चैतन्याच्या अनुभूतीसाठी कर्मनिष्ठता, ज्ञानोपासना, तपाचरण, अखंड ईश चिंतन करणे आवश्यक आहे. यामुळे जीवाची चैतन्य प्रभा साधकाला मार्गदर्शन करू लागते. जे लोक साधक पू. महाराजांच्या सानिध्यात आले, त्या सर्वांना याची प्रचिती आली आहे. त्यामुळे संतांच्या शब्दांत म्हणावेसे वाटत की,

**उजळले भाग्य आता। अवघी चिंता वारली।।**

असे हे चैतन्याचे पू. महाराजांच्या उत्तर आयुष्यात विलसत होते. तत्त्वचिंतनाची प्रभा विचारधनरूपाने प्रकट झाली. महाराजांचे जीवनात प्रतिभा व पांडित्य यांनी पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राप्रमाणे विकसीत झाली होती. ज्ञानदेव माऊलीच्या शब्दात असे म्हणता येईल की,

**तैसे अध्यात्मशास्त्री इये।**

**अंतरंगाचे अधिकारी ये।।**

असे पू. महाराज साधकांच्या अंतरंगाचे अधिकारी बनले आणि चैतन्याचा दीप व परतत्त्वाचा स्पर्श याचा समतोल पू. महाराजांच्या जीवनात प्रकट होवू लागला.

## शुचिता वा पावित्र्य यांचा अनुबंध -

क्षेत्र गाणगापूर येथे जाण्याची सद्गुरू योगिराज गुळवणीमहाराजांची परंपरा पू. दत्तमहाराजांनी चालविली होती. एका वर्षी असे घडले की, पू. महाराजांना कै. जगन्नाथपंत पुजारी गुरुजींनी, गाणगापूर येथील एक निष्ठावंत उपाध्ये वेदमूर्ती भीमभट्ट चिंतामणी पुजारी यांचे घरी नेले. त्यांच्याकडची व्यवस्था पाहून बरोबरची मंडळी नाराज दिसत होती. वे. भीमभट्ट गुरुजी इतके म्हणाले की, ‘‘महाराज आपण येण्याचा आम्हाला

विशेष आनंद आहे. तथापि, आपल्या सारख्या थोरा-मोठ्यांची व्यवस्था करण्यासारखी आमचेकडे जागेची उपलब्धता नाही, आपली गैरसोय होत आहे, याबद्दल क्षमस्व!'' तेव्हा महाराज एकच म्हणाले, ''आहो, आम्ही असे किती राहाणार? आणि आपल्याकडच्या शुचितेला व पावित्र्याला अधिक महत्त्व आहे. वरकर्मी स्वच्छता टापटीप कितीही दिसली, तरी ते सारं बहिरंगी आहे. अंतरंग व बहिरंगालाही शुचिता व पावित्र्याची गरज असते. नीतिसंपन्न आचार, सेवावृत्ती, पवित्र शुद्ध विचार, यांनी स्पंदने निर्माण होतात आणि जीवाची चैतन्य प्रभा संक्रमीत होवू लागते.'' यावर पू. महाराजांनी उदाहरण दिले की, 'गोमयाने सारवलेली भूमी पवित्र असते. दिसावयाला अस्वच्छ जरी वाटले तरी ती शास्त्रधर्मानी ती भूमी पवित्र आहे. हेच एखादी स्त्री स्वच्छ असेल, पण ती रजस्वला असेल तर पवित्र वा शुचितेच्या अंगाने शुद्ध नसते.'

मनुष्याचे मन जेव्हा सारे ठरवू लागते, तेव्हा जाणीवेचे वा ज्ञानाचे, दरवाजे बंद होतात. शास्त्र आचारण, तसेच, धर्माच्या मूळ सूत्रांचा अर्थवेध घेतला जातो, तेव्हा विचारांचा दीप प्रज्वलित होतो, व मनुष्याचा विकास घडू लागतो. पावित्र व शुचिता, कर्माच्या अंगाने, कर्माचे घटक आहेत, असे साधेसुधी बाळबोध सुसंकृत विचारप्रणाली आहे. याने मानवाला मनःशांती प्राप्त होवू शकते. याचा निरागस लाभ लोकांना प्राप्त झाला तो महाराजांच्या सान्निध्यात!

महाराजांनी काय केले, हे माऊलीच्या शब्दात पाहू या-

**मार्गाधारे वर्तावें । विश्व हे मोहरे लावावे ।।** (ज्ञाने ३.१७१)

हे कार्य महाराजांनी केले. जे जे लोक महाराजांच्या सान्निध्यात आले, त्या सर्वांना शास्त्रप्रचिती दिली आहे. परतत्त्व स्पर्शाची जाणीव करून दिली. त्यामुळे आमच्या सारखे जे आहेत, त्यांचे जीवन प्रेम, स्नेह, सहवास, यांनी चैतन्य दीपाने उजाळीले होते.

भौतिक विश्वाचेही काही नियम असतात, त्याप्रमाणे विश्वाचे चक्र चालले आहे. तसे आध्यात्माचे प्रांगणातही काही व्यक्त व काही अव्यक्त नियम आहेत, त्यातील शुचिता व पावित्र्य या बाबी आहेत.

या संबंध विश्वात चैतन्याचा रस विविध रूपात, निरनिराळ्या अंगात, संक्रमित होत असतो, म्हणून शास्त्राधाराने, संत विचार प्रणालीतून लोकांना मार्गदर्शन करून, विश्वातील चैतन्य व अंतरात्माचे चैतन्य याला उजाळा देण्याचे कार्य पू. महाराजांनी करून 'विश्व मोहरे लावले आहे !' हे चैतन्य युक्त तेजोवलय विश्वात कार्यरत असते, ते सळसळते चैतन्य, भक्तीरसांची धारा महाराजांसारख्या पुण्यात्म्यांकरवी प्रचितीस येत असते. हे सारे पाहण्यास दृष्टी हवी आहे.

हे सर्व कार्य पू. महाराजांनी जीवनातील शुद्धाचरण व वैभवशाली आध्यात्मिकदृष्ट्या चैतन्याचा गाभा जीवनातून साकार केला होता.

## चैतन्य दीपाची प्रभा -

जन्मोजन्मीची साधना, उपासना आणि ईश्वरी अंशाचे प्रकटीकरण पू. महाराजांच्या जीवनात उत्तर आयुष्यात जाणवू लागले. हळूहळू अधिकाधिक काळ महाराज आत्मानंदाच्या तरंगावर आरूढ झालेले होते. ब्रह्मरसाने मधुर झालेले शब्द हे बोलले जात होते. आणि...

**आजि आनंदु रे आनंदु हाचि एकु परमानंदु रे ।...**

अशी अवस्था होती. वीज ही एक शक्ती आहे. तिचा उपयोग कसा केला जातो, तर बल्ब, ट्यूब लावून प्रकाश मिळतो, पंख्याला गती मिळते, यंत्राला गती मिळते. या सर्वांत वीज ही गतिमान आहे. तसे या विश्वात चैतन्य शक्ती ओतप्रोत भरलेली आहे. तीही गातिमान आहे. या चैतन्य शक्तीचा स्रोत अखंड वाहत आहे व विश्वातील प्रत्येक वस्तू प्रकाशित, गतिमान करीत असते. अशा चैतन्य शक्तीची प्रभा साधू,

संत, पुण्यात्मे यांच्या रूपाने व्यक्त होत असते. विश्वामध्ये सद्बोधाचा सुकाळ व्हावा यासाठी या शक्तीला अभिवादन करून मर्यादित जीवनात, अक्षरांचे (ग्रंथ) दीप निरंजन (मार्गदर्शक) ठरत असतो. असे ग्रंथ या महात्म्यांचे जीवन असते.

अशा प्रकारच्या तेजांनी पू. महाराजांचे ब्रह्मतेजाचे चैतन्य विलसत होते. जे साधक महाराजांचे सान्निध्यात आले त्यांचे काय झाले तर,

**आध्यात्मविद्येचे दाविलेसे रूप ।**

**चैतन्याचा दीप उजळला ।।**

ही अनुभूती आगळी वेगळी आहे. याच आत्मानुभूतीचे चैतन्य व परतत्त्वाच्या स्पर्शाने सर्वजण सर्व सुखास पात्र होतात. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की,

**धन्य ते सद्गुरू धन्य शिष्योत्तम ।**

**चैतन्याचा दीप उजळीला अनुपम ।।**

# प्रकरण - तेरावे

## ॐ

# नीतिमीमांसा

मानवी जीवन एखाद्या नदीप्रमाणे प्रवाहित व गतिमान असते. व्यक्तीगत जीवनात व समाज जीवनात ज्ञान-अज्ञान, श्रद्धा-अश्रद्धा यांचे द्वंद्व सतत सुरू असते. त्यामुळे सज्जन माणसाला, धर्माने व सज्जनपणाने जीवन कंठणे दुष्कर व दुरापास्त झाले आहे.

अशा वेळी संतांची चरित्रे, देवांची चरित्रे, भक्तांची चरित्रे, ही मानवी जीवनाला आधार देत असतात. व्यष्टी व समष्टी जीवनाच्या स्वास्थ्यासाठी एकनाथ महाराज म्हणतात-

**सगुणचरित्रे परमपवित्रे हरिची वर्णावी।**

**सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी।।**

**संतासंगे अंतरंगे नाम बोलावे।**

**कीर्तनरंगी देवासन्निध सुखेचि डोलावे।।**

याप्रमाणे पू. दत्तमहाराजांनी जीवन व्यतीत केले होते. पू. महाराजांना राजा भरत (अयोध्या), भक्त प्रल्हादजी, एकनाथमहाराज, संतशिरोमणी ज्ञानदेव, भगवान कृष्ण, प्रभू रामचंद्र यांची चरित्रे आवडीने गात असत. जेव्हा जेव्हा संधी उपलब्ध होई, तेव्हा तेव्हा या सर्वांच्या जीवन चरित्राची उदाहणे देत असत व वास्तवात त्याचे महत्त्व किती आहे, सध्याच्या काळात याची गरज कशी आहे, हे वारंवार सांगत असत.

पू. महाराजांचा आचार पारंपरिक शास्त्री पंडीतांचा असला तरी, पू. महाराजांचा लोकांना मार्गदर्शन करताना "वास्तववादी" दृष्टिकोन

असे, ही एक महाराजांची ''खासियत'' असे.

मला एक आठवतयं की, १९८१ साली पू. श्रीधरस्वामी यांनी स्वप्नात दिलेल्या अनुज्ञेनी आनंदाश्रमात शतचंडी हवन आमचे हस्तं ईशकृपेने, स्वामींच्या आशीर्वादाने संपन्न झाले होते. त्या वेळी मी क्षौर (मंगल) केले होते. त्यानंतर जेव्हा महाराजांची भेट झाली, त्या वेळी महाराज मला म्हणाले, ''आपण लक्षात घ्यावे की, आपण महाविद्यालयात, विद्यापीठात जाता-येता, नोकरी करीत आहात, तेव्हा आपल्या आचाराचा अनादर होता कामा नये, आपला पारमार्थिक अभ्यासही झाला पाहिजे. आमचे सारखे केवळ जीवनात धर्माचरण असेल, तेव्हा हे ठीक आहे! पण ...'' त्या वेळी इतर अनेक विषय बोलण्यात आले होते. असो.

यावरून लक्षात येईल की, महाराज व्यक्तीच्या अंतरंग व बहिरंग विकासाची अपेक्षा करीत असत. त्यात पू. महाराजांना बहिरंग आचारापेक्षा अंतरंग आचार श्रेष्ठ वाटत होता. समाज व व्यक्तीचा विकास करावयाचा असेल तर समाजशास्त्रीय सिद्धान्ताप्रमाणे अशी मांडणी होऊ शकते,

**१. सातत्याने कालपरत्वे, नवीन ध्येय, विचार, आदर्श समाजापुढे आले पाहिजेत, त्यातूनच मानवी विकासाला दिशा मिळणार आहे.**

**२. हे ध्येय साधताना नवीन विचारांचा स्वीकार, अंतरंग न बिघडताही करावयाला हवा आहे.**

जे कार्य स्वामी विवेकानंदांनी, दयानंद सरस्वतींनी केले आहे, तेच पू. महाराजांनी केले आहे. हे कार्य अत्यंत निरपेक्ष, पैशून्य स्थितीत केले आहे. या कार्यातून समर्थ रामदासांप्रमाणे भक्तीपंथ निर्माण केला आहे.

व्यक्ती व व्यक्तीचे संबंध मिळून समाज बनत असतो. त्यामुळे पू. महाराजांचा एक विचार निश्चित होता, आधी व्यक्तीविकास झाला

पाहिजे. त्यानंतर आपोआप समाज, राज्य, राष्ट्र, व वैश्विक विकास होऊन व शांती प्रस्थापित होवू शकेल. मनुष्याने अशुद्ध अंतरंगाने केलेला विचार व आचार, हा मनुष्याला पापवृत्तीकडे घेवून जातो. यासाठी पू. महाराज म्हणत, मनुष्याच्या ठिकाणची दुष्टबुद्धी नाहिशी करणे म्हणजे मनुष्याला शिक्षा केल्यासारखे होईल. तथापि, मनुष्यमात्रात व चराचरात ईश्वराची सत्ता पाहता आली पाहिजे. यातूनच पू. महाराजांनी निष्ठेने, क्षमावृत्तीने व अत्यंत विनम्र भावाने समाजात सुधारणा घडविली होती.

प्रारंभीच्या काळात पू. महाराज 'मीमांसावादी' होते. मंत्रशास्त्राचे मोठे उपासक होते. पुढे ते भक्तीपंथाकडे पूर्णपणे वळाले होते. कृष्णभक्त उद्धवासारखे जणू काही घडले होते. यामुळेच अखेरच्या काळात '**श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे।**' या मंत्राच्या नादब्रह्मात ते रमून गेले होते.

वेदान्तातील तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने विवेक निर्माण होतो. विवेक मनात ठसला की, नित्यानित्याची जाण येते. यातून भक्तीप्रेमरस निर्माण होतो, या विचारांच्या अधिष्ठानावर त्यांचा नीतिविचार होता.

अंतःकरण व प्रपंच ईशा चिंतनाने, हरिभक्तीने भरून गेले म्हणजे इतर कोणाताही अव्यवहार घडत नाही, यातूनच निर्भयता येते. अशा आध्यात्मिक विचारांच्या बैठकीवर नीतिविचार होते.

या अधिष्ठानावर आत्मबोधासाठी मनोभूमी तयार होते. विषयाबद्दल आपोआप वैराग्य येते. प्रारब्ध क्षीण होऊन आत्मसाक्षात्कार होऊ शकतो. नीतिसंपन्न आचरणाने मन, बुद्धी, आपोआप हरिचिंतनाकडे लागते व अंतरंगात हरिरूप साकार होते. आध्यात्मातील हा साक्षात्कार आहे.

**"विचारातून आचार निर्माण होतो व आचार हा मनुष्याचे नैतिक जीवन समृद्ध करू शकतो."**

हाच महाराजांचा सिद्धांत होता.

"नीतिविचार हा मानवी जीवनात कर्मापेक्षाही व्यापक आहे."

त्यामुळे "नीतिविचार म्हणजे ईश्वर साक्षात्काराच्या साधनेचे उपांग होय."

यासाठी प्रत्येकाने नैतिक मूल्यांचा अंगिकार केला पाहिजे. नैतिक मूल्यशिक्षण पद्धतीने बहिरंग विकास साधला जातो. त्यामुळे एखाद्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी उचित आचार विचारांचा अंगिकार म्हणजे नीतिचा अंगिकार होतो, यासाठी सद्गुण व सत्कर्म जोपासणे म्हणजे अमृतवल्लीची जोपासना करणे होय.

पू. महाराजांनी आत्मस्वातंत्र्याची संकल्पना मांडत असताना सांगितले, की, 'मनुष्याला व्यावहारिक जीवनात मर्यादित स्वातंत्र्य आहे. नैतिक भूमिकेच्या माध्यमातून मनुष्याला कर्माच्या अनुषंगाने स्वातंत्र्य असे त्याचा विचार केला पाहिजे. आत्मस्वातंत्र्यासाठी मनुष्याचे नैतिक जीवन समृद्ध हवे आहे.

**"मनुष्याने काय करावे वा काय करू नये याचा निर्णय, तसेच जे करावे ते का करावे, याचे शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण आपल्याकडील शास्त्र देत असतात. त्याचा अंगिकार करणे हेच नीतिशास्त्र पू. महाराजांचे होते."**

नैतिकमूल्ये ही आध्यात्मिक विकासाची द्योतक आहेत, हा व्यक्तीकडून समाजाकडे जाण्याचा क्रमविकास असून याने सुखसमाधानाची व परमानंदाची प्राप्ती होते. स्वार्थ, परार्थ व परमार्थ या टप्प्याने मनुष्य कर्मातीत होतो.

वास्तविक, ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग यांचा कर्माशी संबंध असल्याने दोन्ही रेषा त्या स्वतंत्र पाहिल्या तर समान्तर जातात. परंतु पू. दत्तमहाराजांनी या दोन्ही रेषांत निरपेक्ष, निर्हेतुक प्रेमानी समन्वय साधला आहे.

शास्त्रविहित व वास्तवातील कर्मे कर्तव्यबुद्धिने करून अंतःकरण शुद्ध होते आणि जीवनात सुखशांती प्राप्त होते. यासाठी प्रपत्ती, शरणागती

व पराभक्ती असा ईश्वरकृपेच्या साक्षात्काराचा त्यांनी क्रम सांगितला.

पू. महाराज साधकांना नेहमी सांगत, आपला नोकरी व्यवसाय यथायोग्य प्रकारे करावा. सर्व काही सोडून ईशचिंतन करणे त्यांना मान्य नव्हते. विद्यार्थ्यांने संध्यावंदनादि कर्मे आटोपून विद्यार्जन करावे, गृहस्थाने गृहस्थाश्रमातील कर्तव्ये पूर्ण करावीत. हे करतानाच जे घडेल ते आत्मचिंतन कराव. ग्रंथांचे वाचन, श्रवण करावे, समाजकार्य, राष्ट्रकार्य करावे. याने मनुष्य जीवनात शांतता व समृद्धी येऊ शकते, असे ते म्हणत असत.

व्यक्ती व समाज प्रगतीपथावर राहण्यासाठी नीतिमूल्यांचे अधिष्ठान आवश्यक आहे. यासाठी कृपाळूपणा, सहनशीलता, परोपकार, अपरिग्रह, मैत्र, करुणा, परबोधकता, समता हे सर्व गुण पू. दत्तमहाराजांना प्रेरक वाटत असत. या दृष्टीने पू. दत्तमहाराजांची ही नीतिमीमांसा समृद्ध आहे.

# प्रकरण - चौदावे

ॐ

# भक्तिविषयी

परमार्थाच्या प्रांगणात ज्ञान, कर्म, भक्ती, योग, उपासना या विषयी अत्यंत महत्त्व असते. कोणी, भक्ती प्रेम हे साधनेच्या 'प्रसाद' म्हणून म्हणतात तर, कोणी 'भक्तीयोग' म्हणतात, तर कोणी, 'भक्तीपंथ' म्हणतात. तेव्हा कोणी काही म्हणो, पू. महाराज हे श्रीमद्‌भागवद ग्रंथानुसार जे भक्तीचे स्थान आहे किंवा श्रीमद्‌गुरुचरित्र ग्रंथानुसार जे भक्तीचे स्वरूप आहे ते पू. महाराजांना अभिप्रेत होते. '**निर्हेतुक भक्ती**' असावी हे त्यांच्या शिकवणुकीचे सार होते.

पू. महाराज हे त्यांचे पणजोबा, वक्रतुंडमहाराज आले होते, हे आपल्याला त्यांचे चरित्रातून समजले आहे. पू. वक्रतुंडमहाराजांबद्दल असे सांगत असत की, त्यांनाही वक्तृत्त्वाची अलौकिक ईश्वरदत्त देणगी होती. ते रामायण, महाभारत, भागवत यावर प्रवचन सेवा करीत असत. ही प्रवचने म्हणजे श्रोत्यांना एक अपूर्व मेजवानी वाटत असे. चार-चार हजार श्रोते आवडीने जमून मंत्रमुग्ध अवस्थेचा श्रवणानंद लुटत असत. मस्तीषमध्ये विषय व जिव्हेवर सरस्वती सदैव सज्ज असे. कधी तर श्रोत्यांनाच प्रश्न विचारून ते प्रवचन सेवा सुरू करीत असत. त्यांची तास माहितीपूर्ण उद्‌बोधक व रसाळ प्रवचने होत असत. तसेच त्यांच्या भागवत् सप्ताहाच्या वेळी प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण व श्रीदत्तात्रेय ऐकावयास येत असत. याचा प्रत्यय अनेकांना येत असे. थोड्या बहुत फरकाने हाच अनुभव आम्हा लोकांना पू. महाराजांच्या भागवत सप्ताह प्रसंगी येत असे हे नमूद करावेसे वाटते.

आयुष्याच्या प्रारंभी पू. दीक्षितस्वामींच्या कृपानुग्रहाने १६ व्या

वर्षी भागवत सेवेचा प्रारंभ झाला असला, तरी प्रारंभी पू. महाराज हे मीमांसावादी होते. प्रथम आपण मीमांसेचा अर्थ समजून घेऊ.

'मीमांसा' या दर्शनाच्या तात्त्विक विचारात विशेष स्थान आहे. 'मीमांसा' या शब्दाचा सामान्य अर्थ चिकित्सापूर्वक परामर्श किंवा संबंधनिश्चिती असा आहे. पण त्याचा विशेष अर्थ म्हणजे वेदवचनांचा परिशीलनाने त्या वचनांचा समन्वय करून दाखविणे हा झाला रूढार्थ. मीमांसेचे दोन विभाग एक 'पूर्वमीमांसा' दुसरा विभाग 'उत्तरमीमांसा' हा होय. वेदाच्या कर्मकांडातील म्हणजे संहिता व ब्राह्मण ग्रंथातील वचनांचा समन्वय करणारे जे शास्त्र त्यास 'पूर्वमीमांसा' म्हणतात. तसेच ज्ञानकांडातील वचनांचा समन्वय करणारे शास्त्र त्यास 'उत्तरमीमांसा' होय. याला 'वेदान्त' असेही म्हणतात. वेदातील अध्यात्मज्ञानविषय उपनिषदात येते.

पू. दत्तमहाराजांनी 'वेदांत पारिजात सौरभ' या ग्रंथावर टीका लिहीताना जे विचार व्यक्त केले आहेत, त्यात अशा प्रकारे मीमांसेची मूळची प्रवृत्ती तत्त्वज्ञानपर नाही, परंतु जैमिनीच्या मीमांसासूत्रातील पहिले सूत्र 'अर्थाचे धर्मजिज्ञासा' असे आहे. यातून पाहिले की, धर्म याचा अर्थ अलौकिक आणि शुभ असे फल देणारी 'वेदोपदिष्ट यागादिक कर्मे' असा आहे. म्हणून मूलतः मीमांसा ही कर्ममीमांसा ठरते. त्यामुळे वेद हे अपौरुषेय आहेत. धर्मासंबंधी वेद हेच परम प्रमाण आहेत. धर्म हा कृतीशील आहे, तो साध्य आहे. याप्रमाणे सर्व विचारांची मांडणी पू. महाराजांची दिसून येते. परंतु वासुदेव निवासात गुरूसान्निध्य आणि परिपक्कवतेच्या परिमळातून पू. महाराजांच्या जीवनात भक्ती प्रेमाचा प्रवेश झाला आणि तुकाराममहाराजांच्या वचनानुसार

**सेवितो हा रस वाटीतो आणिका।**

**ध्यारे होऊ नका रानभरी।।**

पू. महाराजांनी सर्वांनाच भक्तीप्रेमात चिंब केले. जी अवस्था

उद्धवाची होती, तीच अवस्था पू. महाराजांची होती. परंतु गोकुळ वृंदावनातील गोपीभावातून उद्धवाला जे भक्तीप्रेम उमजले त्याच भावसंक्रमणातून पू. महाराजांचा प्रवास झाला असे म्हणता येईल.

पू. महाराज श्रीकृष्ण व भगवान दत्तात्रेय, गुरूंचे चरित्राविषयी बोलत असत तेव्हा त्यांचा मुखातून कैवल्याच्या चांदण्या वर्षावा होत असे. या वर्षावाचे रूपान्तर वर्षात (पाण्यात) होत असे. याचे शब्दरूपी तुषार जेव्हा बाहेर पडत तेव्हा श्रोत्यांनी आपल मन, बुद्धिरूपी शिंपले उघडे ठेवले असले की, त्यात हे 'तुषार' स्वाती नक्षत्राचे बिंदू होत असत आणि त्यात या थेंबाचे अर्थरूपी मोती आकार घेत असत आणि याच ज्ञानोत्तर भक्तीच्या ठेव्यात सर्वजण निरामय शांत होत असत.

या भक्तीप्रेमात नारद, प्रल्हाद, भीष्माचार्य, सुदामा, गोपी या भगवत भावात ते रमून जात. त्यातूनच 'वासुदेव जगत सर्वम्।' 'दाता एक रघुनंदन।' यावर ते स्थिरावलं होते. 'निर्हेतुक भक्ती' करता आली पाहिजे यावर त्यांचा विशेष भर होता. स्थळ, काळ व वेळेचे बंधन विसरून पू. महाराज या भक्तीप्रेमातून भरभरून श्रोत्यांचे अंतःकरण काया, वाचा, मनात भरून टाकत असत.

पू. महाराजांनी भक्तीप्रेमानी अरूपाला रूप प्राप्त करून दिले होते. यातून त्यांची भक्ती म्हणजे **'प्रेमात'** 'केवलानंदात' परिवर्तित झाली होती. प्रत्येकाने ज्ञान प्राप्त करून घेऊन भक्तीपंथानी भगवंताचे अनुष्ठान करावे. भक्तीमार्गाला ते म्हणत- सांख्य (ज्ञान) व कर्माची गरज आहे. त्यामुळेच अखेरीस ते **'नारायण भज रे मानसां नारायण भज रे।'** या वचनात मुग्ध होते.

भक्ती कशी असते तर, भगवद् नामस्मरणाने साधनेतील अहंकारादि दोष दूर जावून निर्विकारी अवस्थेत भक्ताला राहता येते. यात त्याचे रक्षण व्हावे असे भक्तीप्रेम भगवंत व सद्गुरूंवर करावे. म्हणजे काय

होते? भक्ताच्या रक्षणाची जबाबदारी ही भगवंतावर राहत असते, असे महाराजांचे म्हणत. तसेच, भक्तीयोगाच्या साधनेने कर्मबंध व कर्मक्षय होत असतो. परंतु कर्मबंध व कर्मक्षयासाठी भक्ती करावयाची नाही हे त्यांचे स्पष्ट मत होते. तर केवळ भगवंताच्या नामात, रूपात, गुणानुवाद, ध्यानावस्थेत, साऱ्यात केवळ भगवंतावर निर्हेतुक प्रेम करता येते ही पू. महाराजांची भक्तीबद्दलची भावना होती.

थोडक्यात पू. दत्तमहाराजांचे भक्तीविषयी चिंतन असे होते की,

- भगवंताचे, सद्गुरूंचे, संतांचे चरित्राचा अभ्यास करावा.
- मनानी ते सर्व विचार ग्रहण करावेत.
- चिंतनात भगवंताचे चिंतन वा ध्यान करावे.
- मुखाने भगवंताचे नाम घ्यावे.
- डोळ्यात भगवंताचे रूप साठवावे.

यातून जो प्रेमानंद निर्माण होईल ती 'भक्ती' होय. या भक्तीचा एकच निष्कर्ष आहे की, 'गुरू व ईश्वर' हे एक आहेत हे सर्व विश्व 'वासुदेवाचे' स्वरूप आहे. या ज्ञानाचे पर्यवसन हे 'भक्तीत' होणे आवश्यक आहे. अशाच भक्तीप्रेमात पू. दत्तमहाराज होते.

## प्रकरण - पंधरावे

ॐ

# परिपूर्ण वैराग्यसंपन्न जीवन

श्रीमत्भागवत ग्रंथात एक विचार आला आहे. तो असा की,

**वैराग्यरागोपाधिभ्यामाम्नातोभयलक्षणात् ।**

याचा अर्थ असा की, ज्याच्या ठिकाणी वैराग्य रागादि यां उपाधी ही भयरूपी लक्षणे आहेत. भावार्थ असा की, ज्याच्या हृदयामध्ये रागादि लक्षणे आहेत, तो प्रवृत्ती धर्म आहे आणि ज्याच्या हृदयात वैराग्य आहे, यासाठी निवृत्ती धर्म असतो. तेव्हा धर्म, ही वस्तु कार्याच्या गुणानुसार होत नाही, तर ती व्यक्तीच्या अधिकारानुसार कार्यातून प्रकट होते.

पू. दत्तमहाराजांचे ठिकाणी परिपूर्ण वैराग्याचे दर्शन होत असे. भक्ती, ज्ञान व वैराग्य हे सर्व अमूर्त भाव आहेत. यातून भावात्मक दर्शन होते. हृदयात भक्ती निर्माण झाली की अथवा ईश्वरविषयी प्रेम झाले की ज्ञानही प्राप्त होते व वैराग्यही प्राप्त होते हा भागवताचा सिद्धांत आहे. त्यामुळे भक्ती व तिचे पुत्र ज्ञान व वैराग्य हे सांगितले आहेत. ज्ञान व वैराग्य या शिवाय भक्ती पूर्ण होत नाही. तथापि, पू. महाराजांचे ठिकाणी भगवंताविषयी 'निर्हेतुक भक्ती' प्रेम असल्याने भक्ती, ज्ञान व वैराग्याचे हे मनुष्याने श्वासोच्छ्वास घेत असावा इतके सहज अंगिकारले होते. हृदयात जेव्हा भक्ती (प्रेम) असते तेव्हा भजनीय भगवंताचे ज्ञान होते, त्यामुळे रागद्वेष हे नष्ट होतात व वैराग्य प्रकट होते, ही यातील शृंखला !

पू. महाराजांचे जीवनात नसानसात वैराग्य भरून होते. त्यांनी सर्वांपुढे कार्याची रूपरेषा मांडावी. त्यांनी संकल्प करावा, उदारपणे लोकही

त्यांच्या या संकल्पला प्रतिसाद देत असत आणि कार्य पूर्ण होत असे. त्यानंतर, मी ते केले नाही भगवंतानी, सद्गुरूंनी केले, थोरल्या महाराजांची कृपा ही!'' असे सांगणे असे.

पू. महाराजांचे आचरण इतके साधे असे की, त्यांचे ठिकाणी एवढा अधिकार आहे हे सामान्याला ओळखणेही कठीण असे. जीवनात कटू प्रसंगही आले, पण हर्ष-विषाद दोन्ही समसमान मानून साम्य अवस्थेत ते रहात असत.

श्री ज्ञानदेव वर्णन असे करतात की,

**ते ज्ञान हृदयी प्रतिष्ठे। आणि शांतीचा अंकुर फुटे।**

**मग विस्तार प्रकटे। आत्मबोधाचा। ज्ञाने. ४.१९०**

अर्थ - (असे) ते ज्ञान अंतःकरणात स्थिर होते आणि मग शांतीचा अंकुर फुटतो, मग आत्मज्ञानाचा विस्तार होतो. मग जिकडे पाहिले तिकडे त्यांना शांती दिसते. असेच काही पू. महाराजांच्या जीवनात होते.

तसेच, ज्ञानदेव म्हणतात,

**सुखी संतोषा न यावे। दुःखी विषादा न भजावे।**

**आणि लाभालाभ न धरावे। मनामाजी ।। ज्ञाने. २.२२६ ।।**

अर्थ - आपल्या मनाप्रमाणे झाले असता सुख होते, पण मनाप्रमाणे झाले नाही तर दुःख होते. याविषयी संतोष मानू नये. म्हणजेच मनाविरुद्ध घडले म्हणून लाभ व हानी हे मनात धरू नये. अशा विचाराचा आदर्श पू. महाराजांचे ठिकाणी दिसत होता.

पू. महाराजांच्या जीवनातील एक घटना अशी की, एकाने भली मोठी रक्कम त्यांना दिली. त्या व्यक्तीने सांगितले, ''मला पावती नको.''

महाराज, म्हणाले 'ठीक! स्वतः उठले, आश्रमाचे कचेरीत आले, त्याची रीतसर पावती केली. त्यांना प्रसाद वगैरे दिला. ते गृहस्थ म्हणाले, "महाराज पावती कशा करता केलीत? मला ते कचेरीत देता आली नसती कां?" तेव्हा महाराज म्हणाले, "आपण आम्हाला रक्कम दिलीत, आता तुमचा संबंध संपला ना! मग आम्हीं काय करावयाचे ते केले! आपली काही हरकत नाही ना!" अर्थात ते गृहस्थ गप्प बसले, नमस्कार करून निघून गेले.

अनेक ठिकाणी विश्वस्त म्हणून पू. महाराजांनी कार्य केले. वासुदेव निवास येथे प्रधान विश्वस्त होते. त्यात त्यांची भूमिका मोठी विलक्षण होती. राजा भरताप्रमाणे त्यांची ही भूमिका होती. जे काही आहे ते गुरूंचे आहे, भगवंताचे आहे. आमचे काही नाही आम्ही केवळ विश्वस्त आहोत. त्याचे स्मरणानीच याचे रक्षण करीत आहे. कर्म करविता तोच आहे. ही एक त्यांची भूमिका होती. सार्वजनिक कार्यात ते राजा भरत (रामप्रभूंचे बंधू) याचा आदर्श ठेवून काम करीत असत. या राजा भरताचे ते चरित्र आवर्जुन सांगत असत. असे त्यांचे निःस्पृहपण होते.

पू. महाराज जेथे पू. धुंडिराजमहाराज पिताश्री, असत तेथे हा यांचे समोर बसतही नसत. प्रत्यक्ष त्यांच्यासाठी शांतीच्या कार्यक्रम समारंभासाठी पू. गुळवणीमहाराज, पिताश्री धुंडिराजमहाराज उपस्थित होते. महाराज व्यासपीठावर येईनात. धुंडिराजमहाराजांचे हे लक्षात आले. ते स्वतः व गुळवणीमहाराज हे जिथे पू. दत्तमहाराज उभे होते तेथे उभे राहिले. 'शब्देविण संवादु।' या ज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणे घडले आणि मग तिघेही व्यासपीठावर स्थानापन्न झाले.

पू. दत्तमहाराजांना प्रथम राष्ट्रीय पंडित पुरस्कार जाहिर झाला. त्या वेळी दिल्लीला जाण्याचे ठरले. प्रथम पिताश्री धुंडिराजमहाराज यांना देऊळगावराजा येथे जावून सांगावे, त्यांना वंदन करून आशीर्वाद घ्यावे, असे मनात येऊन पू. महाराज देऊळगाव राजा येथे गेले. पिताश्रींना वृत्तांत

सांगितला आणि आम्ही दिल्लीला जाणार सांगितले. तेव्हा पू. धुंडिराजमहाराजांनाही आनंद वाटला. घराण्याचे नाव मोठं केलंत वगैरे बोलून भरभरून कौतुक केले. रात्री सायंसंध्या, भोजन वगैरे आटोपले आणि पू. धुंडिराजमहाराज, दत्तमहाराजांना म्हणाले, "अहो, शासन आपला गौरव करतंय चांगलं आहे. यानिमित्ताने राष्ट्र हे संस्कृत देववाणीने पूजन करतय नाही कां ? पू. दत्तमहाराज, 'हो' म्हणाले. नंतर धुंडिराजमहाराज म्हणाले की, "का हो देवतेचे पूजन करावयाचे तर पूजनासाठी देवतेने पुजाऱ्याकडे जावयाचे कां? पुजाऱ्याने देवतेकडे जावयाचे? हे आम्हाला समजले नाही." यावर पू. दत्तमहाराज काहीही बोलले नाहीत. मग दुसरे दिवशी सर्व सकाळचे आन्हिक आवरून पू. दत्तमहाराज पुण्यास परत! आणि पू. धुंडिराजमहाराजांनी कळविले आपण खूप मोठे आहात, कृपाळू आहात आमचेकडून चूक घडत होती की काय? पण आपण ती सांगितली. आम्ही पुण्यास आलो. बघू पुढे काय होईल ते? असो. पुढे हा गौरव भारत सरकारनी पुण्यात येऊन स.प. महाविद्यालयात समारंभापूर्वक प्रदान केला.

परमार्थात वैराग्य व अभ्यास हे प्रयत्नपूर्वक करणे म्हणजे साधना असे पू. महाराज समजत असत. ते असे म्हणत की, ७५, ८१, ८५ वर्षांचे अनेक कार्यक्रम झाले हे सर्व शास्त्राच्या आज्ञा म्हणून! यातून 'यज्ञेश्वर पुरुषाचे' दर्शन सर्वांना घडत असे यासाठी हा अभ्यास आहे. "**कोण्याही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**" हा अभ्यास त्यांचा पूर्ण झाला होता.

ते स्वतः साधकांना दीक्षा देत त्यांची संकल्पशक्ती इतकी मोठी होती की, ते सांगत गुरूंचे स्मरण करावे, भगवती जगदंबेचे स्मरण करावे व बैठकीस बसावे. जगदंबा सर्व क्रिया करवून घेईल. मग पत्रद्वारे, संकल्पानी, केवळ सर्वांना अनुभव येत असे. ते यात स्वतःचे काही समजत नसत. जे काही आहे ते भगवंताचे आणि पू. गुळवणीमहाराजांचे

आहे. मी केवळ पोस्टमनचे काम करीत आहे. हे गुरूंचे कार्य गुरूच पूर्ण करून घेत आहेत हा भाव असे.

नेहमी पू. महाराज हे प्रवचनातून थोरामोठ्या माहात्म्यांचे अनुभव कथन करीत. त्यात त्यांच्याही अनुभवाचा प्रतिसाद असे, पण स्वत:विषयी कधी तसे व्यक्त करीत नसत. 'अहेतुकी व अप्रतिहत भक्ती प्रेम देवाजवळ मागावं!' असे म्हणत असत. अलीकडे कधी तुकाराम महाराजांच्या अभंगांचे स्मरण करीत म्हणत – **'याजसाठी केला होता अट्टाहास। शेवटचा दिस गोड व्हावा।'** सुदामजी, ध्रुव चरित्र सांगतांना रंगून जात. गोपी गीताच्या प्रेमभावाने ते मंत्रमुग्ध होत असत.

सुमारे १९९५ साली चि. अजित (पू. महाराजांचे धाकटे चिरंजीव) यांनी रेणुका निवासातील हॉलमध्ये एक मोठी शोकेस करून, त्यात महाराजांना प्राप्त झालेले पुरस्कार, स्मृतीचिन्ह, शाल, सुवर्णकंकण इ. अत्यंत योग्य पद्धतीने ठेवले. वास्ताविक, ही काळाची गरजही आहे. तथापि, पू. महाराजांनी जेव्हा हे पाहिले तेव्हा ते तत्काळ म्हणाले, ज्ञानदेव म्हणतात ना, **पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ति कानी नायकावी। हा अमुका ऐसी नोहावी। सेचि लोका।।** ज्ञाने. १३.१८८

अहो, तुम्ही सर्वांनी ज्ञानदेवांच्या उपदेशाविरुद्ध केलेत ना हे सारे आणि त्वरित ते आपल्या खोलीत निघून गेले. अशी ही वैराग्यसंपन्न विभूती होती. मला तर वाटत की पू. महाराज म्हणजे "साक्षात मूर्तीमंत वैराग्यच प्रकट झालं होते."

असे हे वैराग्यसंपन्न असलेले जीवन पू. महाराजांचे होते. पू. महाराजांचा विवाह झालेला पितृआज्ञेने त्यांनी सौ. आईसाहेबांना तंबुतील सिनेमा पाहण्यास नेले पण ते बाहेर बसले व सौ. आईसाहेबांना आत पाठविले. याचे कारण एक असावे की, "त्यांना उपजतच शाश्वताचे ज्ञान असल्याने, अशाश्वाताची ओढ त्यांना कधीच नव्हती व ओढ वाटलीही

नाही.'' म्हणून ते बाहेर बसले असावेत परंतु पत्नीची इच्छा पूर्ण केली.

वास्तविक, कैवल्य उपनिषदात म्हटल्याप्रमाणे त्यांचे वैराग्य कसे होते तर त्यांनी ऐहिकतेचा स्वीकार केला नसल्याने त्यागाचा प्रश्न नव्हता. त्यामुळे आनंदी शाश्वत वैराग्यच जणू त्यांचे ठिकाणी विलसत होते असे वाटते. एकदा ब्रह्मीभूत गजानन आश्रम स्वामी व मी होतो. तेव्हा संन्यास या विषयी बोलणे झाले. तेव्हा पू. दत्तमहाराज म्हणाले, ''आमची संन्यास घेण्याची इच्छा आहे परंतु, थोरले स्वामी (टेंबेस्वामी) यांनी आम्हाला केवळ पांढऱ्या वस्त्रांत कार्य करावे अशी आज्ञा दिली आहे ना! ती आज्ञा मोडता येत नाही!'' तेव्हा गजाननआश्रमस्वामी म्हणाले, ''जरी प्रत्यक्ष आपण संन्यास घेतला नाही तरी, आपले जीवन व वृत्ती संन्यासी आहे तेव्हा याची आवश्यकता नाही'' हा विचार ऐकावयाला मिळाला.

तुकाराममहाराज म्हणतात –

**वैराग्याचे भाग्य। संतसंग हाचि लाग।**

**संतकृपेचे हे दीप। करी साधका निष्पाप।।**

**तोचि देव भक्त। भेदाभेद नाही ज्यात।**

**तुका प्रेमे नाचे गाये। गणियात विरोन जाय।।**

असे काही माझ्यासारख्या सामान्य साधकाची अवस्था झाली होती असे वाटते. वैराग्य संपन्न असलेल्या विभूतीचा संतसंग लाभला होता. यातच आमचे सौभाग्य आहे असे वाटते.

# प्रकरण - सोळावे

# दैवी गुणसंपन्न पुरुषोत्तम

पू. दत्त महाराजांचे शांती ब्रह्मसेवन केलेले प्रसन्न आणि पंचविध पैलूंचे व्यक्तिमत्त्व होते. **'जयाचिया लीलेमाजी नीति जियाली दिसे'** याचे मूर्तिमंत प्रतिक होते. आजच्या या काळात थोर व्यक्तींची अशी संस्मरणे प्रत्येकाच्या आयुष्याला नवा अर्थ मिळवून देत असतात.

**थोर महात्म्ये होवून गेले**

**चरित्र त्यांचे पहा जरा।**

**आपण त्यांच्यासमान व्हावे**

**हाच सापडे बोध खरा।।**

या दृष्टीकोणातून पू. महाराजांच्या चरित्राचे अवगाहन करता येते आणि आपण जीवन सुस्नात करून घेवू शकतो, अशा महात्म्यांच्या स्मृती सतत जागविल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या संस्मरणाला एक व्यापक सामाजिक आशयही असतो.

हेच एक वर्म आहे. संत, महात्म्यांच्या कार्य व कर्तृत्वाने संस्कृती समृद्ध होते आणि लोकोत्तर पुरुषांच्या कर्तृत्वाने इतिहासाची उज्ज्वल पर्वे निर्माण होतात.

## पंचविध पैलूंचे सातत्याने दर्शन :

श्रीमद्‌भगवतगीतेत भगवंतानी अर्जुनाला सांगताना, जीवनाला यथार्थ वळण लागण्यासाठी पुरुषोत्तम अध्यायानंतर दैवी गुण संपत्तीचे दर्शन घडविले आहे. ही दैवी गुण संपत्ती पू. महाराजांच्या जीवनात परिपूर्णपणे सहजतेने अंगिकारलेली दिसत होती.

## अमानित्व :

ज्ञानेश्वर माऊली म्हणतात –

**तरी कवणेही विषयीचे। साम्य होणे न रुचें।**

**संभावितपणाचे। ओझे जया।। (ज्ञाने. अ.१३.१८५)**

ज्यांना एका आत्मस्वरूपावाचून देहबुद्धी उत्पन्न करणाऱ्या कोणत्याही वृत्तीशीं तन्मय होणे आवडत नाही व सज्जन म्हणवून घेण्यासही ओझे वाटते.

मानादिवृत्ती या द्वैतातच असतात. त्यामुळे ज्ञानी महान पुरुषांना त्यांच्या ठिकाणच्या गुणांची स्तुती केली असता वा माननीय म्हणून मान दिला असता, ते अधिक व्याकुळ होतात. पू. महाराजांच्या जीवनात अनेकविध प्रसंग होऊन गेले की त्या सर्व ठिकाणी, मनाच्या ठिकाणी सन्मानीत होत असताना –'खरं म्हणजे हे आपले काहीही नाही' असे त्यांच्या वागण्यातून दिसत असे.

प्रकांड पांडित्याची, ज्ञानाची, विद्वता ही प्रकाशित होत असतानाही अनासक्त जीवन व्यतीत करीत होते. पारंपरिक शास्त्री पंडीताप्रमाणेच धोतर, उपरणे (आत्ता आत्तापर्यंत पायातही काहीही घालत नसत. मोती बिंदूचे ऑपरेशन झाल्यावर, डॉक्टरांनी सांगितल्यावर सपाता पायात घालू लागले.) थंडीत प्रवासात अंगावर शाल घेत. त्यांच्या बहिरंगी व्यक्तीमत्त्वावरून अनभिज्ञ माणसाची नेमकी फसगत होई की, हे व्यक्तीमत्त्व म्हणजे हिमालयाच्या शिखराप्रमाणे उत्तुंग आहे हे जाणता येत नसे.

कुंडळ शृंगेरीचे जगद्गुरू शंकराचार्यांनी धारवाडला अद्वैत ब्रह्मविद्या परिषद भरवली होती. त्या वेळी भारतातील सर्व विद्वत जनांना पाचारण केले होते. तेथे झालेल्या ब्रह्मविद्येच्या चर्चेतील सिद्धान्त मांडताना सर्व विद्वान मंडळी सिमित झाली होती. त्यांनी पू. श्रीदत्तमहाराज यांचा

**'प्रदिपक शिष्य'** म्हणून गौरव केला. त्यावेळी कांची कामकोटीचे शंकराचार्यसुद्धा प्रभावित झाले. कांची कामकोटीच्या शंकराचार्यांनी पू. महाराजांच्या हातात सुवर्ण कंकण व महावस्त्र दिले आणि महाराजांना आयुष्यभर रुपये पाचशेचे वर्षासन सुरू केले. हे सुवर्ण कंकण जेंव्हा घरी आले, त्यावेळी काही दिवसांपूर्वीच चि. शोभाचे निर्वाण झाले होते. त्यावेळी महाराजांचे उद्‌गार वेगळेच होते. ते असे की, 'कन्या शोभा गेली पण कीर्तिरूपाने ती पुन्हा घरी आली आहे. सुख व दुःख हे नाण्याच्या दोन बाजू आहेत. यात महाराज निर्विकार होते. यातील वैशिष्ट्यता अशी की, **'प्रदिपक शिष्य'** म्हणून गौरव झाला तरी घरी अथवा पू. गुळवणी महाराजांकडे एकही शब्द बोलले नाहीत. केवळ विद्वत सभा उत्तम झाली, व्यवस्था उत्तम होती. परंतु गौरवाबद्दल एकही शब्द बोलले नाहीत, असे त्यांचे ठिकाणी अमानित्व होते.

**थोरपणा पऱ्हा सांडिजे।**

**उत्पत्ती आघवी विसरीजे।**

**जगा धाकुटे होईजे।**

**तै जवळीक माझी।। ज्ञाने.**

परमेश्वराची उपासना करताना, जे अनुभूतीचे ज्ञान मिळते ते ते त्यांनी झाकून ठेवले होते. आपला मोठेपणा कधीही त्यांना मोठेपणा वाटला नाही. असे सहजकर्माचरणात महाराज होते.

**पैशून्यस्थिती :**

**पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ति कानी नायकावी।**

**हा अमुक ऐसी नोहावी। सेचि लोका।।** ज्ञाने. १३.१८९।।

आपली पूज्यता आपल्या डोळ्यांनी पाहू नये. आपली कीर्ती आपल्या कानी पडू नये. आणि हा अमका अशी लोकांना आठवणही होवू नयेत अशी ज्ञानी पुरुष इच्छा करतो. सहस्रचंद्र दर्शनाचे वेळी महाराजांचे उद्‌गार असे होते की, ‘‘आमचे सहस्रचंद्र दर्शन, अमृत महोत्सव आदि कार्यक्रम गुरुकृपा, ईश्वर कृपा व आपल्या लोकांच्या प्रेमानी संपन्न झाले. तथापि या निमित्ताने लोकांना यज्ञयागादि कर्म, वेदाची पारायणे, व्याख्याने, पूजन, प्रवचन, कीर्तन, भजने, अन्नदान झाले. या सर्वात भगवंताचे जनतेला दर्शन झाले. तथापि होत असलेल्या सत्काराला, गौरवाला आम्ही पात्र आहोत की नाही हे समजत नाही, कारण ‘पूज्यता डोळा न देखावी... ही ओवी सांगितली. तेव्हा ‘तै जवळीक माझी’ हीच आमची इच्छा आहे. तेव्हा परमेश्वराचे सान्निध्य आम्हाला लाभेल.’ हे ऐकून हजारो लोक सस्मित झाले. अशा प्रकारे अंत:करणात कोणताही विकार उत्पन्न होत नसे.

## अक्रोधस्थिती :

पू. दत्तमहाराजाचे वागण्याचे वर्म मोठे विलक्षण असे, **कोण्याही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे** हे होते. महाराजांच्या जीवनात असे प्रसंगही येवून गेले की सर्वसामान्य मनुष्य सहजपणे क्रोधाच्या आहारी जावून काही अधिक बोलेल. परंतु त्या सर्व प्रसंगात पू. महाराजांचा ‘चांगले पाहणे’ हा एक दृष्टिकोन बरंच काही सांगून जात असे. सुख दु:खादि स्थितीत अथवा मानसन्मानात महाराज समत्वस्थित राहत असल्याने क्रोधाची स्पंदने आपोआप विरून जात असत. बृहस्पतीसारखी सर्वज्ञता व उद्धवजी सारखे कार्य करणे, यात पू. महाराजांची सर्वज्ञता लोकांना सहजपणे दृष्टिस येत नसे. आपली महती वाढू नये अशाप्रकारे साधी राहाणी पू. महाराजांची दिसत असे.

## दयावात्सल्यता :

आश्रमात येणाऱ्या-जाणाऱ्या सामान्य साधकाला उपदेशाने साध्या विषयातून दिलासा प्राप्त होत असे. दया भगवंतानी करावी. देवाची दया व माणसाची दया याती फरक प्रवचनद्वारा सांगत असत. कोणी आजारी असेल तर भेटायला जात असत आणि दुःखप्रसंगी समाचाराला गेल्यास वात्सल्य प्रगट होत असे.

सन् १९७९ ची गोष्ट: वै. श्रीमंत दादासाहेब नातू हे नर्मदा परिक्रमा करून आले होत. मी महाराजांना निरोप दिला. महाराज सायंकाळी आश्रमातून घरी जाताना भेटण्यास नातूंचे घरी आले. थोडा वेळ बसले व वर्तक वाड्यात परत गेले. पुन्हा सायंकाळचे आन्हिक आवरून नातूंचे घरी आले. आम्ही सर्व त्यांच्या अंगणात बसलो होतो. जुन्या आठवणी महाराज सांगत होते. थंडीचे दिवस; पौष अमावस्या होती. एकदम महाराजांनी आकाशाकडे पाहिले 'किती वाजले' मला विचारले. मी त्यांना सांगितले '१ वाजला'. आकाशाकडे पाहिले व उद्गारले. "वाईट वेळ टळली." असे म्हणून पू. महाराज निघून गेले आणि त्यानंतर माघ प्रतिपदेला रात्रौ ९.३० च्या सुमारास नातूंची प्राणज्योत मावळली.

संत महात्म्यांची ही दया वात्सल्याने पारलौकीक जीवनही समृद्ध करीत असते. अशी आमची धारणा आहे की, मृत्यूची वाईट वेळ महाराजांच्या तेथील अस्तित्वाने टळली. हे सामर्थ्य असूनही एक दिवसही याविषयी एकदाही उद्गार काढला नाही. तसेच, यावर काहीही बोलणे नाही. मी एकदा बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा "ईश्वराची ही असीम कृपा आहे. दादासाहेब नातू मोठे साधक होते. देवांनी त्यांच्यावर दया केली." बस्स! परमेश्वराचे प्रेम दयावात्सल्य हे पू. महाराजांच्या मधून अखंडपणे वाहत होते.

## सदैव चांगलच पहाण्याची दृष्टी :

भागवतात भगवान गोपालकृष्णाने एक विचार सांगितला आहे. त्यात गुणांचा एक समुच्चय सांगितला असून सदैव चांगले पाहाण्याची दृष्टी सांगितली आहे. यासाठी म्हणावेसे वाटते की, चांगले काय ते प्रथम समजलं पाहिजे ना ! मग पाहाणार आपण ! तर महाराजांचे वागणे-बोलणे सहजपणे चांगलेच असे. त्यामुळे महाराज सर्वांनाच नातवापासून 'आहो होवो' म्हणत असत. तसेच सर्व ठिकाणी पाहाण्याचा उदात्त दृष्टीकोन होता. अशी प्रेमदृष्टी सदैव दिसून येते. प्रारब्धसुद्धा सद्गुणांच्या अंगिकाराने क्षीण होवू शकते. ज्याप्रमाणे कमलपत्रावर पडलेले पाणी सहजपणे वाहून जात असते तसे महाराजांच्या वागण्यातून प्रत्येक गोष्टीतून पाहाण्याच्या दृष्टीकोनातून त्याचे वागणे कमलपत्रवत् त्यागपूर्ण असे.

याचे कारण असे अद्वैत स्थिती ज्या ठिकाणी परिपूर्णपणे झाली आहे, त्या ज्ञानी महात्म्यांना सर्व व्यापार हा मिथ्या भासू लागतो. या स्थितीला ज्ञान्याची व्युत्थान अवस्था म्हणतात. तेव्हा केवळ चांगलं पाहणे हेच घडते. तत्त्वज्ञान हेच चांगल (गुड) म्हणतात. तेच शिवरूप असते ही ज्ञानाची प्रगल्भ अवस्था आहे.

## समारोप :

सर्वत्राभिमानस्मैव प्रवर्तकत्वादभिमाना भावाच्य सम्यग्दर्शिनः । ब्र. सू. २.३.४८

ज्ञानी महात्म्ये ब्रह्मस्थिती दृढ करण्याकरिता शास्त्रानुसार वागत असतात. तेव्हाच त्यांच्या आचरणातून कृतीतून ज्ञान किरणे प्रकाशिक होतात. अशा संतांना एका आत्म्यावाचून देहबुद्धी उत्पन्न होण्याच्या वृत्तीशी ते कधीही तन्मय होत नाहीत. ज्ञान व मन याचा परिपक्व संबंध या गुणांशी असल्याने ते साधनरूपाने आपोआप सहजपणे प्रकट होवू

लागतात. गीतेत काम, क्रोध व लोभ नरकाची द्वारे म्हणतात. त्यामुळे कामाची पूर्तता होत जाते तसा लोभ वृद्धिंगत होतो व कामाची पूर्तता होत नाही तेव्हा तेव्हा क्रोध वाढू लागतो. मानसशास्त्रानेसुद्धा याचा स्वीकार केला आहे. त्यामुळे कामाला नियमित करणे व त्यावर प्रभुत्व निर्माण व्हावयाचे असेल तर मनुष्याने उत्तम गुणांचा अंगिकार केल्याशिवाय ही अवस्था प्राप्त होत नाही.

अशा प्रकारे परिपूर्ण ज्ञानी आरूढ व सर्व दैवी गुण संपत्तीने संपन्न असे पू. दत्तमहाराज कनवाळू व सर्वांना भगवत् प्राप्तीच्या सुखाची अनुभूती देणारे एक थोर व्यक्तीमत्त्व होते.

# प्रकरण - सतरावे

ॐ

## ।। विश्व हे मोहरे लावावे ।।

पू. दत्तमहाराजांचे जीवन अलौकिक होते. लहानपणापासूनच सत सहवास, परमार्थाचे तत्त्वांनी झालेले भरण पोषण. परिपूर्ण संस्काराचा एक परिपोषच दिसून येतो. त्यामुळे घरातील मोठा मुलगा ! ज्ञानाने, वृत्तीने प्रथमपासून तपस्वी. त्यामुळे मला वाटते, त्यांना 'लहानपण' हे माहीतच नसावे, असे हे सारं-सारं अलौकिकच म्हणावे लागेल.

ज्ञानदेवांच्या शब्दांत म्हणता येईल की,

**मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे ।।**

**अलौकिक नोहावे। लोकाप्रति ।। ज्ञाने. ३. १७१**

असे त्यांचे कार्य सुरू होते कोणतेही कर्म मी करत नाही. कशाचा उल्लेखही नाही. जे काही आहे ते सर्व सद्गुरूंचे आहे ही भावनिष्ठा. परंतु जणू काही साक्षात भगवंत त्यांचेकडून कार्य करून घेत आहे म्हणावे तर, अत्यंत निर्लेपपणे सहजकर्म सुरू होते. तेही विनम्र भावाने.

आनंदाश्रमात दरवर्षी आवर्जून येत असत. कै. भालचंद्र रा. खिस्तींच्या मातोश्री कै. वत्सलाबाई खिस्ती समोर असाव्यात. त्याही वयोवृद्ध! बार्शीकडील पाठकांच्या नातेहितसंबंधी त्या म्हणत "या शास्त्रीबुवा! जावईबापू!!" उल्लेख करावा. हसत ते स्वीकारावे. त्यांना महाराजांनी वंदन करावे, तेव्हा आजींनी विचारावे, काय म्हणते, 'आमची सुंदर!' यावर महाराज, म्हणता, "काय, लेकीने काही तक्रार केली कां?" त्यांनी म्हणावे 'तसं, नाही हो ! चौकशी केली झालं!' असे खिस्ती आजींनी म्हणावे असा एक प्रेम संवाद!

पण नंतर पारायणाच्या-प्रारंभालाच त्याचा जीव-शिवाचा आत्मसंवादपर प्रवचन होत असे. वेदधर्म, शास्त्रधर्मनुसार आचरण पवित्र ठेवून जीवन कसे व्यतीत करावे याचे मार्गदर्शन करावे. कधी आहाराविषयी सांगावे. सात्त्विक आहार ग्रहण करावा. शुद्धभाव व शुद्ध हेतूने केलेला स्वयंपाकाचे महत्त्व त्यांनी अनेक परीने पटवून दिले होते. सोवळे काय आहे, त्याचे महत्त्व कसे आहे, याबद्दलही त्यांनी मार्गदर्शन करावे. कधी ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तीचे विवेचन करावे आणि मोठ्या उत्साहात उपक्रमास प्रारंभ व्हावा. यामागे त्यांची शक्ती कार्यरत होती याचा अनुभव येत असे. अन्नापासून मन तयार होत असल्याने पवित्र मन शुद्धीसाठी पवित्र अन्न सेवनावर भर होता.

दरवर्षी वाडी, बार्शी, देऊळगावराजा, वासुदेव निवास मधील कार्यक्रम, सर्व ठिकाणी त्यांची प्रवचन सेवा होत असे. त्यातून लोककल्याणाचे मार्गदर्शन करीत असत. पू. महाराजांनी कधी परंपरा चालीरीती यावर टीका टीपणी केली नाही, पण आधुनिकतेचा उदार मनाने स्वीकार केला आणि उचित समन्वय शिकवणुकीतून दिला.

वै. सोनोपंत दांडेकर यांच्या जन्मशताब्दीच्या कार्यक्रमाचा प्रारंभ स.प. महाविद्यालयात त्यांचे हस्ते झाला. माझे भाग्य त्याबाबत थोर होते. श्री गुरुचरित्र अखंड पारायण संख्या आनंदाश्रम व अन्य ठिकाणी ते अध्यक्ष व मी कार्यवाह या नात्याने अनेक कार्यक्रम संपन्न करता आले. वास्तविक, सर्व यश हे त्यांच्यामुळेच होते याची जाणीव मला आहे. त्या वेळी लक्षात आले पू. सोनोपंतांबद्दल तर त्यांनी सांगितले. सोनोपंत दांडेकर हे एक वारकरी संप्रदायातील थोर संत होते. समाजात, आध्यात्माच्या क्षेत्रातील आदराचे स्थान, प्रवचन, कीर्तनद्वारा त्यांनी लोकांना परमार्थाचे मार्गदर्शन केले. दांडेकर हे महाविद्यालयाचे प्राचार्य जरी होते, तरी आध्यात्म्याच्या क्षेत्रातील थोर आचार्य होते. तसेच आधुनिक काळातील संतकुळीचे एक राजेही होते. एक ज्ञानोपासक संत होते असे उद्‌गार

काढले. परंतु त्याबरोबर समाजालाही जागृत केले. चरित्रसंपन्न व्यक्तीचे आदर्श कसे निर्माण झाले पाहिजेत सांगितले. त्या बरोबर "आध्यात्मिक जीवन उत्तमपणे जगण्याची प्रेरणाही समाजात प्रस्थापित झाली पाहिजे. त्यामुळेच आपण सोनोपंताची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. तेव्हा अशांच्या जीवनातून त्यांचे बोध, त्यांची शिकवण कशी उपयुक्त आहे याचा विचार मांडला. सुसंस्काराने मनात सहज कर्माची प्रेरणा होवून आत्मविश्वास कसा वाढतो हे त्यांच्या प्रबोधनाचे सूत्र होते.

पू. केशवराव देशमुखमहाराज यांचे पुण्यतिथी सोहळ्यात सहभागी व्हावे. वारकरी संप्रदायाचा त्यांनी मागोवा घ्यावा व समाजात समता, कर्मशीलता व आंतरीक सामर्थ्याचा विकास कसा होईल या प्रमाणे मार्गदर्शन करावे. एकदा त्यांनी सांगितले, "ज्ञानदेव म्हणतात – "**बुद्धिचे वैभव अन्य नाही दुजे। एका केशवराजे सकळ सिद्धी।।**" तसे पुण्य नगरीचेही एक वैभव आहे की, "केशवराव देशमुखमहाराजांचे हे पुण्यात व्हावेत. गुळवणीमहाराज व्हावेत हे भाग्य." हे वैभव पुण्य नगरीचे आहे.

"**संत दर्शने हा लाभ। परमनाभ जोडिला।।**" असे संत वचन आहे. खरोखर पू. महाराजांना सर्वच सांप्रदायात अग्रपूजेचा मान होता. ते कोणालाही कमी समजत नसत. परंतु कोणीही त्यांचे दर्शन घेतले की, त्याच्या पावित्र्य व शुचित अशा आचरणाने व दर्शन घेणाऱ्याच्या जीवनातील ताप व पाप दूर व्हावयाचे, दुःख बोलावयाला यावे तर दुःखच मूक होवून शांत व्हावे हा अनुभव येत असे. प्रत्येकाला अनुभव येई की, आपण शांती सागराच्या गंगौधाच्या किनाऱ्यावर आहोत. हा एक 'शब्दविण संवाद!' घडत असे.

सहजपणे सांगावे, जे काही मिळते त्यावर संतोषाने राहायला पाहिजे. निर्वाहाला फार लागत नाही. संतांनी देवाजवळ 'निर्वाहपुरते द्या' असेच मागितले आहे ना! आयाचित वृत्ती अंगिकारावी. 'दाता एक

रघुनंदन!' ही गोष्ट मनात रूजते व अहंता व ममता संपून जावून अंगी धैर्य निर्माण होते. वासना, मागणं एकदा का संपलं की, मनही आपोआप शांत होते. तो ज्ञानाचा, भक्तीचा अधिकारी बनतो. हेच त्यांच्या शिकवणुकीचे सार होय.

नोकरी व्यवसाय प्रामाणिकपणे करून ईशचिंतन करावे. कर्म सोडून ईशभक्ती, आराधना घडू शकत नाही हे त्यांचे मत होते. याचे कारण असे सांगत की, संसारही मनात आणि ईशअनुसंधानही मनात असते. तेव्हा मन शुद्ध व पवित्र ठेवणे आवश्यक आहे. "विचार, विवेकशुद्धी, आचारशुद्धी, कर्मशुद्धी व हेतुशुद्धी, भावशुद्धी या सर्वांचा यावर परिणाम होत असतो. त्यामुळे हे सर्व शुद्ध व पवित्र ठेवणे आवश्यक आहे. तसेच मन भगवंताच्या गुणानुवादाने, नामसंकीर्तनाने स्थिर करून, संसारातून बाजूला काढणे हेच एकमेव साधन आहे असे" ते त्यांचे मत होते. हे साधन यशस्वी होण्यासाठी सत्संग, सद्गुरूसंग ठेवावा. यासाठी श्रद्धा व शक्ती हवी असे त्यांचे मन होते. कारण श्रद्धेने साधना दृढ होते तर शक्तीने ती संपन्न होते. यात देवाचा अनुग्रह व सद्गुरूंची कृपाही लागत असे या दृष्टीने ते मार्गदर्शन करीत असत.

हे विश्व विविधतेने नटलेले आहे. अखंड जीव योनी आहे. या सर्वांत मनुष्य हा केवळ एकमेव जीव असा आहे की, या नरदेहातूनच तो ईशप्राप्ती करून घेत असतो. म्हणून असे महात्मेचे असतात ते या विश्वालाच ते ईश्वराप्रत घेऊन जातात. '**आपणा सारिखे करीती तात्काळ।**' इतके सामर्थ्य त्यांच्याकडे असते.

पू. महाराज योग मार्गाची दीक्षा देत असत. ती सुद्धा संकल्पाने किंवा पत्रद्वारे देत असत. याबद्दल त्यांचे विचार अत्यंत कठोर असत. कुंडलिनी ही जगदंबा स्वरूप असून. त्याच्या अनुभूतीसाठी साधकांनी त्याचे नीतिनियमाची शुद्ध आचाराचे कठोर पालन केले पाहिजे यावर त्यांचा भर होता. बैठकीचा अभ्यास केला पाहिजे. हे ते सांगत असत.

तथापि, मी काही करतो असे नसून सद्गुरू व जगदंबाही कृपा करेल असे सांगत. परंतु त्यात पू. महाराजांची संकल्पशक्ती असेल याचा अनेक साधकांना अनुभव आला आहे. असे अलौकिक सामर्थ्य त्यांचेकडे होते.

**'बुडते जन न देखवे डोळा।'** या तुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणे त्यांचे कार्य अव्याहत चालले होते. येणाऱ्या पत्रांना रोज उत्तरे पाठवीत असत. पत्रोत्तराचा कार्यक्रम रात्री उशीरापर्यंत असे. प्रत्येकाचे समाधान होईल असे विचार पत्रांनी कळवीत असत. कोणाकडे लग्न, मुंज असे मंगलप्रसंग असो, बोलाविणे आले की, महाराज आशीर्वाद देण्यास आवर्जून जात असत. तसेच दुःखद प्रसंगीही ते भेट घेत असत आणि त्यांचे सांत्वन करीत असत. त्या वेळी दुःखी जीवांना त्यांचा शब्द हा अत्यंत मोलाचा वाटत असे. कर्म विषय आणि पाप-पुण्याचे विचारांनी जीवाला दिलासा वाटत असे. कोणी अडचणी सांगण्यास आल्यास त्यांना उपासनेचे मार्ग सांगत. मंत्र, अनुष्ठान अथवा श्रीगुरुचरित्र पारायणाची उपासना करावयास सांगत असत या प्रकारे त्या विश्वाला सन्मार्गाला लावले होते.

अशा रितीने जीवनभर कधी व्यक्तीगत, कधी समाजाला मार्गदर्शक म्हणून कार्य केले. साधकांना साधनेचा मार्ग दाखविला. विश्वाला त्यांनी ईश्वराभिमुखतेचा वस्तुपाठ देवून सर्वांचेच जीवन कृतार्थ केले असे हे एक योगीराज होते.

# प्रकरण - अठरावे

# उपासना एक चिंतन

विसाव्या शतकातील संत परंपरेतील आणि या आधुनिक काळातील ऋषी म्हणता येईल असे व्यक्तिमत्त्व म्हणजे, 'ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर' हे होते.

पू. महाराज हे अत्यंत मितभाषी होते. तथापि, प्रवचन, व्याख्यानाच्या वेळी अत्यंत ओघवत्या भाषेत बोलत असत. त्यांच्या शब्दांत देववाणीच्या परतत्त्वाचा एक स्पर्श असे. त्यामुळे सर्वजण, मंत्रमुग्ध होत असत. पू. महाराज म्हणजे ऋजुता व अमानित्वाचे मूर्तिमंत रूप होते. त्यांची वृत्ती सदैव अंतर्मुख असे, ते अत्यंत विनम्र असत. ते प्रज्ञावंत होते. त्यामुळे ते शब्दप्रभू होते असे म्हणणे यथार्थ होईल. "**अधिकार तैसा करू उपदेश!**" प्रमाणे ते साधकांशी संवाद करीत असत. त्यांनी वेळोवेळी जे उपदेश केले होते, त्यात उपासनेबद्दल जे चिंतन व्यक्त झाले आहे, त्याचा मागोवा येथे घेणार आहोत.

## उपासनेची गरज

मनुष्याच्या टिकाणी राग, मत्सर, द्वेष इ. विकार आणि पाप वासनांनी मनुष्याच्या हातून पापकर्मे घडत असतात. तसेच, ज्याचा मनःस्ताप केला जातो, त्यातून विकार निर्माण होतात. हे तर पूर्व कर्माचे फळ असते, त्याने परमार्थ घडत नाही. यासाठी मनुष्याने सद्गुणांचा अंगिकार करावा. मनातील दोष गेले म्हणजे मनःशुद्धी होते. हा ईश्वराचा प्रसाद असतो. तेव्हा साधक, उपासकांनी सदैव उपासना करावी.

उपासना करताना संसार सुख मिळावे म्हणून उपासना करू नये. परंतु उपासना करताना जरी सुख मिळाले, तरी ईश्वराच्या कृपेने मिळाले,

हे जाणले पाहिजे. तसेच, असे जे संसारसुख असते, ते मुक्तीकडे नेणा ठरते. याने संसारात, कुटुंबात सुख समाधान राहते, त्या वेळीं उपासनें परमार्थही साधू शकतो.

## उपासनेसाठी आवश्यक बाबी :

उपासना करताना आपण जे करतो, त्यावर पूर्ण श्रद्धा हवी आणि देव व गुरू यांचेवर पूर्ण श्रद्धा हवी. उपासनेत रोज मन व चित्ताचे निरीक्षण करावे. याने मनातील चित्ताचे दोष जातात. विकारांचे उपशमन होते उपासकांचा साधकांबरोबर मैत्रीभाव धरावा. दुःखी माणसाबरोबर दया व करूणा उत्पन्न झाली पाहिजे असे वागावे. नेहमी दुसऱ्याला मदत करण्याची तयारी ठेवावी. बरं सुख मला मिळावे वाटते, तर ते अधिक दूर जाते तेव्हा कुटुंबात, समाजात इतर संबंधीत सुखी होतील तेव्हा आपणही सुखी होवू शकतो.

उपासनेत 'मी' व 'माझं सुख दुःख' याची विस्मृती झाली पाहिजे निरनिराळे ग्रंथ वाचन करावे, संतचरित्रांचे वाचन करावे. अभंग गायन करावे ही-ही एक उपासना आहे. थोडक्यात, **"ज्याने मन, बुद्धी चित्त शांत-स्थिर होते, ती उपासना होय."** हा पू. महाराजांचा विचार आहे.

उपासनेत फलदाता ईश्वर आहे, हे पूर्णपणे समजले पाहिजे. हाही एक अभ्यास आहे. उपासना करताना माहात्म्यांच्या शब्दांवर , ऋषींच्या शब्दांवर श्रद्धा हवी, ते ऐकून आचरण करावे. माझ्या मनाला, बुद्धिला पटत नाही ते मी करणार नाही, ही दर्पोक्ती असू नये. संतांच्या शब्द सामर्थ्याने मन, बुद्धी चित्तातील दोष नष्ट होतात.

प्रपंच्यातील गोष्टी प्रारब्धाने घडतच असतात. यासाठी परमार्थ विचारात राहावे, सद्बुद्धी राहील हे पाहावे, सत्कर्म, सदाचारांनी दृढता ठेवली तर प्रारब्धाने आलेल्या संकटाचे निराकारण होवू शकते. उपासनेने

देहबुद्धी नष्ट होवू शकते हे ध्यानी ठेवावे.

उपासनेत साधक रमू लागला की, त्याचे लौकीक व्यवहारात मन रमत नाही. परमार्थात प्रगती वेगाने होते. यासाठी साक्षी भावाने उपासनेत रमून जावे. तसेच, वेदशास्त्रावर देव व गुरूंना प्रिय होईल अशी उपासना ठेवावी.

उपासनेत शुचितेला फार महत्त्व असते. उन्नत अवस्था प्राप्त होत असल्याने तारतम्य भाव निर्माण होत असतो. उपासनेत उपासक साधकाने आहार विहार सांभाळावा. सात्त्विक अन्न ग्रहण करावे. उपासना सगुण असो किंवा अन्य कोणतीही उपासना असो, उपासनेबद्दल भ्रम उत्पन्न होता कामा नये. यासाठी मनोनिग्रह हवा आहे. तसेच, साधकांच्या शुभ वासना असाव्यात. उपासनेत राहिल्याने कर्मबंधन शिथील होते.

## उपासनेच्या गोष्टी :

उपासकांनी उपासना म्हणून नामजप, ध्यान करीत असावे. नंतर क्रमाक्रमाने योगक्रियेचा अभ्यास करीत त्यात रमून जावे, तन्मय व्हावे. उपासकांनी नित्य भगवंत, सद्गुरूशी आत्मनिवदेन करावे. आपल्या उणीवा समजून घेवून, त्या परत होणार नाही इकडे लक्ष द्यावे. सद्गुरू, देवता कोणतीही असेल; सर्वत्र आपल्या उपासनेचे आणि उपास्य देवतेचे स्मरण ठेवावे. इतरांना कमी लेखू नये. प्रत्येक कर्म समर्पणभावाने करावे.

उपासना करताना प्रपंच हा अलिप्तपणे करावा. प्रपंच्यात कर्तव्ये कर्म केली तर मन आपोआप अलिप्त होते. ही कर्तव्य कर्मे करताना, आपल्याला कितीही त्रास झाला, तरी सन्मार्ग सोडू नये. धर्माला अनुसरून उपासना ठेवावी, म्हणजे प्रपंच व परमार्थ दोन्ही साधू शकतात.

पू. महाराजांचे वैशिष्ट एक होते की, साधकांनी उपासना करूनच

जीवनात इच्छित गोष्टींची प्राप्ती करून घ्यावी, म्हणून ते साधकांना मंत्रउपदेश, श्रीगुरुचरित्राचे अनुष्ठान, देवी माहात्म्य इ. ग्रंथ वाचन किंवा जपाचा उपासमा सांगत. यावरून एकच समजते की, श्रीमद् नरसिंह सरस्वती स्वामी महाराज (गाणगापूर) यांनी ज्याप्रमाणे साधकांना, भक्तांना उपासना सांगून त्यांची कार्यसिध्दी केली. त्याप्रमाणे पू. महाराजांचे कार्य होते. ते साक्षात सिद्धपुरुषच होते. वास्तविक, पू. महाराजांच्या सांगण्यात एक संकल्प शक्ती व संजीवन शक्ती होती, म्हणून साधकांची उपासना फलद्रुप होत असे. तसेच, पू. दत्तमहाराजांचा समर्थांच्या वचनावर पूर्ण विश्वास होता. तो म्हणजे,

**उपासनेला दृढ चालवावे ।**
**भूदेव संतांशी सदा लवावे ।**
**सत्कर्म योगे वय घालवावे ।**
**सर्वांमुखी मंगल बोलवावे ।।**

# प्रकरण - एकोणिसावे

# 'येणे कारणे परब्रह्म'

## (पू. दत्तमहाराज कवीश्वरांचे महानिर्वाणाचा प्रसंग:)

पू. दत्तमहाराजांचे महानिर्वाण, सोम दि. १ मार्च , १९९९ रोजी झाले. एक महान अलौकिक घटना !

दत्तसंप्रदायी व शक्तिपात दीक्षेचे पू. गुळवणीमहाराजांचे उत्तराधिकारी असणाऱ्या दत्तमहाराजांचा मृत्यूही असामान्य ठरला.

पू. दत्तमहाराज पू. गुळवणीमहाराजांप्रमाणे मंत्रदीक्षा, स्पर्शदीक्षा, स्वप्नदीक्षा व संकल्पदीक्षा देते असत. हा योगमार्ग सर्व साधकांसाठी सोपा करून समाजात रूढ झाला आहे. त्याला आचारविचारांची मर्यादा असते. 'शक्तिपात दीक्षा' ही अभ्यासाने दृढ होते व तो फलद्रूपही होऊ शकते.

देवी भागवतात ऋषी असे म्हणतात-

**न योगो नभस: पृष्ठे न भूर्मो न रसातले**

**ऐक्यं जीवात्मनोराहुर्योगं योग विशारद: ।।**

हा योग म्हणजे स्वर्ग, भूमी किंवा पाताळात कुठेही नाही तरी योगाच्या ज्ञानाने, अभ्यासाने, आत्मा व परमात्म्याचे मीलन होणे हा योग. ही चित्‌शक्ती आत्मस्वरूपात गतीमान होते. त्यामुळे महापुरुषांच्या प्राणोत्क्रमणाचे वेळी ही शक्ती अत्यंत गतिमान होते. त्या गतीचा वेग, परिणाम मोजणे अवघड असते.

मी आत्तापर्यंत दोन महापुरुषांचे देह ते जीव अनंतात विलीन झाल्यावर पाहिले. त्या देहांचे दर्शन घेतले आहे. एक पू. भगवान

श्रीधरस्वामीमहाराज व दुसरे कांची कामकोटीचे परमाचार्य चंद्रशेखरेंद्रसरस्वतीस्वामीमहाराज. या दोघांची व पू. दत्तमहाराज यांच्या देहाची अवस्था एकच होती.

जीवात्मा व शिवात्माचे मीलन होताना, ज्याप्रमाणे सूर्योदय काली किंवा अस्तकाली जी सुवर्णप्रभा – क्रांती या विश्वावर पसरलेली असते, ती या मीलनाची असते बरं ! त्यामुळेच दिवसा प्रातःकाली प्राणोत्क्रमणाचे वेळी रेणुका निवासात काही काळ या प्रभेची अनुभूती होती तर अस्थिविसर्जनाचे वेळी सूर्याच्या अस्तमान समयाची वेळ, याच प्रभेची होती, यातच आम्ही सर्व '**यतो वाचानि वर्तते ।**' प्रमाणे एक क्षणभर 'स्तब्ध होतो ! शांत होतो ! कृष्णा– पंचगंगा संगामातील नदी प्रवाह क्षणभर कसा निरामय शांत होता. जणू काही त्या कृष्णामाईला आनंद वाटत होता. जे बाळ, मी ती. सौ. सरस्वतीच्या उदरी स्थापन केले तेच, ज्ञानदेवी सरस्वतीने भक्ती लक्ष्मीच्या लेकरांच्या हस्ते पुन्हा आपल्या उदरी घेताना, साऱ्यांची एक उन्मनी अवस्था व सुवर्णकांतियुक्त सूर्यप्रभेत नारायण नामाच्या नौकेत आम्ही अगदी मूक होतो बरं !

**उपजे ते नाशे ।**

**नाशे ते पुनरपि दिसे ।**

**ऐसे हे घटिका यंत्र । परिभ्रमे गा ।। ज्ञानेश्वरी**

ज्ञानेश्वर माउली म्हणतात, 'जे जे निर्माण झाले आहे, त्याचा नाश निश्चित आहे व ज्याचा नाश झाला त्याची ही पुन्हा निर्मिती होते.' हे काळाचे यंत्र अव्याहत सुरू आहे. याचे प्रतीक म्हणजे, सूर्योदय व अस्तकाळी सुवर्णकांतीची प्रभा सूर्यनारायण विश्वावर उधळत असतात. त्याची साक्ष म्हणजे, पंचमहाभौतिक देहातून चैतन्यरूप तेजोभास्कर अनंताकडे झेप घेत असताना, त्याची सुवर्णकांतीयुक्त प्रभा देहावर प्रगट होत असते. हीच एक अलौलिक घटना म्हणावी लागेल.

पातंजली योगसूत्र - विभूतीपाद सूत्र - ४४, मध्ये व्यक्त केल्याप्रमाणे - प्रातःकाळी महाराज अनंतात, 'द्यु' लोक, - ब्रह्मलोकांस गेले. लौकिक दृष्टीने व शास्त्रधर्माने सर्व गोष्टींचे पालन आपण सामान्य माणसांनी केले तरी, या कोणत्याही बंधनात महाराज राहिलेले नाहीत अशी आमची धारणा आहे.

योगाभ्यासामुळे, संतकृपा, ईशकृपेमुळे, ईश्वरी अवतारी पुरुषांच्या ठिकाणी

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।**

**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ।।**

महापुरुषांच्या ठिकाणी निर्विकल्प अवस्था येते, तेव्हा त्यांच्या चित्तातून, मनातून रागद्वेष इ. गोष्टींचा नाश होतो. मन आत्मरूप राहून सदा प्रसन्न अवस्थेत राहते. हे स्फुरण 'तेजस' या गुणातून व्यक्त होत असताना, 'तेजस' चे प्रतीक सुवर्णकांतीची प्रभा आहे.

**सदा सत्त्वे प्रबुद्धे तु प्रलयं यति देहभृत्।**

**तदोत्तमविदाँल्लाकानमप्रातेपद्यते ।।**

मनुष्यदेह धारण करणाऱ्या आत्म्याची जेव्हा सत्त्वगुणांची वृद्धी झाली असते, देहत्यागरूपी प्रलयाप्रत जातो, तेव्हा महादित्यादि उत्तम तत्त्वास जाण्याचा शुद्ध अशा (द्यु वा ब्रह्म) लोकास प्राप्त होतो. अशा सत्त्वगुणांचे महत्त्व भगवान गोपाळकृष्ण गीतेत सांगतात. सत्त्वगुणांच्या अंगीकाराचे फळ कसे असते हे महाराजांच्या जीवन चरित्रात दिसून येते.

सत्त्वगुणांच्या परिपूर्ण अंगीकाराने अमानित्वादि ज्ञान गुणांनी व अभयादिक दैवी गुणसंपत्तीने आयुर्वेदातील रसायन प्रकरणात (कोल्टकर यांचे पातंजली योगदर्शन - पान ४३२ - ४३३) मध्ये सांगितल्याप्रमाणे-

**दीर्घमायुः स्मृतिं मेधाऽरोग्यं तरुणं वयः।**

**प्रभावर्णस्वरौदार्य देहेन्द्रिबलं परम् ।**

**वाक्सिद्धीं प्रणतिं कांतिं लभते ना रसायनात् ।।**

दीर्घ आयुष्य, स्मृती, मेधा, आरोग्य, तारुण्य, प्रभावर्ण (सुवर्णकांती), उत्तम स्वर, स्वभावाची उदारता, इंद्रिय सामर्थ्य, वाक्सिद्धी, विलक्षण नम्रता, कांती (तेज) हे प्राप्त होतात, तसेच,

**सत्यवादिनमक्रोधं निवृत्तं मद्यमैथुनात ।**

**अहिंसकं प्रशांतम्, जपशौचपरं, धीरं तपस्विनं**

**गो – ब्राह्मणाचार्यं गुरुवृध्दार्चनरतं आनृशंस्यपरं**

**अनहंकृतं शास्त्राचारं अध्यात्मप्रवणेंद्रियं**

**धर्मशास्त्रवरं विद्यान्नरं नित्यरसायनम् ।।**

नेहमी खरे बोलणारा, क्रोधवश न होणारा, मद्यापासून निवृत्त, ब्रह्मचर्यव्रत पालन करणारा (गृहस्थाश्रमात पतिपत्नीनी एकनिष्ठ राहणे हेही ब्रह्मचर्यपालन केल्यासमान असते.) अहिंसक, शांतवृत्तींचा, जपशौचादिकांत तत्पर असलेला, धैर्यवान, तपस्वी, देव, गायी, ब्राह्मण, आचार्य गुरुजन आणि वृद्ध यांना मान देणारा, कोणाचा घातपात न करणारा, निराभिमानी, सदाचरणी, आध्यात्माकडे ओढा असणारा, धर्मशास्त्र परायण असा मनुष्य नित्यारसायन पूर्ण असतो. हेच रसायन सुवर्ण कांतीचे रसायन म्हणता येईल.

पू. श्रीधरस्वामी, पू. परमाचार्य, व पू. दत्तमहाराज नित्यपणे या रसायनातच होते. दत्तमहाराजांची ही कांतिप्रभा, तेजस्विता देह ठेवताना विलक्षण स्वरूपात प्रकट झाली होती.

योगवाणी अथवा सिद्धियोगोपदेश पुस्तकात अनाहतचक्राचे वर्णन (पान ५५) मध्ये केले आहे. त्यामध्ये सुवर्णसमान प्रकाशाने होणारी ही

तेजोमयता महाराजांच्या देहावर प्रकट झाली होती.

यात अध्यात्मशास्त्र, योगशास्त्र व वैद्यकशास्त्र या तिन्ही शास्त्रांची एकवाक्यता आहे. या काया संपत्तीचा उपयोग योगाभ्यासाने होऊ शकतो. तेव्हा खऱ्या कैवल्याचा साक्षात्कार घडत असतो.

पू. महाराज केवळ तुमच्या-आमच्यातील असूनही सामान्य नव्हते तर, अनेक संत महात्म्ये, ईश्वरकृपेमुळे साकार झालेले चालते बोलते 'परब्रह्म' होते. 'जीव व शिव दोन्ही एकच असते, या बोधावर जे अखंड राहतात ते परब्रह्म !' म्हणून "**येणे कारणे ते परब्रह्म**" म्हणावे लागेल. 'तुम्ही, आम्ही जे सामान्यपणे जीव बोधावर राहतो. तो जीवात्मा सामान्य मानव होय. म्हणून महाराजांना "साकार झालेले परब्रह्म" म्हणतोय बरे !

**निर्विचारवैशारद्ये ऽ ध्यात्मप्रसादः ।।**

(पातंजली योग सूत्र, समाधीपाद सूत्र ४६) ।।

वैशारद्य म्हणजे पक्वावस्था, निर्विचार सामर्थ्यात प्राप्त झाले असता, तो जीवात्मा समाधी अवस्थेत टिकवतो हाच 'आध्यात्मप्रसाद' आहे व प्रज्ञाशक्ती (बुद्धी) ही 'ऋतंभरा' होते. या सर्व गोष्टी पू. महाराजांच्या ठिकाणी दिसून येतात.

या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे उद्धवजी स्वरूप असलेले ज्ञानयोगी दत्तमहाराज, "श्रीकृष्ण गोविंद... हरे मुरारे ..." भजनात चिंब झाले. ज्ञानाला भक्तिरस प्राप्त झाला, शेवटी शेवटी, "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरात" रमून गेले. 'कवणा ठाया जावे' व कृष्णादयार्णवस्वामींच्या "मानसा ऽऽ नारायण भज रे "... यात पूर्णपणे रंगले होते. केवळानंदात होते !

अशा एका उत्तुंग, विशाल व महामानवाच्या सान्निध्यात आपण

सा. होतो तीच भाग्याची परिसीमा आहे हं ! तेव्हा अशा पू. दत्तमहाराजांना अनंत कोटी प्रणाम ऽ ऽ ऽ !!!

**केवळ प्रार्थना करू या ...**

**माझे चित्त तुझे पायी । राहो ऐसे करी काही ।।**

**धरोनिया बाही । भव हा तारी दातार ।। ...**

